CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २२ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७६ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## महत्त्वाचे

### आरबीआयकडून मोबाईल वापरकर्त्यांना मोठा दिलासा

**मुंबई :** फ्रॉड कॉलची समस्या वाढत चालली आहे. अशा परिस्थितीत रिझर्व्ह बँकेने आता मोठा निर्णय घेतला आहे. आरबीआयने ग्राहकांना व्यवहार आणि मार्केटिंग कॉल करण्यासाठी वित्तीय संस्थांसाठी फक्त दोन फोन नंबरची सीरिज सुरू केली आहे. याचा अर्थ ग्राहकांना रिझर्व्ह बँकेने ठरवलेल्या या दोन सीरिज नंबरमधूनच बँकिंग कॉल येतील. आरबीआयच्या या निर्णयामुळे मोबाईल वापरकर्त्यांना फसवणुकीपासून दिलासा मिळणार आहे. आरबीआयच्या सूचनेनुसार, बँकांना आता सर्व व्यवहार-संबंधित कॉलसाठी फक्त १६०० ने सुरू होणारे फोन नंबर वापरावे लागतील. जर तुम्ही कोणताही बँकिंग व्यवहार केला असेल आणि त्यासाठी तुम्हाला कॉल आला असेल तर तो फक्त १६०० सीरिजपासून सुरू होणाऱ्या क्रमांकांवरून येईल.

### वैष्णवी शर्माच्या विक्रमी कामगिरीमुळे भारत विजयी



**क्वालालम्पूर :** येथे सुरू असलेल्या १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत मंगळवारी भारताच्या वैष्णवी शर्माने नोंदवलेल्या विक्रमी हॅट्ट्रिकच्या बळावर भारतीय महिला संघाने मलेशियावर १० गड्यांनी एकतर्फी विजय नोंदवला. मलेशियाला ३१ धावांत गुंडाळल्यनंतर भारताने अवघ्या २.५ षटकांत एकही गडी न गमावता विजय प्राप्त केला. भारताचा हा दुसरा विजय ठरला. अ गटात भारत ४ गुणांसह अव्वल स्थानी आहे. वैष्णवी हॅट्ट्रिक घेणारी पहिली भारतीय व जगातील तिसरी गोलंदाज होऊन क्रिकेट इतिहासात आपले नाव कोरले आहे. तिने ४ षटकांत केवळ ५ धावा देत ५ बळी घेतले.

### 'गो फर्स्ट'ला कर्ज फेडण्याचा 'एनसीएलटी'चा आदेश

**मुंबई :** आर्थिक अडचणीत सापडल्यानंतर जवळजवळ तीन वर्षे उड्डाणे बंद असलेली हवाई सेवा 'गो फर्स्ट'ला मोडीत काढण्याचा आदेश सोमवारी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने (एनसीएलटी) दिले. परवडणाऱ्या दरातील तिकिटे असलेल्या या हवाई सेवेने मे २०२३ मध्ये, स्वेच्छेने दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेसाठी अर्ज दाखल केला होता. न्यायाधिकरणाने १५ पानांच्या आदेशात, कंपनीच्या सर्व मालमत्तांची विक्री करून सर्व देणी चुकती केली जावीत असे म्हटले आहे. गो फर्स्टला कर्ज देणाऱ्या संस्थांच्या समितीने या दिवाळखोरी प्रक्रियेबाबत कोणतीही हरकत नोंदविली नव्हती, शिवाय कंपनी अवसायनात (लिक्विडेशन) काढण्याच्या ठरावालाही १०० टक्के मान्यता दिली आहे.

### टीव्हीएसने आणली जगातील पहिली सीएनजी स्कूटर

**नवी दिल्ली :** टीव्हीएस मोटारने भारत मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ मध्ये आपल्या ज्युपिटर सीएनजी स्कूटरचे कन्सेप्ट मॉडेल प्रदर्शित केले. ज्युपिटर सीएनजी ही जगातील पहिली सीएनजी स्कूटर आहे. ही स्कूटर सीएनजी आणि पेट्रोल या दोन्हीवरही स्कूटर धावू शकते. एक किलो सीएनजीवर ८४ किलोमीटर धावते. ही स्कूटर पेट्रोल आणि सीएनजी या दोन्हीसह २२६ किलोमीटरपर्यंतची रेंज देईल.

### महाकुंभात पोहोचल्या सुधा मूर्ती



**प्रयागराज :** प्रसिद्ध लेखिका आणि राज्यसभा खासदार सुधा मूर्ती या प्रयागराजच्या महाकुंभात तीन दिवसांच्या मुक्कामावर असतील. त्या सोमवारीच प्रयागराजला पोहोचल्या आणि महाकुंभाच्या परिसरात मुक्काम केला आहे. सुधा मूर्ती या ब्रिटनचे माजी पंतप्रधान सुनक यांच्या सासू आहेत. येथे आल्यावर एका वृत्तसंस्थेच्या प्रश्नावर त्या म्हणाल्या, महाकुंभात येण्यासाठी मी खूप उत्साहित आणि आनंदी आहे, कारण हे 'तीर्थराज' आहे आणि या महाकुंभात १४४ वर्षांनंतरचा हाही एक शुभ योग आहे. सुधा मूर्ती गंगा दर्शन, स्नान आणि धार्मिक अध्यात्मात सहभागी होण्यासाठी येथे पोहोचल्या आहेत. संतांचे आशीर्वाद घेणार असून, महाकुंभाची भव्यताही पाहणार आहेत. सुधा मूर्ती यांना २०२३ मध्ये पद्मभूषण आणि २००६ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. इंग्रजी आणि कन्नड साहित्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

## दावोसमध्ये पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचा डंका

# राज्यात जवळपास ५ लाख कोटींची गुंतवणूक



सामंजस्य कराराचे आदान-प्रदान करताना उपस्थित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जेएसडब्ल्यूचे अध्यक्ष सज्जन जिंदाल व उद्योग मंत्री उदय सामंत

**कल्याणी समूह**
गुंतवणूक : ५२०० कोटी
रोजगार : ४०००
क्षेत्र : संरक्षण, पोलाद, ईव्ही वाहने

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.**
गुंतवणूक : १६,५०० कोटी
रोजगार : २४५०
क्षेत्र : संरक्षण

**बालासोर अलाईज लि.**
गुंतवणूक : १७००० कोटी
रोजगार : ३२००
क्षेत्र : पोलाद, धातू

**अवनी पॉवर बॅटरिज**
गुंतवणूक : १०,५२१ कोटी
रोजगार : ५०००
क्षेत्र : इलेक्ट्रॉनिक्स

**इस्सार (ब्ल्यू एनर्जीसोबत सहकार्याने)**
गुंतवणूक : ८,००० कोटी
रोजगार : २,०००
क्षेत्र : हरित ऊर्जा

**जेएसडब्ल्यू ग्रुप**
गुंतवणूक : ३,००,००० कोटी
रोजगार : १०,०००
क्षेत्र : पोलाद, अक्षय ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि सिमेंट, लिथियम-आयन बॅटरी, सोलर वेफर आणि सेल मॉड्युल्स




**जेन्सोल**
गुंतवणूक : ४,००० कोटी
रोजगार : ५००
क्षेत्र : इलेक्ट्रॉनिक्स

**झेड आर टू समूह**
गुंतवणूक : १७,५०० कोटी
रोजगार : २३,०००
क्षेत्र : ग्रीन हायड्रोजन अँड केमिकल

**एबी इनबेव्ह**
गुंतवणूक : ७५० कोटी
क्षेत्र : एफ अँण्ड बी

**विराज प्रोफाईल्स प्रा. लि.**
गुंतवणूक : १२,००० कोटी
रोजगार : ३५००
क्षेत्र : पोलाद, धातू

**वारी एनर्जी**
गुंतवणूक : ३०,००० कोटी
रोजगार : ७,५००
क्षेत्र : हरित ऊर्जा, सौरऊर्जा उपकरणे

**बिसलरी इंटरनॅशनल**
गुंतवणूक : २५० कोटी
रोजगार : ६००
क्षेत्र : अन्न व पेये

**ब्ल्यू एनर्जी मोटर्स**
गुंतवणूक : ३,५०० कोटी
रोजगार : ४,०००
क्षेत्र : वाहन आणि ईव्ही

**टेम्बो**
गुंतवणूक : १००० कोटी
रोजगार : ३००
क्षेत्र : संरक्षण

**एल मॉण्ट**
गुंतवणूक : २००० कोटी
रोजगार : ५०००
क्षेत्र : पायाभूत सुविधा

**ब्लॅकस्टोन**
गुंतवणूक : २५००० कोटी
रोजगार : १०००
क्षेत्र : माहिती तंत्रज्ञान

**ब्लॅकस्टोन-पंचशील रिअल्टी**
गुंतवणूक : २५००० कोटी
रोजगार : ५००
क्षेत्र : डाटा सेंटर

**एच टू ई पॉवर**
गुंतवणूक : १०,७५० कोटी
रोजगार : १८५०
क्षेत्र : हरिज ऊर्जा

**वेलस्पून** - गुंतवणूक : ८,५०० कोटी | रोजगार : १७,३०० | क्षेत्र : लॉजिस्टिक



**बुक माय शो** - गुंतवणूक : १,७०० कोटी | रोजगार : ५०० | क्षेत्र : करमणूक

◆ **मुंबई, २१ जानेवारी**

जागतिक आर्थिक फोरम परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गडचिरोलीसाठी लाखो कोटी रुपयांची गुंतवणूक खेचून आणली. गडचिरोली जिल्ह्यात जेएसडब्ल्यू ३ लाख कोटी रुपयांची, तर कल्याणी समूह ५,२५० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.

जेएसडब्ल्यू ग्रुपदेखील गडचिरोलीत एकूण ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यावेळी जेएसडब्ल्यू ग्रुपसोबत महाराष्ट्र सरकारचा पोलाद, अक्षय ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि सिमेंट, लिथियम-आयन बॅटरी, सोलर वेफर आणि सेल मॉड्युल्स उद्योगासाठी ३ लाख ८१ हजार ५०० कोटींचा सामंजस्य करार झाला. यातून १० हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जेएसडब्ल्यू समूहाचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांनी या करारावर स्वाक्षरी केली. उद्योग मंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते.

> जेएसडब्ल्यूसोबत ३ लाख कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. तो स्टील, नविनीकरणीय ऊर्जासह विविध क्षेत्रातील आहे. महाराष्ट्राच्या विकासाला मोठा बुस्ट देणारा हा करार आहे.
> **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

> महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व्यवसाय सुलभतेची प्रक्रिया अतिशय वेगवान आणि तितकीच सहजसोपी आहे. गुंतवणूकदारांच्या बाहेर मोठ्या रांगा लागल्या आहेत.
> **सज्जन जिंदाल,** उद्योजक

कल्याणी समूह आणि महाराष्ट्र राज्य शासनामध्ये स्टील आणि संरक्षण क्षेत्रात करार करण्यात आला आहे. या माध्यमातून पोलाद उद्योगासाठी ५२५० कोटी रुपयांची गुंतवणूक गडचिरोलीमध्ये केली जाणार आहे. या करारामधून तब्बल ४ हजार रोजगार निर्मितीही होणार आहे. कल्याणी समूहाचे प्रमुख अमित कल्याणी यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेत हा करार केला. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंतही उपस्थित होते. या करारामुळे चार हजार रोजगार निर्माण होणार आहेत. या सत्रात एकूण नऊ सामंजस्य करार करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**पहिला जिल्हा असल्याचे केले सिद्ध**

मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलवादी भाग असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचा दौरा करीत अनेक उद्योगधंदे आणण्याचा शब्द दिला होता. त्यांच्या या दौऱ्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विरोधकांनीही कौतुक केले होते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी आपल्या शब्दाला जागत गडचिरोली शेवटचा नव्हे तर, पहिला जिल्हा असल्याचे पहिला करार करून सिद्ध केले आहे. (तभा वृत्तसेवा)

# छत्तीसगडमध्ये १४ माओवाद्यांचा खात्मा

## • ओडिशा सीमेवर चकमक • एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेला जयरामही ठार

◆ **रायपूर/भुवनेश्वर, २१ जानेवारी**

छत्तीसगड-ओडिशा राज्य पोलिस आणि केंद्रीय पोलिसांनी छत्तीसगड-ओडिशा सीमेवर केलेल्या संयुक्त कारवाईत १४ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यात माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य आणि शिरावर एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेला जहाल माओवादी जयराम उर्फ चलपतीही ठार झाला. हा अत्यंत धोकादायक माओवादी होता, असे सांगितले जाते.

ठार झालेल्या नक्षलवाद्यांत केंद्रीय समितीचा सदस्य जयरामचाही समावेश आहे. त्याच्यावर एक कोटी रुपयांचे बक्षीस होते, असे छत्तीसगडच्या गारियाबंद जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक निखिल राखेचा यांनी सांगितले. ठार झालेल्या उर्वरित नक्षलवाद्यांची ओळख अद्याप पटलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

सोमवारी छत्तीसगड-ओडिशा सीमेवरील संयुक्त कारवाईत दोन महिला नक्षलवादी ठार झाल्या. चकमकीच्या ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि आयईडी जप्त केले. यात एका एसएलआरचाही समावेश आहे, असे या घटनेची माहिती देताना पोलिसांनी सांगितले. दोन राज्यांच्या सीमेवरील छत्तीसगडच्या भारातील मैनपूर पोलिस ठाणे हद्दीतील जंगलात सोमवारी रात्री पुन्हा चकमक सुरू झाली. ती मंगळवारी पहाटेपर्यंत सुरू होती. यात १२ नक्षलवादी ठार झाले. यासह ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या १४ झाली आहे.

मंगळवारीही या भागात अधूनमधून गोळीबार सुरू होता आणि मृत्युमुखी पडलेल्या माओवाद्यांची संख्या वाढू शकते, असे राखेचा यांनी सांगितले.

**१९ जानेवारीला सुरू झाले ऑपरेशन**

छत्तीसगडमधील कुलारीघाट वन क्षेत्रात माओवाद्यांच्या हालचाली असल्याची गुप्तचरांकडून माहिती मिळाली. त्यानंतर १९ जानेवारी रोजी दोन्ही राज्यांनी समन्वयातून कारवाई सुरू केली. कुलारीघाट हे ओडिशाच्या नौपाडा जिल्ह्यापासून केवळ पाच किमी अंतरावर आहे. (वृत्तसंस्था)

> नक्षलवादाला आणखी एक मोठा धक्का. नक्षलमुक्त भारत निर्माण करण्याच्या दिशेने आपल्या सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले. सीआरपीएफ, एसओजी ओडिशा आणि छत्तीसगड पोलिसांनी ओडिशा-छत्तीसगड सीमेवर संयुक्त कारवाई करीत १४ नक्षलवाद्यांना ठार केला. नक्षलमुक्त भारताच्या आमच्या संकल्पामुळे आणि सुरक्षा दलाच्या प्रयत्नांमुळे नक्षलवाद आज शेवटचा श्वास घेत आहे.
> **अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री

### नीता अंबानींनी परिधान केला १८ व्या शतकातील रत्नहार

**वॉशिंग्टन, २१ जानेवारी**

डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा मंगळवारी रात्री पार पडला. या सोहळ्यात रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी आणि रिलायन्स फाऊंडेशनच्या संस्थापक, अध्यक्ष नीता अंबानी यांनी शपथविधीपूर्वी झालेल्या एका खाजगी समारंभात डोनाल्ड ट्रम्प यांचे अभिनंदन केले.



भारत आणि अमेरिका यांचे संबंध बळकट होतील, अशी आशा या दोघांनी व्यक्त केली. ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी जागतिक स्तरावरचे नेते पोहोचले होते, तसेच प्रमुख उद्योगपतींचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमात नीता अंबानी यांच्या साडीने आणि खास ज्वेलरीने लक्ष वेधून घेतले. नीता अंबानी यांनी या समारंभासाठी खास साडी नेसली होती. त्यांनी १८ व्या शतकातला नेकलेसही परिधान केला होता. हा खास हार पन्ना, रुबी आणि हिऱ्यांचा आहे. ट्रम्प यांनी आयोजित केलेल्या कँडल लाईट डिनरच्या वेळी हा नेकलेस आणि खास साडी नीता अंबानी यांनी परिधान केली होती.

# बीड हत्याकांडातील सर्व आरोपी दिसले सीसीटीव्हीत

## वाल्मीक कराड, विष्णू चाटेसह पोलिस अधिकारीही उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, २१ जानेवारी**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी निगडीत खंडणी प्रकरणी एक मोठी अपडेट समोर आली आहे. आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना खंडणी मागितली त्या दिवसाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. संतोष देशमुख हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपी या सीसीटीव्हीच्या फ्रेममध्ये एकत्र कैद झाले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे काही पोलिस अधिकारीही त्यांच्यासोबत दिसत आहेत. हे सीसीटीव्ही फुटेज मोठा पुरावा मानले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हे सीसीटीव्ही फुटेज केज शहरातील विष्णू चाटे याच्या कार्यालयासमोरील दुकानाबाहेरील आहे. आवादा कंपनीला २९ नोव्हेंबर २०२४ रोजी खंडणी मागितली होती. तत्पूर्वी विष्णू चाटे याच्या कार्यालयात बैठक झाली. त्याच दिवशीचे हे सीसीटीव्ही फुटेज आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मिक कराड या कार्यालयात



आला होता. यावेळी वाल्मिक कराड याच्यासोबत संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करणारे प्रतीक घुले, सुदर्शन घुले यांसह त्याचे मित्र दिसत आहेत. विशेष म्हणजे संतोष देशमुख हत्याप्रकरणामुळे निलंबित झालेले पीएसआय राजेश पाटील हे देखील यावेळी आरोपींसोबत असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे.

**२९ नोव्हेंबरला वाल्मीक कराड केज शहरात**

वाल्मिक कराड याने विष्णू चाटेटेच्या मोबाईलवरून आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना २ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोप आहे. त्यामुळे हा व्हिडिओ महत्त्वाचा समजला जात आहे. २९ नोव्हेंबर २०२४ रोजीचा सकाळी अकरा वाजताचा हा व्हिडिओ आहे. यानंतर आवादा कंपनीकडे खंडणी मागितल्याचा प्रकार घडला असल्याचा संशय आहे. २९ नोव्हेंबरला वाल्मीक कराड केज शहरात होता, याचा हा पुरावा देखील आहे. खंडणी आणि हत्या प्रकरणातील काही आरोपी यामध्ये दिसत आहेत. त्यामुळे वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे. आज समोर आलेल्या सीसीटीव्हीमध्ये आका, चाटे, घुले हे आहेत हे स्पष्ट दिसत आहेत. माझे आरोप हवेतील नव्हते. या लोकांचा खंडणी, हत्येशी आकाचा संबंध आहे, यातून हे सिद्ध होत आहे. त्यामुळे १०१ टक्के आका, विष्णू चाटे, सुरेश आंधळे हे आरोपी आहेत, असा आरोप सुरेश धस यांनी केला.

**हत्येच्या दिवशी आरोपींची फोनाफोनी**

संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई झाली आहे. सर्व आरोपी आता कोठडीमध्ये असून या प्रकरणाचा एसआयटी तपास करत आहे. कृष्णा आंधळे हा एकमेव आरोपी अद्याप फरार आहे. संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्यादिवशी विष्णू चाटे, सुदर्शन घुले आणि वाल्मीक कराड यांच्यात फोनवर संभाषण झाल्याचा दावा पोलिसांनी कोर्टात केला होता. संतोष देशमुख यांच्या अपहरणाची वेळ आणि आरोपींची फोनाफोनीची वेळ मिळतीजुळती असल्याचेही पोलिसांनी कोर्टात म्हटले होते. दरम्यान, आता वाल्मीक कराडविरोधात पोलिसांना ठोस पुरावा मिळाल्याने कारवाईला वेग येणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**अटकेतील आरोपी**

१. जयराम चाटे (हत्या प्रकरण), २. महेश केदार (हत्या प्रकरण), ३. प्रतीक घुले (हत्या प्रकरण), ४. विष्णू चाटे (हत्या प्रकरण) (खंडणी प्रकरण), ५. सुदर्शन घुले (हत्या प्रकरण) (खंडणी प्रकरण), ५. सुधीर सांगळे (हत्या प्रकरण), ८. वाल्मिक कराड (खंडणी प्रकरण), फरार आरोपी, १. कृष्णा आंधळे (हत्या प्रकरण)

### राष्ट्रपती, पंतप्रधान महाकुंभात जाणार

◆ **नवी दिल्ली, २१ जानेवारी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात महाकुंभाला भेट देणार असल्याचे वृत्त आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू १० फेब्रुवारी रोजी महाकुंभाला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ फेब्रुवारीला महाकुंभाला भेट देण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह २७ जानेवारी रोजी, तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड १ फेब्रुवारी रोजी कुंभमेळ्याला भेट देणार आहेत.

महाकुंभ सुरू झाल्यापासून ९ कोटी लोकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले आहे. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत चालणाऱ्या महाकुंभात एकूण सहा शाही स्नान होणार आहेत, त्यापैकी तीन अमृत स्नान आहेत. तीन अमृत स्नानांपैकी एक आधीच झाले आहे, ज्यामध्ये सुमारे साडेतीन कोटी लोकांनी भाग घेतला होता. (वृत्तसंस्था)

# गड-किल्ले ३१ मेपूर्वी होणार अतिक्रमणमुक्त

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा आदेश

◆ **मुंबई, २१ जानेवारी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे ३१ मेपर्यंत बेकायदेशीर कामे हटवण्याचे उद्दिष्ट आहे, असे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले.

३१ जानेवारीपर्यंत किल्लेनिहाय अतिक्रमणांची यादी तयार करण्यास सांगण्यात आले आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. योग्य दृष्टिकोन सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्या स्थापन केल्या जातील आणि त्या १ फेब्रुवारी ते ३१ मे या कालावधीत टप्प्याटप्प्याने अतिक्रमणे हटवण्याचे काम पाहतील, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

> जिल्हास्तरीय समित्यांमध्ये पोलिस आयुक्त, नगरपालिका प्रमुख, वन अधिकारी आणि पुरातत्त्व विभागाचे प्रतिनिधी असतील. ते अतिक्रमणांचा प्रश्न कार्यक्षमतेने हाताळतील तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखली जाईल, हेदेखील सुनिश्चित करतील.
> **आशिष शेलार,** सांस्कृतिक कार्यमंत्री



भविष्यात अतिक्रमणे होऊ नये म्हणून सरकार दक्षता समित्या स्थापन करले. गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणांच्या विरोधात निर्णायक कारवाईची मागणी वाढत होती आणि सरकारने त्यानुसार प्रतिसाद दिला आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रात ४७ किल्ले केंद्राद्वारे, तर ६२ राज्याद्वारे संरक्षित आहेत आणि सुमारे ३०० किल्ले असुरक्षित आहेत. या उपक्रमाचे उद्दिष्ट या सांस्कृतिक स्थळांचे ऐतिहासिक आणि सौंदर्यात्मक महत्त्व जपणे आहे. राज्य सरकारने सोमवारी किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी समित्या स्थापन करण्याचा आदेश देणारा जीआर जारी केला. स्थापन केलेल्या समित्या दरमहा भेटून प्रगतीचा आढावा घेऊन सरकारला अहवाल सादर करतील. (वृत्तसंस्था)

# सैफच्या हल्लेखोराची सात महिन्यांपूर्वी घुसखोरी

◆ **मुंबई, २१ जानेवारी**

अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा बांगलादेशी आरोपी शहजादने सहा महिन्यांपूर्वी मेघालयातील डावकी नदी पार करून भारतात प्रवेश केला. त्यानंतर तो पश्चिम बंगालमध्ये गेला. तेथे एका व्यक्तीच्या आधार कार्डचा वापर करून मोबाईल व सिम कार्ड खरेदी केल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. दरम्यान, सैफ अलीला रुग्णालयातून सुटी देण्यात आली.

प्रकरणाचा तपास करणाऱ्या एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपीने पश्चिम बंगालमधील स्थानिक नेत्याच्या माध्यमातून रहिवासी दाखला मिळवला. त्याने खुखुमोनी जहांगीर शेख या नावाने बोगस दस्तावेज तयार केले होते. काही महिने बंगालमध्ये राहिल्यानंतर दोन महिन्यांपूर्वी तो मुंबईत आला. तो विजय दास नावाने येथे राहत होता. आरोपी मूळचा बांगलादेशातील राजशाहीचा रहिवासी असून, त्याचे नाव शरीफुल इस्लाम शेहजाद मोहम्मद रोहील्ला अमीन फकीर उर्फ शहजाद आहे. मुंबईत आल्यानंतर येथील अमित पांडे नावाच्या व्यक्तीने त्याला शहरात कंत्राटी पद्धतीने काम मिळवून देण्यात मदत केल्याचेही तपासात उघड झाले आहे.

**बांगलादेशातील नातेवाईकांच्या होता संपर्कात**

आरोपीने प्रथम कोलकाता येथील रहिवासी असल्याचे सांगितले होते. मात्र, पोलिसांनी त्याचे कॉल रेकॉर्ड तपासले असता, आरोपीने बांगलादेशातील त्याच्या नातेवाईकांशी मोबाईवरून संपर्क केल्याचे समोर आले. (वृत्तसंस्था)

# ट्रम्प सत्तेत येताच बाजार कोसळला

## निर्देशांक, निफ्टीत मोठी घसरण

## ५.५ लाख कोटींचा चुराडा

◆ **मुंबई, २१ जानेवारी**

अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका पार पडल्यापासूनच मुंबई शेअर बाजारामध्ये नकारात्मक वातावरण पाहायला मिळू लागले. डोनाल्ड ट्रम्प पुन्हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होणार हे स्पष्ट झाल्यानंतर मुंबई शेअर बाजारात निर्देशांक व निफ्टीनेही माघार घेतल्याचे चित्र दिसून आले. याचा परिणाम मंगळवारी सकाळी शेअर मार्केटमध्ये व्यवहार सुरू होताच दिसून आला. मुंबई शेअर मार्केटमध्ये मंगळवारची सकाळ गुंतवणूकदारांसाठी निराशाजनक ठरली.

मंगळवारी निर्देशांक तब्बल ७०० हून अधिक अंकांनी आपटल्यामुळे गुंतवणूकदार हवालदिल झाले. व्यवहार सुरू झाल्यानंतर दोन्ही ठिकाणी काहीसे सकारात्मक चित्र निर्माण झाले. निफ्टी सकाळच्या सत्रात ६४ अंकांनी वधारला, तर निर्देशांकही ७६.४४ अंकांनी वर आला. पण, अवघ्या काही वेळातच गुंतवणूकदारांच्या आशा धुळीस मिळाल्या. निर्देशांक तब्बल ७०० अंक अर्थात् ०.९३ टक्क्यांनी घसरला. निफ्टी ७४ टक्के अर्थात् १७२ अंकांनी घसरून २३ हजार १७२.७० पर्यंत खाली आला. या पडझडीमुळे बाजाराचे तब्बल ५.५ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### राज्यस्तरीय युवा शिक्षक पुरस्काराने नर्मदा कनकी सन्मानित

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
शिक्षणविवेक आयोजित शिक्षण माझा वसा २०२५ हा राज्यस्तरीय युवा शिक्षक पुरस्कार सोहळा पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. शिक्षण विवेक मासिकांतर्गत केलेल्या उल्लेखनीय कामामुळे नर्मदा कनकी यांना सन्मानचिन्ह सन्मानपत्र, वाचनीय पुस्तके आणि भेटवस्तू देऊन त्यांचा राज्यस्तरीय शिक्षक प्रतिनिधी म्हणून सत्कार करण्यात आला. मिलिंद सबनीस, शिल्पा सबनीस आणि बाबासाहेब शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिक्षणविवेकच्या कार्यकारी संपादक डॉ. अर्चना कुडतरकर यांनी प्रास्ताविक केले. पुरस्कार निवड समितीतील प्राजक्ता वैद्य आणि शारदा पानगे यांचाही सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन दिव्या मावजेकर आणि देवव्रत वाघ यांनी केले. या कार्यक्रमाचे नियोजन शिक्षणविवेकच्या कार्यकारी संपादक डॉ. अर्चना कुडतरकर आणि त्यांचे सहकारी वैष्णवी पठारे, गिरीश चिवटे, मानसी झोरे, चेतन, प्रदीप पिंगळे, सिद्धी सावंत, दिव्या मावजेकर, देवव्रत वाघ, वैष्णवी भंडगे, हर्षवर्धन पाडुळे आणि सुषमा धामणसकर यांनी केले होते. वंदे मातरम्ने या पुरस्कार प्रदान सोहळ्याची सांगता झाली.



### उमाबाई श्राविका विद्यालयात कॉपीमुक्त अभियानांतर्गत जनजागृती

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी तसेच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२५ च्या दोन्ही परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त पार पाडण्याकरिता मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसाचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत २० ते २६ जानेवारीपर्यंत कॉपीमुक्त जनजागृती सप्ताह आयोजन करण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थीमध्ये कॉपीमुक्त जनजागृतीसाठी सामुदायिक पद्धतीने कॉपीमुक्त शपथ देण्यात आली आणि मार्गदर्शन देखील करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ व शिक्षक, शिक्षिका यांची प्रमुख उपस्थिती होती. सहशिक्षक अनंत बळ्ळे यांनी कॉपीमुक्त शपथ दिली. याप्रसंगी क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे,अनुप कस्तुरे, केतकी सोनटक्के, सोनाली आळंद, मिनाक्षी बेळ्ळे, कल्याणप्पा हायगोंडे, प्रा. कानडे प्रा.राऊत, प्रा. प्रतिभा कंगळे, प्रा.लेंगरे उपस्थित होते.



### अरिहंत इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
अरिहंत इंग्लिश स्कूलच्या न्यू घरकुल व कन्ना चौक शाखेचे प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. अंजली रगबले यांनी परिचय करून दिला. अध्यक्षपद मुंबई मंत्रालय समन्वय समितीचे सदस्य प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ यांनी भूषविले. गटशिक्षणाधिकारी बापूराव जमादार, संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहसंमेलनाची सुरुवात भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्याने झाली. पूर्व प्राथमिक विभागातील शंभर टक्के उपस्थिती विद्यार्थी अनुश्री कोटा तर प्राथश्विरी पडगे व आदर्श चनगले यांचा गौरव करण्यात आला. तर कन्ना चौक शाखेतील प्रणव आडकी शंभर टक्के उपस्थिती व विष्णुप्रिया फलमारी बेस्ट स्टुडंट म्हणून गौरव करण्यात आला. यावर्षीचा टीचर ऑफ द इयर म्हणून प्रिया धोत्रे (न्यू घरकुल) तर मेघा कोंकत्ती (कन्ना चौक) यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी सर्वोत्कृष्ट पर्यवेक्षिका म्हणून ज्योती आडम यांना गौरविण्यात आले. यावेळी मंचावर संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, रजनी सग्गम ज्योती आडम, रूपाली निकते चन्नेश इंडी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संचालिका सुलक्षणा पोन्नम यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, न्यू घरकुल शाखेच्या पर्यवेक्षिका रूपाली निकते, कन्ना चौक शाखेच्या पर्यवेक्षिका ज्योती आडम यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन फौजान अझहरी, सौ.लावण्या कोटा व तोषिता पोन्नम यांनी केले.

### वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल प्लॅटफॉर्मची निर्मिती

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
भारतातील सर्वात मोठ्या दूरसंचार सेवा पुरवठादार भारती एअरटेल आणि देशातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील बिगर बँकिंग वित्तीय कंपनी बजाज फायनान्स यांनी संयुक्तपणे वित्तीय सेवांसाठी भारतातील सर्वात मोठे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी आणि शेवटच्या घटकापर्यंत वितरणात बदल करण्यासाठी एक धोरणात्मक भागीदारी करण्याचे जाहीर केले आहे. या भागीदारीद्वारे मेट्रो शहरापासून दूर असलेल्या सोलापूरकरांना विमा, ऑनलाईन खरेदी व इतर शेकडो सेवा तत्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे.

# रात्रीच्या स्वच्छता कामातून दररोज ६ टन कचरा संकलन

- शहरातील २३ रस्त्यांची रात्री होतेय स्वच्छता
- महापालिका घनकचरा विभागातील ६४ कर्मचाऱ्यांचा असतो राबता

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
सोलापूर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाअंतर्गत आता शहरातील बाजारपेठांना जोडणाऱ्या २३ रस्त्यांची रात्री स्वच्छता करण्यात येत आहे. या माध्यमातून दररोज सहा टन कचरा संकलन केला जातो. या विभागातील तब्बल ६४ कर्मचाऱ्यांचा यासाठी राबता आहे. यामुळे बाजारपेठ परिसरांमध्ये सर्व रस्ते चकाचक होत असल्याने सकाळ ही प्रसन्न आणि आनंददायी पहायला मिळत आहे.



महापालिकेचा कारभार स्मार्ट सिटीला साजेसा असा होत आहे. विविध बाजारपेठांना जोडणाऱ्या प्रमुख २३ रस्त्यांची स्वच्छता आता चक्क रात्रीच्या वेळी केली जात आहे. प्रचलित पद्धतीनुसार शहरातील रस्त्यांची सफाई सकाळी केली जायची.

स्वच्छतेचे काम करताना सकाळी सुरू होणारी रस्त्यावरची वाहतूक, नागरिकांची वर्दळ यामुळे स्वच्छता मोहिमेत अडथळे यायचे. त्यामुळे स्वच्छतेचे काम प्रभावीपणे होत नव्हते. हे लक्षात घेता महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आता विविध बाजारपेठांना जोडणाऱ्या २३ प्रमुख रस्त्यांची स्वच्छता रात्रीच्यावेळी करण्याचे काम करण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्याची अंम लबजावणी सुरू झाली आहे.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्या नियंत्रणाखाली रात्रीची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. दररोज रात्री १० ते सकाळी ६ या दरम्यान शहरातील २३ रस्ते स्वच्छ करून चकाचक केले जात आहेत. नवी पेठ, मधला मारुती, एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन, चाटी गल्ली, कोंतम चौक, कुंभारवेस, ७० फूट रोड यासह विविध २३ रस्त्यांचा यामध्ये समावेश आहे. या मोहिमेमुळे सकाळी बाजारपेठांमध्ये स्वच्छतेचे दर्शन, प्रसन्न वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसत आहे. महापालिका प्रशासनाचे नेटक्या नियोजनाचा प्रत्यय येत आहे. विशेष म्हणजे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले हे या कामांची ऑन द स्पॉट पाहणी करतात.

**कर्मचाऱ्यांना रिफ्लेक्टर जॅकेट**

६४ स्वच्छता कर्मचारी २ आरोग्य निरीक्षक असे ६६ जणांचे मनुष्यबळ या मोहिमेसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. स्वच्छतेचे काम करताना रात्री अपघात होऊ नये म्हणून कर्मचाऱ्यांना सुरक्षेसाठी रिफ्लेक्टर जॅकेट देण्यात आले आहे. दररोज ६ टन कचरा संकलित केला जात आहे. या कामी घंटागाड्याची मदत घेतली जात आहे.

# जड वाहतूक नियंत्रण न झाल्यास आंदोलन करू : कॉ. आडम मास्तर यांचा इशारा

**साक्षी कलबुर्गीच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यावर कारवाई करावी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
वाढते शहरीकरण व नागरीकरण यामुळे शहरातील लोकसंख्या व वाहनांची संख्येत लक्षणीय प्रमाणात वाढ झाली आहे. वाहनांची वर्दळ व अनियंत्रित वाहतुकीमुळे अपघाताचे प्रमाण व अपघाती मृत्यूचे प्रमाण हे देखील वाढलेले आहे. वाहतूक नियंत्रणाच्या नियमांचे व आदेशाचे पालन होत नसल्याने शहरात अपघात व अपघाती मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. यामुळे जड वाहतुकीला वेळीच पायबंद घालावा अन्यथा जड वाहतूक नियंत्रित न झाल्यास आक्रमक आंदोलन करणार असल्याचा इशारा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बेजबाबदार अनियंत्रित माल वाहतुकीमुळे ६ वर्षीय साक्षी कलबुर्गी दगावली. याला कारणीभूत कोण? शहरांतर्गत जडवाहतूक पूर्णपणे बंद करून शांती चौक ते गुरुनानक चौक



या मार्गाला पर्यायी मार्ग द्यावा, या मार्गावर एक्सप्रेस हायवेप्रमाणे गतिरोधक बसवावे, बंद असलेले सिग्नल तात्काळ चालू करावे, वाहतूक पोलीस प्रशासनाकडून वाहनांच्या वेगाची तपासणी व्हावी. यासाठी संबंधित राष्ट्रीय व राज्य महामार्ग प्राधिकरण, पालिका प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासन यांच्यामध्ये समन्वय साधून शहरातील अपघात व अपघाती मृत्यूवर आळा घालावे व नागरिकांना संरक्षण द्यावे. असे न झाल्यास एक महिन्यानंतर नागरिकांच्या पुढाकाराने अनियंत्रित जडवाहतूक व मालवाहतुकीच्या विरोधात आक्रमक आंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल. असा इशारा माकपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी दिला.

सोमवार दि. २० जानेवारी २०२५ रोजी माकपचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर)यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांना शिष्टमंडळाद्वारे भेटून निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात माकपचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. एम.एच.शेख, कॉ. नसीमा शेख, कॉ. शेवंताताई देशमुख, कॉ. सुनंदा बल्ला, ॲड. कॉ. अनिल वासम, कॉ. विल्यम ससाणे आदींचा समावेश होता.

# विकास आराखड्याच्या विषयावर जुळे सोलापूरकरांचा २९ रोजी मोर्चा

**स्वाक्षरी मोहिमेद्वारे करणार शहरात जनजागृती**

**आराखडा म्हणजे कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार असल्याचा आरोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
महापालिकेने जाहीर केलेल्या शहराच्या प्रारुप विकास आराखड्याला हद्दवाढ भागातील नागरिकांचा तिव्र विरोध असून या विषयावर जुळे सोलापूर तसेच विजापूर रोड भागातील नागरिक येत्या बुधवार दि. २९ जानेवारी रोजी महापालिकेवर मोर्चा काढणार आहेत.

विजापूर रोडवरील सुंदर म ल्टीपर्पज हॉलमध्ये या भागातील नागरिकांची बैठक ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी माजी जेष्ठ नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप आराखड्यातील त्रुटी सांगितल्या. पुढील वीस वर्षाचा विचार करुन हा आराखडा बनवताना शहरातील नागरिकांचा विचार घेणे आवश्यक होते. विजापूर रोड भागात एसटी स्थानक, नाट्यगृह, प्रसूतीगृह, इंग्रजी शाळा याची गरज असताना आराखड्यात यासाठी तरतूद केली नसल्याचे दिसुन येते, असे ते म्हणाले. शहराचा विस्तार झाला आहे. विजापूर रोड तसेच जुळे सोलापूर भागात उपनगरांची व सोसायट्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे या भागात एसटी स्थानक होणे गरजेचे आहे. त्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून आमचा संघर्ष सुरु आहे. याबाबतीत आराखडा करताना विचार झाला नाही याची खंत वाटते. हा आराखडा म्हणजे कागदी घोडे नाचवण्याचा प्रकार आहे असे विजापुर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे विश्वस्त विजय शाबादी म्हणाले. मसापचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

# भगवा फडकविण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज व्हावे

**संपर्क प्रमुख अनिल कोकीळ; शिवसेना शहरच्या वतीने बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
आगामी काळात होणाऱ्या सोलापूर म हानगरपालिका निवडणुकीसाठी सोलापूर शहर मध्य व उत्तर दक्षिण मधील सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी सज्ज राहावे, असे अहवान शिवसेना संपर्क प्रमुख अनिल कोकीळ यांनी केले. शिवसेना सोलापूर शहरच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना उबाठाचे संपर्क प्रमुख अनिल कोकीळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनेते अस्मिता गायकवाड प्रा. अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, प्रताप चव्हाण, शहर प्रमुख महेश धाराशिवकर, युवा सेनाचे विठ्ठल वानकर, युवती सेनेचे पूजा खंदारे आदी उपस्थित होते.

उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोकीळ पुढे म्हणाले की मागील निवडणुकीत आपण २२ नगरसेवक निवडून आणले होते त्यापेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी सगळ्यांनी मतभेद विसरून कामाला लागावे व या निवडणुकीत कोणाशी युती होईल वा महाविकास आघाडी होईल काय होईल ते नंतर पाहू पण सर्वांनी प्रत्येक प्रभागात आपली बूथ यंत्रणा व निवडणुकीसाठी लागणारे सक्षम उमेदवारांनी तयारीला लागावे, असे आवाहन कोकीळ यांनी केले. याप्रसंगी उपनेते अस्मि



ता गायकवाड, जिल्हाप्रमुख प्रा. दासरी यांचे मार्गदर्शन झाले. याप्रसंगी युवा सेना युवती सेनेच्या वतीने नव नियुक्त पदाधिकारी यांची हे सत्कार करण्यात आला. तसेच कामगार सेनेने ज्या नवीन पदाधिकारी यांनाही प्रवेश करून घेतले या कामगार सेनेच्या प्रवेशासाठी पद्माताई म्हंता व अजय खांडेकर यांची निमंत्रक म्हणून ही नेमणूक करण्यात आली त्यांचाही सत्कार अनिल कोकीळ यांच्या हस्ते करण्यात आला. उपशहर प्रमुख सुरेश जगताप, अजय खांडेकर, संदीप बेळमकर, शशिकांत बिराजदार, अंबादास चव्हाण, उज्वला दिक्षित, नाना मोरे, अमित भोसले आदी उपस्थित होते.

# उसाच्या मळी वाहतुकीतून रेल्वे विभागाला पावणेदोन कोटींचे उत्पन्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी -**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने अधिकाधिक मालवाहतुकीच्या सेवांमधून महसूल निर्माण करण्याच्या हेतूने ऊसाची मळी (मोलॅसिस) मालवाहतुकीला पुनरुज्जीवित केले आहे. यामुळे महिनाभरातच सोलापूर रेल्वे विभागाला १ कोटी ६९ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. मालवाहतूक व्यवसाय वाढवण्यासाठी सोलापूर रेल्वे विभागाच्या सक्रिय प्रयत्नांवर प्रकाश टाकला जातो.

डिसेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ या जवळपास ३० दिवसात सोलापूर विभागाने तीन मोलॅसिस रेकची यशस्वीरित्या लोडिंग केली आहे.

महाराष्ट्रातील पंढरपूर गुड्स शेड पासून दक्षिण रेल्वेचा भाग असणाऱ्या तामिळनाडूतील नेल्लीकुप्पम पर्यंत दोन रेक आणि महाराष्ट्रातील बाळे गुड्स शेड पासून दक्षिण रेल्वे तील तामिळनाडूतील कुंभकोणम पर्यंत एक असे एकूण ३ रेक लोडींग झाले असून यातून रेल्वेला १ कोटी ६९ लाखांचा



अतिरिक्त महसूल मिळाला आहे.

साखर उत्पादनाचे उप-उत्पादन असलेले मोलॅसिस हे विविध उद्योगांसाठी एक महत्त्वाची वस्तू आहे. मोलॅसिसची नव्याने करण्यात आलेली वाहतूक हि सोलापूर विभागाच्या मालवाहतूक विभागाला बळकटी देण्यासाठी आणि औद्योगिक वाढीला पाठिंबा देण्याच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

व्यवसाय विकास उपक्रमांतर्गत वाणिज्य विभागाने भागधारकांशी संवाद साधण्यासाठी, कार्यक्षम लॉजिस्टिक्स सोल्यूशन्स प्रदान करण्यासाठी आणि ग्राहक-अनुकूल उपक्रम करण्यासाठी केलेल्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. मोलॅसिसचे यशस्वी लोडिंग हे विभागाच्या अखंड समन्वय आणि कार्यक्षमतेचे प्रमाण आहे.

तरी सोलापूर विभागाकडून देण्यात येणाऱ्या मालवाहतूक सेवांचा वापर करण्याचे आवाहन वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी व्यवसाय आणि उद्योजकांना केले आहे. विविध वाहतूक गरजा पूर्ण करण्यासाठी, वेळेवर आणि त्रासमुक्त वितरण सुनिश्चित करण्यासाठी विभाग विश्वासार्ह, किफायतशीर आणि कार्यक्षम लॉजिस्टिक्स उपाय प्रदान करतो यावर त्यांनी भर दिला. सोलापूर विभाग नवीन संधी शोधण्यासाठी, मालवाहतूक ऑपरेशन्स वाढवण्यासाठी आणि विभागाच्या आर्थिक विकासात योगदान देण्यासाठी समर्पित आहे. मोलॅसिस वाहतुकीचे पुनरुज्जीवन हे उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे आहे.

# अनुसूचित जाती, नवबौध्द घटक वस्ती विकास योजनेचा निधी वितरित

## १ हजार १४२ वस्त्यांसाठी ५३ कोटी ५९ लाख ६६ हजार रुपये विकास निधीचे वाटप

**२०११ सालची जनगणना गृहित धरुन निधीचे वाटप; १४ वर्षांपासून जनगणना झाली नसल्याने बसला फटका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेअंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून जिल्ह्यातील १ हजार १४३ वस्त्यात विकास कामे करण्यासाठी ५३ कोटी ५९ लाख ६६ हजार रुपयांचा निधी तालुका पातळीवर वितरित करण्यात आला आहे. हा विकास निधी वितरित करताना २०११ साली झालेले जनगणना गृहीत धरण्यात आली आहे. २०११ नंतर जातनिहाय जनगणनाच झाली नाही. याचा फटका सुधार योजनेतील विकास निधी प्राप्तीत दलित वस्त्यांना बसत आहे.

दरम्यान, या योजनेअंतर्गत १९९९ पासून प्रत्येक दलित वस्तीत ५ लाख रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात येत होते. दरम्यान, १४ नोव्हेंबर २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती व नवबौध्द अनुदानाच्या रकमेत वाढ करण्यात आली. २०११ सालच्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात दलित बांधकाम, पाणीपुरवठा, दलित वस्ती अंतर्गत रस्ते, दलित वस्तींना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीची दुरुस्ती, वीजपुरवठा व समाज मंदिर बांधकाम ही विकास कामे करण्यात येतात. वस्त्यांच्या सुधारण्यासाठी निधी दिला जात आहे. या योजनेअंतर्गत दलित वस्तीला जोडणारे जोड रस्ते, गटारे, बांधकाम, पाणीपुरवठा, दलित वस्ती अंतर्गत रस्ते, दलित वस्तींना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींची दुरुस्ती, वीजपुरवठा व समाज मंदिर बांधकाम ही विकास कमी करण्यात येतात.

**१४ वर्षांच्या कालावधीत लोकसंख्या वाढली**

मागील १४ वर्षांच्या कालावधीत दलित वस्तीत राहणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील जनतेची लोकसंख्या वाढली आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून वस्त्यांच्या सुधारणेसाठी २०११ च्या जनगणनेनुसारच विकास निधी देण्यात येतो. शासनाने जनगणना केली नाही. यात दलित वस्तीत राहणाऱ्या नागरिकांचा काय दोष? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**लोकसंख्येप्रमाणे देण्यात येणारा अनुदान निधी**

| लोकसंख्या | अनुदान निधी |
|---|---|
| १० ते २५ | २ लाख |
| २६ ते ५० | ५ लाख |
| ५१ ते १०० | ८ लाख |
| १०१ ते १५० | १२ लाख |
| १५१ ते ३०० | १५ लाख |
| ३०१च्या पुढे | २० लाख |

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | बुधवार, २२ जानेवारी २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिकेत 'थर्ड जेंडर'ची मान्यता संपुष्टात

- बेकायदेशीर स्थलांतरितांवर प्रवेशबंदी
- राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दहा मोठ्या घोषणा

**वॉशिंग्टन, २१ जानेवारी**



अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा पार पडल्यामुळे अमेरिकेत आता 'ट्रम्प-२ पर्व' सुरू झाले आहे. ट्रम्प यांनी सत्ता हाती घेताच राष्ट्रीय आणि परराष्ट्र धोरणांमध्ये अनेक मोठे बदल करण्याबाबत सांगितले. शपथविधीनंतरच्या ३० मिनिटांच्या भाषणात ट्रम्प यांनी अमेरिका फर्स्ट धोरणांतर्गत इतर देशांवर कर लादण्याबद्दल सांगितले. त्याचवेळी, त्यांनी अमेरिकेत फक्त पुरुष आणि महिला लिंगाला मान्यता देण्याची घोषणा केली.

यावेळी ट्रम्प यांनी दहा मोठे निर्णय घेतले. त्यात पनामा कालवा परत घेण्याची धमकी दिली. पनामा कालवा अमेरिकेने १९९९ मध्ये पनामाला भेट म्हणून दिला होता, पण आता ते चीनच्या ताब्यात आहे. अमेरिकन जहाजांना येथे जास्त कर भरावा लागतो. पनामा कालवा परत घेण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे.

ट्रम्प यांनी जागतिक आरोग्य संघटनेतून अमेरिकेला बाहेर काढून एक मोठे पाऊल उचलले आहे. आता अमेरिका डब्ल्यूएचओचा सदस्य नाही. या निर्णयामुळे, डब्ल्यूएचओला मोठा फटका बसणार आहे. अमेरिकेकडून त्यांना मिळणारा निधी थांबेल.

ट्रम्प यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. त्यांनी सोमवारी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली, ज्यामध्ये सरकारी संस्थांना अमेरिकन अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उल्लंघन करू नये, असा निर्देश देण्यात आला. ट्रम्प यांनी देशात बेकायदेशीर स्थलांतरितांच्या प्रवेशावर बंदी घालण्याबद्दल आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना पकडण्याबाबत धोरण अवलंबण्याचे सांगितले. बायडेन प्रशासनाने आपल्या देशात बेकायदेशीरपणे प्रवेश केलेल्या धोकादायक गुन्हेगारांना आश्रय दिला आहे आणि त्यांचे संरक्षण केल्याचा आरोप ट्रम्प यांनी केला आहे.

याशिवाय मेक्सिको सीमेवर आणिबाणी जाहीर करण्यासोबतच त्यांनी मेक्सिकोच्या खाडीचे नाव बदलून अमेरिकेची खाडी असे केले आहे. (वृत्तसंस्था)

### ब्रिक्सला धमकी

ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांच्या गटाला धमकी दिली आहे आणि म्हटले आहे की, जर या गटाने अमेरिका विरोधी धोरणे आणली तर त्यांनाही त्याचे परिणाम भोगावे लागतील. ब्रिक्समध्ये भारताचाही समावेश आहे. ट्रम्प म्हणाले की, या देशांनी अमेरिकेच्या हिताच्या विरोधात अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. जर हे देश भविष्यात असेच करत राहिले तर ते आनंदी राहणार नाहीत.

### भारतावरही होणार परिणाम

ट्रम्प म्हणाले की, आतापर्यंत आपल्या देशातील सरकार इतर देशांना श्रीमंत करण्यासाठी आपल्या देशातील लोकांवर कर लादत असे. आपण हे बदलणार आहोत, आता आपण आपल्या देशातील लोकांना श्रीमंत करण्यासाठी इतर देशांवर जकात आणि कर लादू. ट्रम्प यांच्या या निर्णयाचा फटका भारतालाही बसणार असल्याची चर्चा आहे.

### टिकटॉकला ७५ दिवसांची मुदतवाढ

डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारताच चीनशी संबंध सुधारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनी शॉर्ट व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म टिकटॉकला ७५ दिवसांचा वेळ दिला आहे. त्यामुळे अमेरिकेच्या नियमांचे पालन करण्यासाठी टिकटॉकला आवश्यक पावले उचलावी लागतील.

# बीदर घटनेतील आरोपींवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ जानेवारी-**




१२ व्या शतकात जगातील पहिले संसद स्थापना करणारे, क्रांतीसेर्य, जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याची बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण येथे काही समाजकटकांनी विटंबना केल्याने अक्कलकोटमध्ये या घटनेचे तीव्र पडसाद उमटले असून अनेक राजकीय पक्ष व संघटनांकडून तहसीलदारांना निवेदन देऊन तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

बसस्थानक येथे मल्लिकार्जुन रथाजवळ माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी व शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी तात्काळ आरोपीवर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत तहसीलदार मगर यांना निवेदन दिले. शिवा संघटनेने दिलेल्या निवेदनात महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याची काही समाजकंटकांनी विटंबना केली आहे.

त्यांच्यावर कर्नाटकचे सरकारने गुन्हा दाखल करावा, कर्नाटकाचे मुख्यमंत्री व गृहमंत्र्यानी तात्काळ राजीनामा द्यावा, आठ दिवसात त्या ठिकाणी नवीन पुर्णाकृती पुतळा बसवावा, अन्यथा देशातील सर्व विरशैव बांधव आंदोलन करणार असल्याचा इशारा पश्चिम महारष्ट्र अध्यक्ष अरविंद भडोळे-पाटील, कर्नाटक संपर्क प्रमुख परमेश्वर अरबाळे, तालुकाध्यक्ष मल्लिनाथ श. पाटील यांनी दिला आहे. याप्रसंगी राहुल वाडे, रुद्रय्या स्वामी, शिवराज जकापुरे, शिवशंकर स्वामी, धर्मा गुंजले, आनंद बुक्कानुरे, प्रशांत लोकापुरे, ऋषी लोणारी, धनराज पाटील, सत्यजित लोके, प्रीतीश किलजे, सौरभ हळके, प्रसन्न गवंडी, रोहित देशमख, रोहन देशमुख, मल्लिनाथ खुबा, सिद्धाराम माळी, निखिल पाटील, सुनील पाटील, अशोक जाधव, आदर्श पडणुरे, सिद्धाराम मशेट्टी, शरणू कापसे, दीपक रोडगे, शेखर वाले, संतोष स्वामी, मदन राठोड, नागू होळीकट्टी, सचिन पाटील, राज मद्रीकर, अनिल माने, अनिल नागणसूर, सिद्धाराम पाटील, शरण नडगेरी, बसवराज पटणे आदी उपस्थित होते.

# शासकीय कामात अडथळा; मोहोळमध्ये एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ जानेवारी-**

तुला नीट वाचायला येताय का? तू काय करतो? नीट वाग, असे म्हणत मुख्याधिकाऱ्यांच्या अंगावर धावून आलेल्या सुदर्शन दत्तात्रय कळसेविरुद्ध मोहोळचे मुख्याधिकारी डॉ. योगेश अशोक डोके यांनी शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

मोहोळ नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके (वय ३८) हे नेहमीप्रमाणे आपल्या कार्यालयात काम करत बसले होते. यावेळी त्यांच्यासमोर माहिती अधिकार अर्जावरील अपील सुनावणीचे कामकाज चालू होते. यावेळी अचानकपणे मोहोळच्या कळसे नगरमध्ये राहणारे सुदर्शन दत्तात्रय कळसे हे तिथे आले. अचानकपणे डोके यांच्या अंगावर येऊन तू काय काम करतोस? वाचायला येतंय का तुला? नीट वाग असे मोठ्या मोठ्याने म्हणत शिवीगाळ करत असताना शेवटी तो डोके यांना मारण्याच्या इराद्याने त्यांच्या अंगावर हात उगारला आणि दमदाटी करू लागला. यावेळी नगरपालिका कार्यालय उपस्थित असलेले रणजीत कांबळे, योगेश सूर्यकांत डोके, दिनेश गायकवाड, किशोर स्वामी, दिलीप जाधव, कुणाल मोरे, अजित दानोळे, रोहित कांबळे, शिवरत्न आतकरे आदी कर्मचारी हजर होते. त्यावेळी सुदर्शन कळसे याने किशोर स्वामी व दिनेश गायकवाड यांना सुद्धा माझा अर्ज कुठे आहे? माझी फाईल कुठे आहे? अशी जोरजोराने ओरडत विचारणा केली आणि शिवीगाळ करून मारहाण करण्याची धमकी दिली आणि तिथून निघून गेला. त्यामुळे शासकीय कामात अडथळा केला म्हणून आणि अंगावर मारहाण करण्याच्या उद्देशाने आला म्हणून सुदर्शन कळसे याच्याविरुद्ध मोहोळ पोलीस ठाण्यात अधिकारी डॉ. योगेश डोके यांनी दाखल केले आहे.





# काव्य वाचनात मराठी भाषेचा झाला जागर

- कधी टाळ्या, कधी शिट्या तर कधी उडाले हास्यांचे फवारे!
- महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांच्या कवितेने भरला रंग!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत काव्य वाचन कार्यक्रमात विविध कवितांद्वारे मराठी भाषेचा जागर झाला. मान्यवर कवींनी एकापेक्षा एक सरस अशा आशय घन कविता सादर केल्या. कधी टाळ्या, कधी शिट्या तर कधी हास्याचे फवारेही उडाले. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी उत्स्फूर्तपणे कविता सादर केल्याने या काव्यमैफलीत चांगलाच रंग भरला.

महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघ यांच्या सहकार्याने २० ते ३० जानेवारी २०२५ पर्यंत आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत आज इंद्रभुवन इमारतीच्या मागील बाजूस काव्यवाचन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विचारमंचावर महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, कार्यवाह गिरीश दुनाखे, मसाप दक्षिण सोलापूर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे, अ.भा. मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखा अध्यक्ष विजय साळुंखे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, दैनिक संचारचे वरिष्ठ उपसंपादक प्रशांत जोशी, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कवी राजेंद्र भोसले, गिरीश दुनाखे, मारुती कटकधोंड, रामचंद्र धर्मसाले, कालिदास चवडेकर, डॉ. शिवाजी शिंदे, गोविंद काळे, वंदना कुलकर्णी, रेणुका महागावकर, रेणुका बुधाराम कवींनी आपल्या एकापेक्षा एक सरस अशा कविता सादर केल्या. वास्तववादी कविता, जय मराठी, पान्हा नभाला फुटला, मराठीचे वैभव, म्हणूनच लोक चांगला म्हणू लागले, प्रवास, अजूनही मला चांगले आठवते, आम्ही सोलापूरकर आमचा नाद करायचा नाही, अशा कविता होत्या.

**आणि उपायुक्त लोकरे यांनी सादर केली वारा करेल घात!**

दरम्यान, या काव्यवाचन कार्यक्रमात उपायुक्त आशिष लोकरे यांनी दोन कविता सादर केल्या. यामुळे या कार्यक्रमात चांगलाच रंग भरला. उत्साह निर्माण झाला. मनमोहक तुझ्या नयनात सखे विस्तारली सांजवात, हळूच पदर सावर सखे वारा करेल घात...! आणि संघर्ष ही आशयघन कविता सादर केली. या कवितांना उपस्थितांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला.

**आज मान्यवरांची व्याख्याने**

बुधवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता महापालिका आवारातील इंद्रभुवन इमारतीच्या मागील बाजूस खुल्या जागेत मराठी भाषा- अभिजात दर्जा आणि आपण या विषयावर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांचे तसेच मराठी भाषा आणि पत्रकारिता या विषयावर जेष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे यांचे व्याख्यान होणार आहे.

# गडचिरोलीत वृत्तपत्र विक्रेत्यांचे दोन दिवसीय राज्य अधिवेशन

**वर्धा, २१ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन २६ व २७ जानेवारी रोजी गडचिरोली येथील संस्कृती सांस्कृतिक हॉल येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर यांनी दिली. पाटणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सो वार २७ रोजी सकाळी ११ वाजता लॉयड्स मेटल्स स्टील प्लांट कोनसरी कंपनीचे संचालक कर्नल विक्रम मेहता यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी खनिकर्म व शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर राहतील. यावेळी ठाण्याचे आमदार संजय केळकर, खा. नामदेव किरसान, आ. मिलिंद नरोटे, आ. धर्मरावबाबा आत्राम, आ. रामदास मसराम, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिपचे माजी उपाध्यक्ष मनोहर पोरेटी, माजी खासदार अशोक नेते, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार कृष्णा गजबे, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून राज्य संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार, सरचिटणीस विकास सूर्यवंशी, राजेंद्र टिकार, शिवगोंड खोत, अतुल गण्यारपवार, नगराध्यक्ष सुरेश पोरेड्डीवार, विजय गोरडवार उपस्थित राहणार आहे. २६ रोजी सायंकाळी ४ वाजता संघटनेच्या केंद्रीय समितीची बैठक होईल. ५ वाजता राज्य संघटनेच्या कार्यसमितीची बैठक, ६ वाजता राज्य संघटनेची सर्वसाधारण सभा होईल. रात्री ८ वाजता खुली चर्चा होईल. खुले अधिवेशन २७ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना या अधिवेशनासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सुनील पाटणकर, बालाजी पवार, विकास सूर्यवंशी, राजेंद्र टिकार, शिवगोंड खोत, दत्तात्रेय घाडगे, संजय पावसे, गोपाळ चौधरी, विनोद पन्नासे, दिनेश उके, अधिवेशनाचे आयोजक गडचिरोली जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष अनिल बाळेकरमरकर यांनी केले आहे. वर्धा येथून या अधिवेशनाला ५० पेक्षा अधिक विक्रेते जाणार आहे, अशी माहिती शहर सचिव गजानन मसने व जिल्हा सचिव बंडू मुळे यांनी दिली.

# भाजपाने ठरवले संधिसाधू हिंदू

**नवी दिल्ली, २१ जानेवारी**

रामायणातील सोन्याचे हरीण आणि सीताहरणाचे उदाहरण देतांना चुकीचे संदर्भ दिल्यामुळे भाजपाने अरविंद केजरीवाल यांना घेरले. त्यांच्या चुकीवर बोट ठेवत भाजपाने त्यांना संधिसाधू हिंदू म्हटले आहे.

केजरीवालांची पहिली चूक म्हणजे भगवान राम खाण्यापिण्याच्या साहित्याची व्यवस्था करण्यासाठी जंगलात गेले होते, असे ते म्हणाले. प्रत्यक्षात राम सीतेच्या हट्टावरून सोन्याच्या हरणाचा पाठलाग करत जंगलात गेले होते. रावण सोन्याचे हरीण बनून आला, असा दुसरा खोटा संदर्भ केजरीवालांनी दिला. प्रत्यक्षात रावण नाही तर मारीच राक्षस सोन्याच्या हरिणाचे रूप घेऊन आला होता. केजरीवालांनी केलेली आणखी एक चूक म्हणजे सीतने लक्ष्मणाजवळ नाही, तर रामाजवळ सोन्याच्या हरणाचा हट्ट धरला होता. रावण ब्राह्मणाचे रुप घेत भिक्षा मागायला आला होता. वाचवा अशी रामाच्या आवाजातील किंकाळी ऐकू आल्यामुळे सीतेने रामाच्या मदतीसाठी लक्ष्मणाला पाठवले होते. आपण कसे हिंदुत्ववादी आहे, आपला रामायण आणि महाभारत या धर्मग्रंथांचा कसा अभ्यास आहे, हे दाखवून देण्यासाठी केजरीवाल यांनी सोन्याचे हरीण आणि सीताहरणाची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला, पण तो त्यांच्याच अंगलट आला. नवी दिल्ली मतदारसंघातील भाजपा उमेदवार परवेश वर्मा यांनी केजरीवाल यांच्यावर जोरदार हल्ला चढवला, केजरीवाल यांचे हिंदुत्व निवडणुकीपुरते असल्याचा आरोप केला.

# अक्कलकोटमध्ये आठ दुचाकी जप्त; चोर अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२१ जानेवारी-**

अक्कलकोट फतेसिंह मैदानजवळून दोन दिवसापूर्वी चोरीस गेलेली मोटारसायकल फक्त चार दिवसात शोध लावून मुद्देमाल जप्त करण्यात आले. उत्तर पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या पथकाला मोठा यश आले आहे. यात एकूण ८ मोटार सायकली जप्त करून दोघा सराईत आरोपींना अटक केली आहेत.

समर्थ कामाठी, रमेश ममाणे यांची मोटासायकल चोरीस गेली होती. याबाबत गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पवार व डी. बी. पथकातील अंमलदारांनांनी दोन्ही गुन्ह्यातील मोटारसायकल चोरांचा शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणला. पोलिसांनी शोध घेऊन दोन आरोपींना अटक करुन ८ मोटारसायकली जप्त केल्या. ही कामगिरी पोलीस निरीक्षक राजेद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पाडुरंग पवार, पोहेको महादेव चिंचोळकर, पाहेको गणेश अंगुले, पोको प्रमोद शिंपाळे, शिवलिंग स्वामी, पोको श्रीकांत जवळगे, केदार सुतार यांनी तपास केला.

# अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्टतर्फे शुक्रवारी रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२१ जानेवारी-**



अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्ट व डॉ. हेडगेवार ब्लड बॅक सोलापूर यांच्यावतीने शुक्रवारी २४ जानेवारीला नविन राजवाडा येथे सकाळी ९ पासून दुपारी ४ वाजेपर्यत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. गरजूंना योग्यवेळी तात्काळ रक्त उपलब्ध झाल्यास एखादयास जीवनदान देण्याची शक्ती रक्तदानामध्ये आहे. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. अक्कलकोट संस्थानचे राजासाहेब श्रीमंत मालोजीराजे (तिसरे) संयुक्ताराजे भोसले यांच्या वाढदिवसानिमित्य रक्तदान शिबीर उपक्रम राबविण्यात येणार आहे.

# ज्येष्ठ पत्रकारांना एप्रिलपासून 20 हजार मानधन

- उपमुख्यमंत्री अजित पवार: 'त्या' सूत्रालाही जीवन गौरव पुरस्कार द्या
- विधिमंडळ वार्ताहर संघाच्या कार्यक्रमात चौफेर फटकेबाजी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी,**
**मुंबई, दि. २१ जानेवारी-**

पत्रकार सन्मान योजनेसाठी ५० कोटीचा अतिरिक्त निधी वर्ग करण्यात आला असून यावर्षी एप्रिलपासून जेष्ठ पत्रकारांना अकरा हजाराऐवजी वीस हजार मानधन दिले जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर पुरस्कार वितरण कार्यक्रमात केली.

जागतिकीकरणामुळे प्रसार माध्यमात ही आमूलाग्र बदल होत आहेत. त्यांच्यासमोरील स्पर्धा व आव्हाने वाढली असलीतरी टीआरपीच्या नादात सुत्रांच्या हवाल्याने काहीही बातम्या चालविल्या जातात. मीडिया ट्रायल चालवली जाते. त्यांच्या या बातम्यामागील सूत्र कोण असतो?, याचा कधी पत्ता लागत नाही त्यामुळे त्या सूत्रालाही एकदा जीवन गौरव पुरस्कार द्यायला पाहिजे, पत्रकार संपादकापासून दूर राहण्याचा माझ्या स्वभावामुळे मला जास्त तोटाच झाला आहे, अशी एकापेक्षा एक जोरदार टोलेबाजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी केली. त्यासाठी निमित्त होते ते मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे.

मंत्रालयातील सहाव्या मजल्यावर समिती सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते विधिमंडळ वार्ता संघ कडून देण्यात येणाऱ्या २०२३ व २०२४ या वर्षाच्या विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले यावेळी ज्येष्ठ पत्रकार व विचारवंत विजय चोरमारे प्रमुख उपस्थित होते. सुमारे अर्धा तासाच्या भाषणात उपमुख्यमंत्री पवार यांनी विधानसभा निवडणुक निकालावेळी पोस्टल मतापासून ते अभिनेता सैफअली खानवरील हल्याबाबतच्या उथळ वार्तांकनापर्यतची अनेक उदाहरणे देत पत्रकारांचे चिमटे काढले. ते म्हणाले, माध्यमात सध्या सूत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे .सूत्रांच्या भरोशावर माध्यमं अनेक बातम्या देत असतात, आम्हाला वाटते कोणतरी असावे. मात्र या सूत्रांच्या हवाल्यांना माझ्याबाबत काही बातम्या जशा माध्यमातून दिसायला सुरुवात झाली मला माहित नसणाऱ्या माझ्याबरोबर कधी न घडलेल्या अनेक घटना सूत्रांच्या माध्यमातून कल्पोकल्पित बातम्या दिल्या जात असल्याचे स्पष्ट झाले.

या सुत्राला कधीतरी समोर आणून जीवन गौरव पुरस्कार द्यायला हवा, असे सांगून ते म्हणाले तंत्रज्ञानाचा मोठा वापर माध्यमक्षेत्रात झाला आहे. आता बातम्या इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म किंवा सोशल मीडिया माध्यमातून काही सेकंदात पोहोचतात. स्पर्धेच्या युगात आपल्यावरही दबाव , अडचणी वाढल्या आहेत. मात्र सगळीकडे नकारात्मक गोष्टी घडत असताना काही चांगल्या सकारात्मक गोष्टी सुद्धा समाजासमोर आणणे आवश्यक आहे ,असे माझे मत आहे. केवळ टीआरपी वाढवण्यासाठी चुकीच्या बातम्या देणे योग्य नाही.त्यामुळे संबंधित घटकांवर त्याचा मोठा परिणाम होतो.असे सांगून पवार म्हणाले,' विधानसभा निवडणूक निकालावेळी पोस्टल मतमोजणीमध्ये मी मागे पडल्याचे चॅनेलवाल्यांनी दाखवायला सुरुवात केल्यानंतर माझी ८७ वर्षाची आई काठेवाडीला घरामध्ये देवघरात जाऊन माळ जपत बसली होती, तिला धक्का बसला होता, अशावेळी जबाबदारीने रिपार्टींग केले पाहिजे. त्याचप्रमाणे एखाद्या प्रकरणावर न्याय प्रक्रिया सुरू असताना माध्यमांमध्ये त्या प्रकरणावर मीडिया ट्रायल चालवली जाते. त्यातून त्या प्रकरणाचा आधीच निकाल लावण्यासारखे वातावरण निर्माण केले जाते.त्यामुळे समाजात पूर्वग्रह तयार होतो आणि जो न्यायालयीन प्रक्रियेवर अप्रत्यक्षपणे परिणाम देखील करू शकतो . त्यामुळे एखाद्या व्यक्तीचे जीवन उध्वस्त होऊ शकते, त्याची किंमत मी मोजलेली आहे. माझ्यावर जलसिंचन विभागात ७० हजार कोटींचा भ्रष्टाचाराचा आरोप झाला. वास्तविक राज्य सरकारची निर्मिती झाल्यापासून त्यासाठी ४४ हजार कोटी खर्च झाले होते. मग ७० हजार कोटीचा घोटाळा कसा झाला?, अशा प्रश्न असताना विरोधक व मीडियाने प्रकरण लावून धरल्याने माझी एसीबी, ईडी, सहकार विभाग व न्यायालयीन चौकशी लागल्या होत्या, असे सांगून ते म्हणाले माध्यमाचे क्षेत्र हे समाजाला दिशा देणारा क्षेत्र आहे म्हणून बातम्या देताना संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. कोणती बातमी प्रसारित करण्यापूर्वी तिची सत्यता तपासा अफवा पसरू नये , यांची खबरदारी घ्यावी, उद्याच्या काळामध्ये माध्यमे सुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या ( एआय) तावडीतून सुटणार नाही. त्याला टक्कर देण्यासाठी तसे मनुष्यबळ विकसित करण्याचे आव्हान आपल्यासमोर असल्याचे त्यांनी सांगितले.



## अग्रलेख...

# ट्रम्प २.० च्या निमित्ताने....

२० जानेवारी २०२५ रोजी ७८ वर्षांचे डोनाल्ड जॉन ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली. ते अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष होते आणि आता ते ४७ वे राष्ट्राध्यक्ष बनले आहेत. अमेरिकेच्या आणि एकूणच जगाच्या राजकारणात ट्रम्प यांचे व्यक्तिमत्त्व फटकळ आणि काही बेभरवशाचे म्हणून प्रसिद्ध आहे. 'अमेरिका फर्स्ट' हे त्यांचे धोरण आणि ब्रीदही आहे. तरीही त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताला अनेक प्रकारच्या अपेक्षा आहेत. २०१७ ते २०२१ पर्यंतच्या ट्रम्प यांच्या कारकीर्दीदरम्यान त्यांनी भारताला अनेक प्रकारचे सहकार्य केले. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदींशी त्यांची जवळची मैत्री आणि भारतीय-अमेरिकन समुदायाबद्दलची त्यांची भावना या दोन गोष्टी ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीबद्दल भारताला आश्वस्त करणाऱ्या वाटतात. जागतिक राजकारण व अर्थकारणात अमेरिका हा सर्वांत महत्त्वाचा देश. त्यांना त्यांचा देश सर्वांहून महत्त्वाचा वाटतो, यात गैर नाही. त्यामुळे भारताने एकीकडे अपेक्षा ठेवतानाच आपल्या देशाच्या हिताला प्राधान्य देऊनच ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीच्या संदर्भात पावले उचलली पाहिजेत. इमिग्रन्ट्स अर्थात स्थलांतरितांच्या संदर्भात कठोर भूमिका घेतलेली असतानाच भारतीय-अमेरिकन समुदायाचे योगदान ट्रम्प यांनी मान्य केले होते. २०१९ च्या 'हाऊडी मोदी!' या ह्यूस्टनमधील कार्यक्रमात ट्रम्प यांनी तंत्रज्ञान, औषध आणि व्यवसाय यासारख्या क्षेत्रात अग्रणी असलेला समुदाय म्हणून भारतीय-अमेरिकन लोकांचे कौतुक केले आणि ते लोक अमेरिकेसाठी 'संपत्ती' आहेत, असेही म्हटले. याव्यतिरिक्त ट्रम्प प्रशासनाने अनेक भारतीय-अमेरिकन लोकांना प्रमुख पदांवर नियुक्त केले. ट्रम्प यांचा दुसरा कार्यकाळ सुरू होत असताना आपण आशावादी राहायला हरकत नसली, तरी भारत-अमेरिकेच्या संबंधांची पुनर्व्याख्या होईल, असे वाटते. इमिग्रेशन आणि व्यापार हे मुद्दे त्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. याशिवाय, दहशतवादाच्या विरोधातील लढाई आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य यांतही काही ठोस पावले उचलली जाण्याची शक्यता आहे.

ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेताच अमेरिकेच्या धोरणातील बदलांचे सूतोवाच केले. त्याकडे भारताने डोळसपणे पाहिले पाहिजे. शपथविधीनंतरच्या अर्ध्या तासाच्या भाषणात त्यांनी अमेरिका फर्स्ट धोरणांतर्गत इतर देशांवर काही अंकुश आणण्याची घोषणा केली. आतापर्यंत आम्ही इतर देशांना श्रीमंत बनविण्यासाठी आपल्या देशातल्या लोकांवर कर लादत होतो. आता ही स्थिती बदलेल आणि आपल्या देशातील लोकांना श्रीमंत बनवण्यासाठी इतर देशांवर कर लादले जातील. निवडणूक जिंकल्यावर त्यांनी ब्रिक्स देशांवर (ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका) १०० टक्के टॅरिफ लादण्याची तसेच कॅनडा आणि मेक्सिकोचाही यात समावेश करण्यासंबंधी सूतोवाच केले होते, हे लक्षात घेतले तर त्यांच्या ताज्या घोषणेचा अर्थ कळतो. त्यांच्या या घोषणेचा संबंध अमेरिकेच्या व्यापारातील तोट्याशी आहे. त्यामुळे त्यांना काही ना काही प्रमाणात बोलल्याप्रमाणे वागावे लागेलच. हे सारे असले तरी भारताशी असलेले अमेरिकेचे संबंध ट्रम्प यांच्या कार्यकाळात अधिक बळकट होतील, अशी अपेक्षा करण्यास वाव असण्याची बरीच कारणे आहेत. त्यातले सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे भारत आणि अमेरिका हे जगातील सर्वांत मोठे व प्रभावी लोकतांत्रिक देश आहेत. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे चीनच्या विस्तारवादी, विनाशवादी भूमिकेबद्दल दोन्ही देशांना वाटणारी चिंता आणि जागतिक समुदायाला या दोघांकडून असलेल्या अपेक्षा. तिसरा घटक म्हणजे अमेरिकेत राहणारे आणि राहायला-काम करायला जाणारे भारतीय. अमेरिकेत सुमारे ५० लाख भारतीय राहतात. अमेरिकेच्या लोकसंख्येच्या तुलनेत हा आकडा अंदाजे दीड टक्के. अमेरिकेत राहणारे भारतीय हे श्रीमंत लोक आहेत. अमेरिकेतील अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रमुख भारतीय लोक आहेत. छोटा-मोठा व्यवसाय करणारे भारतीय लोकही अमेरिकेत मोठ्या संख्येने आहेत. अमेरिकेतील मोठ्या कंपन्यांचे व्यवहार, वैद्यकीय सेवा, सॉफ्टवेअरमधील प्रगती या सर्वांसाठी त्या देशाला भारत व भारतीयांची गरज आहे.

अमेरिकेची ही गरज भागवू शकेल, असा एकही मोठा समुदाय जगाच्या पाठीवर नाही. त्यामुळे ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीत अमेरिका फर्स्ट कायम ठेवूनही भारताच्या व भारतीयांच्या संदर्भात ट्रम्प यांना, मनात आले तरी, फार टोकाचे काही करता येणार नाही असे दिसते. अमेरिका आणि चीन यांच्यातील स्पर्धा भारताच्या फायद्याची आहे. ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका या चार देशांतील संरक्षणविषयक भागीदारी गटाला क्वाड या नावाने ओळखले जाते. 'क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटीज डायलॉग' हा त्या नावाचा विस्तार. क्वाड अलायन्सला अमेरिकेचे खंदे समर्थन आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेश हा मुक्त व खुला असावा, यासाठी चीनवर अंकुश हवाच. चीनला रोखायचे असेल तर अमेरिकेला भारतासोबत राहावेच लागेल; संबंध कायम ठेवावेच लागतील, हे स्पष्ट आहे. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या संघर्षांवर उपाय शोधण्यासाठी भारत मध्यस्थी करू शकतो, हे आता सिद्ध झालेले आहे. भारताची ही क्षमता ट्रम्प वापरतील, असे आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या तज्ज्ञांना वाटते. रशिया-युक्रेन युद्ध आणि मध्य-पूर्वेतील संघर्षांवर भारतासारखा अलिप्त देशच मध्यस्थी करू शकतो. त्यातून भारताचा जागतिक प्रभाव वाढणार आहे. त्याचा फायदा भारताला होऊ शकतो.

ट्रम्प यांचा चीनवर असलेला राग सर्वांना माहिती आहे. त्यांनी अमेरिकेतील कंपन्यांना चीनवर अवलंबून न राहता इतर बाजारपेठांचा शोध घेण्याचा सल्ला यापूर्वीही दिला आहे. चीनला पर्याय म्हणून भारताचाच प्राधान्याने विचार होतो. अमेरिकन मालासाठी मोठी बाजारपेठ आणि अमेरिकन कंपन्यांसाठी कुशल मनुष्यबळ पुरवणारा देश म्हणजे भारत. ट्रम्प यांच्याच काळात अमेरिकेने भारताला क्रूड ऑईल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरू करण्यात आला. भारताचे मध्य-पूर्वेवरील अवलंबित्व त्यामुळे कमी झाले. त्यातून भारताला ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने ठोस पावले टाकता आली. भारत-अमेरिका यांच्यातील संरक्षणविषयक सहकार्य तसे जुनेच आहे. ते ट्रम्प यांच्या कार्यकाळात आणखी विस्तारेल. ट्रम्प यांच्याच पुढाकाराने भारत व अमेरिका यांच्यात बेका (बेसिक एक्सचेंज अँड को-ऑपरेशन अग्रीमेंट) नावाचा करार झाला होता. त्या करारामुळे भारताच्या संरक्षणविषयक निर्णयांसाठी अमेरिकन उपग्रहांची विदा (डेटा) भारताला मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यावर, विशेषत: दहशतवादाच्या विषयावर दबाव आणणे आवश्यक आहे. तो दबाव अमेरिका आणू शकतो. मात्र, त्यासाठी भारताची साथ हवी. अर्थात भारत आणि अमेरिका या दोघांचेही सहकार्य असेल तर पाकिस्तान आणि बांगलादेशवर नियंत्रण आणणे शक्य आहे. ट्रम्प यांनी पाकिस्तानला लष्करी सहाय्य देण्यास नकार दिला होता. पाकिस्तानच्या भूमीवरून अतिरेकी कारवाया चालतात आणि त्या रोखण्यासाठी पाकिस्तानचे सरकार काहीही करीत नाही, असा त्यांचा आक्षेप होता. पुलवामा, बालाकोट या घटनांच्या वेळी ट्रम्प यांनी भारताचे समर्थन केले होते. एकुणात ट्रम्प यांच्या दुसऱ्या कारकीर्दीकडून भारताने अपेक्षा ठेवावी, अशी बरीच मोठी पृष्ठभूमी तयार आहे. तरीही अमेरिका फर्स्ट ही ट्रम्प यांची भूमिका अमेरिकेतील भारतीयांना आणि आंतरराष्ट्रीय पटलावर भारताला अडचणीची ठरू शकते. त्यावर मात करणे आव्हानात्मक आहे. व्हिसावर आणलेले निर्बंध किंवा व्यापारविषयक अडचणी यांचीदेखील भारताला हाताळणी करावी लागणार आहे. संरक्षण, दहशतवादाचा विरोध, चीनचा विरोध, इंडो-पॅसिफिक प्रदेशातील सहयोग हे सारे मुद्दे दोन देशांना जवळ आणणारे. पण, अर्थकारणातील फायदा-तोट्याचे गणित प्रत्येकाला असतेच. चीन आणि पाकिस्तानला विरोध करायचा असेल तर भारताला जवळ घ्यावेच लागेल. एकूण जागतिक परिस्थितीचा विचार केला तर सदासर्वकाळ ट्रम्प महाशय भारताच्या बाजूनेच राहतील आणि भारताच्या हिताचेच निर्णय घेतील, अशा भ्रमात राहण्याचे कारण नाही. त्यांना त्यांच्या देशाचे भले पाहणे भाग आहे. ते आपण मान्य केले पाहिजे आणि त्याच वेळी आपल्या देशाचे भले पाहण्याचा आपला अधिकार राखून अमेरिकेशी संबंध ठेवले पाहिजेत.

## चिंतन

# हिंदू संस्कृतीत अर्थशास्त्राची बीजे

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

सध्या उत्तरप्रदेशातील प्रयागराज शहरात गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या संगमावर जगातील सर्वात मोठे तात्पुरते शहर स्थापन झाले आहे. १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत या तात्पुरत्या शहरात जगातील सर्वात मोठा मेळा 'महाकुंभ' आयोजित असून ४२०० हेक्टर क्षेत्रात पसरलेल्या महाकुंभ मेळ्याच्या परिसरात केवळ भारतातीलच नाही तर जगभरातून भाविक आणि पर्यटक येऊ लागले आहेत. यावेळी महाकुंभ मेळ्यात ४०-४५ कोटी भाविक आणि पर्यटक येतील, असा दावा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला आहे. यामुळेच महाकुंभ मेळ्यावर लहान-मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे लक्ष आहे. महाकुंभ मेळ्याच्या तयारीसाठी केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकारनेही मोठ्या प्रमाणात पैसे गुंतवले असून महाकुंभ मेळा केवळ उत्तरप्रदेशच नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेला नवीन चालना देईल, असा अंदाज आहे. भारतातील जवळजवळ सर्व राज्यांमध्ये अनेक प्रमुख धार्मिक स्थळे आहेत, जी राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. आत्ताच अयोध्या आणि काशीमध्ये हे दिसून आले की, उत्तरप्रदेशच्या अर्थव्यवस्थेला येथून अचानक बूस्टर डोस कसा मिळाला आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते सप्टेंबर या काळात १३.५६ कोटी लोकांनी अयोध्येत दर्शनासाठी भेट दिली होती, याच काळात १२.५१ कोटी लोकांनी ताजमहाल पाहण्यासाठी आग्र्याला भेट दिली होती. यावेळी नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी ८ लाख लोक काशी विश्वनाथ कॉरिडॉरवर दर्शनासाठी पोहोचले. गुजरात, ओडिशा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू यांसारख्या राज्यांमध्ये मंदिरांमधून मिळणारे उत्पन्न राज्य सरकारला आधार देत आहे. राजस्थान, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश यासह इतर राज्यांमध्ये मोठे मेळे भरतात. प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यासाठी केंद्र व राज्य सरकारने सुमारे १५ हजार कोटी रुपयांचे बजेट वाटप केले आहे. ५६६ प्रकल्प राबविण्यात आले आहेत.

मेळा परिसर उभारण्यात २१ विभागांनी सहभाग घेतला आहे. यावेळी मेळा क्षेत्रही वाढविण्यात आले आहे. २०१९ च्या अर्धकुंभात मेळा क्षेत्र ३२०० हेक्टरमध्ये पसरलेले होते, जे यावेळी ४२०० हेक्टरमध्ये पसरलेले आहे, यावेळी लांबी ८ किलोमीटरवरून १२ किलोमीटरपर्यंत वाढली आहे. भाविक आणि पर्यटकांसाठी १८५० हेक्टरमध्ये पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. पुलांची संख्या २२ वरून ३० करण्यात आली आहे. दीड लाख तात्पुरती आणि दीड लाख कायमस्वरूपी शौचालये बांधण्यात आली आहेत. मेळा परिसरात १.७५ लाखांहून अधिक तंबू उभारण्यात आले असून २५ हजार लोकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. मेळा परिसर ६७ हजार एलईडी दिवे, फ्लडलाईटनी प्रकाशमान करण्यात आला आहे. उत्तरप्रदेश सरकारने ७२६०.४५ कोटी रुपयांचे बजेट पारित केले आहे; ज्याद्वारे ४४१ प्रकल्प आणि १२५ विभागीय प्रकल्प पूर्ण झाले आहेत. यापैकी ७५ टक्के इमारतींमध्ये कायमस्वरूपी संरचना आहेत. यातील जास्तीत जास्त ४२ टक्के रक्कम पूल आणि रस्त्यांच्या विकासावर खर्च करण्यात आली आहे.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दावा केला आहे की, महाकुंभ मेळ्यामुळे राज्यात २ लाख कोटी रुपयांची आर्थिक वाढ होईल. २०१९ च्या कुंभमेळ्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेत १.२ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले. उत्तरप्रदेश सरकारला भाडे, सेवा शुल्क आणि करांच्या स्वरूपात महसूल मिळेल. परिसरातील टेंट सिटीमध्ये २००० रुपयांपासून ते ८० हजार रुपयांपर्यंतचे आलिशान तंबू उपलब्ध आहेत. महाकुंभ मेळ्याच्या तयारीतूनच ४५ हजारांहून अधिक कुटुंबांना रोजगार मिळाला आहे. मेळ्यातून देशभरातील लोकांना रोजगार आणि आर्थिक लाभ मिळत आहे. इतिहासावर नजर टाकली तर, १८८२ मध्ये ब्रिटिश राजवटीत प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याच्या आयोजनावर सरकारी तिजोरीतून २०,२२८ रुपये खर्च झाले होते, तर सरकारला २९,६१२ रुपये नफा झाला होता आणि त्यातून ४९,८४० रुपये उत्पन्न मिळाले होते. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार २०२१ मध्ये देशात ६७.७ कोटी लोक धार्मिक पर्यटनासाठी बाहेर पडले होते. २०२२ मध्ये ही संख्या १४३.९ कोटींवर पोहोचली. २०२२ मध्ये धार्मिक पर्यटनातून मिळालेले उत्पन्न ७.९ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून १६.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढले होते.

२०२३ मध्ये भारतातील धार्मिक पर्यटन बाजारपेठ ११७२.१ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची होती. २०२४ ते २०३२ दरम्यान १७.७५ टक्के चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने ५१०२.३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. धार्मिक स्थळांकडे भाविक आणि पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी अनेक छोट्या-मोठ्या गोष्टी सुरू केल्या जात आहेत. रिटेल स्टेट कन्सल्टंट सीबीआरआयने त्यांच्या अहवालात म्हटले आहे की, रिटेल ब्रँड्सनी तिरुपती, पुरी, अमृतसर, अजमेर यांसारख्या मध्यम आकाराच्या शहरांमध्ये त्यांची उत्पादने लाँच केली आहेत. अमृतसर, अजमेर, कटरा, सोमनाथ, वाराणसी, शिर्डी, पुरी, अयोध्या, मथुरा, तिरुपती, द्वारका, बोधगया, गुरुवायूर आणि मदुराई येथे आध्यात्मिक पर्यटनाच्या वाढीचा फायदा किरकोळ ब्रँड घेत आहेत. जगातील सर्व मोठे अन्न उद्योग भारतातील धार्मिक पर्यटन स्थळांकडे वळले आहेत.

२०१४ मध्ये देशात सत्ता हाती घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धार्मिक स्थळांच्या विकासावर विशेष भर दिला आहे. सरकार धार्मिक स्थळांच्या पुनरुज्जीवन आणि दळणवळणावर खूप वेगाने काम करत आहेत. स्वदेश दर्शन आणि प्रसादसारख्या विविध योजनांच्या माध्यमातून १२० प्रकल्प राबविण्यात आले आहेत; ज्यावर ६,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झाला आहे. देशात १.५ लाख किलोमीटरचे रस्त्यांचे जाळे पसरले आहे. ५०० हून अधिक नवीन हवाई मार्ग आणि १५० हून अधिक नवीन विमानतळांमुळे हवाई संपर्क वाढला आहे. केंद्र आणि उत्तरप्रदेश सरकार भारतासह जगभरात महाकुंभाचा प्रचार करीत आहेत; जेणेकरून अधिकाधिक लोकांना प्रयागराजमध्ये आणता येईल. महाकुंभात प्रथमच उच्च तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. डिजिटल एक्सपिरीयन्स सेंटरपासून ते कुंभ सहायक चॅटबॉटपर्यंत, जे ११ भारतीय भाषांमध्ये संवाद साधण्यास सक्षम आहे, सुरू करण्यात आले आहे. चेहरा वाचणारे कृत्रिम बुद्धिमत्तेसह सुसज्ज कॅमेरे बसवण्यात आले आहेत. ड्रोन विरोधी यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे. शौचालय स्वच्छतेपासून ते पोलिस यंत्रणेपर्यंत सर्व गोष्टींसाठी ॲप्स बनवण्यात आले आहेत. जगात पहिल्यांदाच, गुगल मॅप्स एका तात्पुरत्या शहरात नेव्हिगेशन सुविधा प्रदान करीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाकुंभाला 'महापर्व' म्हटले. या काळात जगातील सर्वात मोठा मानवांचा मेळावा होत असून गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या पवित्र संगमावर कोट्यवधी लोक सहा मोठ्या स्नान पात्रांवर स्नान करतील आणि हे स्नान देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवीन मार्ग दाखवेल; जे देशाला आध्यात्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या आणखी पुढे घेऊन जाईल. महाकुंभ हा केवळ स्नान आणि पुण्य मिळविण्याचा उत्सव नसेल तर तो उत्तरप्रदेश आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवीन दिशा आणि गती देईल. प्रयागराज मेळा प्राधिकरणाला महाकुंभातून सुमारे २००० कोटी रुपये मिळतील. जाहिरातींमधून ३० कोटी रुपये आणि अंदाजे १०० दुकानांमधून विक्रीतून ६० कोटी रुपये उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे. याशिवाय, विविध हॉटेल, रेस्टॉरंट्स, व्यापार क्षेत्र आणि प्रदर्शनांमधील उत्पादनांच्या विक्रीतून २५० कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

९९८७७४६७७६

## वेध

# तो सैफ होता म्हणूनी...

**विजय निचकवडे**

गरिबाचं कितीही मोठं दुःख असलं ना, ते नगण्य असं छोटेसं असतं. पण तेच एखाद्या श्रीमंत व्यक्तीला साधं खरचटलं तरी अनेकांच्या काळजाचे ठोके चुकतात. राजकारण्यांना कंठ फुटतो आणि मीडिया तर किंकाळ्या मारत सुटते. कारण 'ती' व्यक्ती सेलिब्रेटी असते! एका सेलिब्रेटीवरील अशाच हायप्रोफाईल हल्ल्याच्या निमित्ताने चार दिवस जे वातावरण ढवळून निघाले, कदाचितच सामान्यांसाठी हे झाले नसते! म्हणूनच तर 'तो सैफ होता म्हणूनी' असं कुठेतरी वाटून जातं. खरं तर दुःख, वेदना आणि कुणावर आलेली संकटे ही गरीब-श्रीमंत अशी मापदंड लावून मोजणे म्हणजे माणुसकीला तिलांजली दिल्यासारखे होईल. मात्र आज वास्तव हेच आहे. जिथे सख्खे नाते पैशात मोजले जाते. पैशासाठी रक्ताच्या नात्याचा विसर आम्हाला पडतो, तिथे दुःख, वेदनाही अशाच गरीब-श्रीमंतीच्या तराजूत मोजल्या जाऊ लागल्या आणि लोकांचे व्यवहार त्याच दृष्टीने बदलू लागले. खरं तर दुःख हे गरीब श्रीमंत किंवा संबंधित व्यक्तीची पत-प्रतिष्ठा पाहून ठरविले जायला नको, पण आज तेच होत आहे. चार दिवसांपूर्वी सिने अभिनेता सैफ अली खान यांच्या घरी चोरीच्या मानसिकतेने शिरलेला चोर, खान यांच्यावर झालेला चाकूहल्ला आणि त्यानंतर ज्या पद्धतीने राजकीय नेते, माध्यमे विशेषत्वाने इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रशासन आभाळ कोसळल्यागत वागू लागले; यातून लोकांचे दुःख आता वाटल्या गेल्याचाच भास होतो. एरवी एखाद्याच्या घरी हीच घटना घडली असती तर खरंच मुंबईत बसून राजकीय नेत्यांनी अशा पद्धतीने झालेल्या घटनेला घेऊन गळे काढले असते का? माध्यमांनीही खरंच एका चोरीच्या घटनेला अशा पद्धतीने जिव्हाळ्याचा विषय बनवून लावून धरले असते का? आणि पोलिस यंत्रणा इतक्या सजगतेने कामाला लागून जीवाचे रान करून चोरट्याला पकडण्यासाठी धावली असती का? कदाचित सामान्य माणूस या सर्व प्रश्नांची उत्तरे नक्कीच नाही असे देईल. पण या ठिकाणी 'तो सैफ होता म्हणूनी' सर्वकाही झाले.



सैफ यांच्यावरील झालेला हल्ला नक्कीच समर्थनार्थ किंवा दुर्लक्षित करण्यासारखा नाही, पण तो सैफ होता म्हणून जे काही झाले, ते सामान्य नागरिकांना त्यांची लायकी दाखवून देणारे आहे. पोलिसांची ३५ पथके हल्लेखोराला शोधण्यासाठी तैनात होतात. २०० पोलिस गराडा घालून एका झिलपट हल्लेखोराला पकडतात. आमचे नेते गळे काढू लागतात. कायदा सुव्यवस्था ढासळल्याचे छाती पिटून शांततात. काही जण सैफचे समर्थन करण्याच्या नादात विषयाला धार्मिक रंग देण्याच्या नादात हा हल्ला तैमूरवर तर नव्हता, असे बोलून प्रकरणाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करतात. तर दुसरीकडे माध्यमं जणू काही आभाळ कोसळल्यागत या विषयाचा किस काढू लागतात. मग सैफ ऑटोने दवाखान्यात गेल्यापासून बरेच काही त्यांना दाखववेसे वाटते. या सर्व गोष्टी कधी सामान्य लोकांच्या बाबतीत झाल्या आहेत का हो? १० वर्षांपूर्वी भंडाऱ्यात पटेल आणि शिंदे या दोन कुटुंबावर अशाच चोरीच्या हेतूने हल्ला झाला. पटेल कुटुंबाने आपली सून गमावली तर शिंदे कुटुंबातील लेकीचे आयुष्य कायमस्वरूपी अपंगत्वामुळे उद्ध्वस्त झाले. पण त्याचे दुःख ना राजकारण्यांना झाले, आज गळे काढणाऱ्या मीडियाला आणि पोलिस यंत्रणेलाही फारसे महत्त्व वाटले नाही? कदाचित ज्यांचे जीव गेले ते सेलिब्रेटी नव्हते म्हणून किंवा त्यांचे आडनाव 'खान' नसल्याने असावे! पालघरमध्ये दोन साधूंना ठेचून मारण्यात आले, तेव्हाही हे दुःख कुणाला मोठे वाटले नाही. गुन्हे अनेक घडतात. जे सैफ सोबत झाले, ते रोज कित्येकांसोबत होत असावे, पण त्याची तीव्रता कुणालाही जाणवत नसावी. आज ज्या पद्धतीने सैफचा विषय डोक्यावर घेतला गेला, नव्हे याला इव्हेंट बनवून मांडण्याचा प्रयत्न केला गेला, त्यात राजकारण्यांचे ढोंग, माध्यमांची अतिशयोक्ती आणि पोलिसांची सेलिब्रेटीप्रती असलेली सजगता दिसून आली. सगळ्यांची ही तळमळ खरंच सामान्यांच्या प्रती दिसली तर कदाचित सैफसारख्या व्यक्तींवर होणारे हल्ले चर्चेचा आणि उपहासाचा विषय होणार नाही. सैफचे घर राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यापासून चाकूचा तुकडा प्रदर्शनीत जतन करून ठेवण्याचा सल्ला देण्यापर्यंत जर लोकांच्या मनात सगळ्यांच्या वागण्याचे नकारात्मक भाव उमटत असतील तर 'तो सैफ होता म्हणुनीच' हा सर्व खटाटोप झाला, असेच म्हणावे लागेल.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# मुण्डकोपनिषदातील अंगीरस-शौनक संवाद

**प्रा. दिलीप जोशी**

दशोपनिषदातील अत्यंत महत्त्वाचा आणि आपला विज्ञानमय कोश पुष्ट करणारा उपनिषद म्हणजे 'मुण्डकोपनिषद' होय. हा उपनिषद अथर्ववेद अंतर्गत असल्यामुळे याला 'अथर्वेदीय उपनिषद' असेही म्हणतात. अथर्ववेदात प्रश्नोपनिषद, मुण्डकोपनिषद, माण्डुक्योपनिषद हे प्रमुख उपनिषद तर आहेतच; याशिवाय गर्भोपनिषद, ब्रह्मबिंदू, जलबिंदू, अमृतबिंदू, अथर्वशिखा, नारायण, तापिनी इत्यादी २४ गौण उपनिषदही आहेत. पण मुण्डकोपनिषद सर्व परिचित आणि संविधानात उल्लेखित उपनिषद आहे. मुण्डकोपनिषदाला 'मुण्डक' असे नामाभिधान का झाले ? या संबंधात विविध अभ्यासकांचे मत थोड्या फार भेदाने पाहावयास मिळते. 'मुण्ड' या शब्दावरूनच आपल्या लक्षात येईल की, मुण्ड म्हणजे आपले डोके. मुण्ड हे उत्तमांग आहे. त्यातही मुण्डाचा प्रमुख भाग आहे बुद्धी. बुद्धी तशी शांत राहू शकत नाही. म्हणजे बुद्धीला विषय हवाच हवा. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी आपल्या प्रसिद्ध अभंगात स्पष्ट केले-

*भक्त ऐसे जाणा जे देही उदास । गेले आशापाश निवारोनी*
*विषय तो त्यांचा झाला नारायण । नावडे जन धन माता पिता ॥*

त्यांनी देही उदास असलेले, ज्यांना आशापाश जखडू शकत नाही, ज्यांना जन-धन, माता-पिता म्हणजे ऐहिक, संसारिक बाबी, नातेसंबंध, पैसा; इतकेच काय, माता-पित्यातही ज्यांचे मन आणि बुद्धी अडकत नाही, त्यांना 'भक्त' म्हटले आहे. पण बुद्धीला तर विषय लागतोच; बुद्धीचा विषय नारायणच असल्यावर बुद्धीचा विषयच संपतो. ज्यांच्या बुद्धीचा म्हणजे मुण्डक्याचा विषय भोग नसून बुद्धीचा विषयच नारायण झाला असे जे साधक आहेत त्यांचे वर्णन संत तुकाराम महाराजांनी केले. म्हणजे ज्यांच्या डोक्यात म्हणजे मुण्डक्यात फक्त नारायण आहे. अशाच निरपेक्ष साधकांनी हा उपनिषद अभ्यासावा लागतो म्हणून हा मुण्डकोनिषद आहे. दुसरा अर्थ पाहू- मुण्डण करणे म्हणजे संन्यास दीक्षा घेताना मुंडण करण्याचा संस्कार असतो. म्हणजे हा उपनिषद अभ्यासताना संन्यस्त वृत्तीने म्हणजे वैराग्य वृत्तीने श्रवण करावा. 'संन्यस्य श्रवणम् कुर्यात' हे आपले तत्त्वच सांगते. म्हणून या उपनिषदाला 'संन्यासोपनिषद' असेही म्हणतात. पूर्वी हे उपनिषद अभ्यासण्यापूर्वी मुण्डणाची पद्धत होती. आपल्या संस्कृतीत केस हे भोगाचे लक्षण आहे. केशवपन म्हणजे भोगवासनेतून निवृत्ती होय. वासना, कामना, आसक्ती, ममत्व यांचा त्याग म्हणजे मुण्डण होय. हा त्याग करणाराच मुण्डकोपनिषदांचा अधिकारी म्हणून हे नाव दिले आहे. उपनिषदात एक व्रत सांगितले आहे त्याला शिरोव्रत किंवा अग्निधारा व्रत म्हणतात. या व्रतात शिष्य गुरूंकडे जाताना संन्यस्थ होऊन डोक्यावर धगधगता अग्नी धारण करून जात असे. शिरोव्रताचे अनुष्ठान केल्याशिवाय ब्रह्मविद्या देऊ नये, हे मुण्डकोपनिषद सांगतो.

*तदेतत्सत्यमृषिरंगिराः पुरोवाच नैतद्चीर्णव्रतोधीते ॥*

यामध्ये अग्नीप्रमाणे धगधगती जिज्ञासा, ओढ, तीव्रता मुण्डावर धारण करून हा उपनिषद शिकावा. म्हणूनही याला मुण्डकोपनिषद म्हणतात. थोडक्यात हा उपनिषद संन्यस्त वृत्तीने अभ्यासावा. मुण्डकोपनिषदाचे एकूण ६५ मंत्र आहेत. ते तीन अध्यायात म्हणजे तीन मुण्डकात प्रश्नोत्तर स्वरूपात विभाजित केले आहेत. अध्याय म्हणजे मुण्डक होय. यात पूर्व पक्ष आणि उत्तर पक्ष आहेत, ज्याला शंका म्हणजे पूर्वपक्ष आणि निरसन म्हणजे उत्तर पक्ष होय. या उपनिषदात ब्रह्मविद्या म्हणजे जन्ममृत्यू, वार्धक्य, रोगव्याधी यांनी व्याप्त असलेला संसार आणि यासाठी कारण असणारी अविद्याकामकर्मग्रंथी या सर्वांचा निरस करून परब्रह्म स्वरूपापर्यंत नेते; ती ब्रह्मविद्या होय. या ब्रह्मविद्येचा संक्रमण प्रवाह या उपनिषदात आहे. सर्वप्रथम चतुर्भुज ब्रह्माने ही ब्रह्मविद्या आपला ज्येष्ठ पुत्र अथर्व ऋषींना सांगितली. अथर्व ऋषींनी ती अंगीरा ऋषींना सांगितली. त्यांनी ती सत्यवह ऋषींना सांगितली. त्यांनी ती अंगीरस ऋषींना सांगितली. या अंगीरस ऋषींच्या जवळ शौनक ऋषी गेले. शौनकांनी ब्रह्मविद्येसंदर्भात उपस्थित केलेल्या शंकांचे अंगीरस ऋषींनी केलेले निरसन म्हणजे 'मुण्डकोपनिषद' होय.

*ब्रह्म देवानां प्रथमः संबभूव विश्वस्यकर्ता भुवनस्य गोप्ता ।*
*स ब्रह्मविद्या सर्वविद्याप्रतिष्ठाम् अथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥१॥*
*अथर्वणे यां प्रवादेत ब्रह्माथर्वा तां पुरोवाचांगिरे ब्रह्मविद्याम् ।*

दुसऱ्या शब्दात या उपनिषदात अंगीरस-शौनक संवाद आहे. शौनकांनी सुरुवातीलाच प्रश्न केला की-

*कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति ॥३॥*

कोणती अशी वस्तू आहे की, ज्या एकाच वस्तूचे ज्ञान प्राप्त केल्यावर विश्वातील सर्व वस्तू जाणल्या जातील? त्याचे उत्तर अंगीरस ऋषींनी खूपच यथार्थ दिले.

*तस्मै स होवाच, द्वे विद्ये वेदितव्ये इति ह ।*
*स्म यद्ब्रह्मविदो वदंति परा चैव अपरा च ॥*

या विश्वात दोनच विद्या जाणण्यास योग्य आहेत त्या म्हणजे पराविद्या आणि अपरा विद्या. यावर झालेला संवाद म्हणजे मुण्डकोपनिषद होय. ज्ञान आणि सत्य याचे विवेचन यात आहे. परब्रह्म स्वरूप अस्ती आणि नास्ती स्वरूपात असल्याचे हा उपनिषद सांगतो. प्रणवध्यानाचे महत्त्व, आत्मज्ञान प्राप्ती, आत्मानुभूती अशा विविध बाबींवरची प्रश्नोत्तरी येथे आहे.

*तपसा चीयते ब्रह्म, ततोन्नमभिजायते ।*
*अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकः कर्मसु चामृतम् ॥*

ब्रह्मापासून सर्वप्रथम अन्न, त्यापासून प्राण, त्यानंतर अनुक्रमे मन, सत्य, लोक, कर्म निर्माण झालीत. त्यानंतर त्या कर्माची अमृतस्वरूपाची अविनाशी फळे निर्माण झालीत. शरीररूपी वृक्षावर जीव आणि आत्मा असे दोन पक्षी राहतात. जीव आपल्या कर्मानुसार फळे चाखतो अथवा दुःखही भोगतो. आत्मा परमात्म्याशी तादात्म पावण्याचे सामर्थ्य ठेवतो. नदी जशी सागराला मिळाली की आपले नामरूपरहित होते तसेच आत्म्याचे होय. अजून एक महत्त्वाचे- 'सत्यमेव जयते' हे भारताचे राष्ट्रीय वाक्य मुण्डकोपनिषदातीलच आहे.

*सत्यमेव जयति नानृतं, सत्येन पंथा विततो देवयानः ॥३।१॥६॥*

सत्याचाच विजय होतो, असत्याचा नाही. भारतीय राज्यघटनेत भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी जी राजमुद्रा स्वीकारली त्या खाली 'सत्यमेव जयते' अंकित केले आहे. हे भारताचे राष्ट्रीय घोषवाक्य मुण्डकोपनिषदातून घेतले आहे. ज्ञान संप्रदाय एखाद्या मर्त्य व्यक्तीपासून उद्भवला नसून ते अपौरुषेय, अद्भुत, गुह्य, अलौकिक अशा परब्रह्म परमात्म्याचे ब्रह्मरसाचे संतर्पण आहे. गुरू-शिष्य परंपरा आणि त्या मंथनातून प्राप्त झालेले नवनीत म्हणजे मुण्डकोपनिषद होय.

९८२२२६२७३५

## मतदानासाठी आधुनिक तंत्रज्ञान

१९ जानेवारीच्या तरुण भारततले डॉ. चंद्रकांत कुळकर्णी यांचे पत्र वाचले. मला सांगायला आनंद होतो की, भारतात काही संस्थेत अशी निवडणूक प्रक्रिया (ऑनलाईन बँकिंगसारखी) आहे. मतदारांना ई-मेलने लॉगीन आयडी, पासवर्ड, लिंक येतो. लॉग केल्यावर 'ओटीपी' व्यक्तिगत फोनवर टाकायचा व मग उघडलेल्या लिस्टवर टिक मारून मतदान करायचे, ही पद्धत 'इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनीअरिर्स' या संस्थेत कैक वर्षांपासून प्रचलित आहे. मी सभासद असल्यामुळे अशाप्रकारे आतापर्यंत दोनदा, राष्ट्रीय कार्यकारी मंडळ निवडणूक प्रक्रियेत मतदान केले. ही पद्धत सॉफ्टवेअर य ब्लॉकचेनद्वारे संचालित होत असल्याने गडबड व्हायची सूतराम शक्यता नाही. शिवाय मतदानाची संख्या प्रचंड मोठी असली, तरी यंत्रणा ती विनासायास हाताळू शकते. विशेष म्हणजे, याच पद्धतीने 'रिकॉल'चा अधिकारसुद्धा, मतदान केलेल्या मतदारांना ठरावीक काळानंतर देता येऊ शकतो. याबद्दल निवडणूक आयोग व शासन स्तरावर अधिक संशोधन/रिसर्च होणे गरजेचे आहे. या पद्धतीने सरकार व जनतेचा खर्चाचा बोजा फार मोठ्या प्रमाणात कमी होईल. जेणेकरून अशिक्षित मतदारांचीसुद्धा सोय होईल. 'एक देश, एक निवडणूक' ही संकल्पना अंमलात आणणे यामुळे सोपे होईल. सध्याच्या इंटरनेट युगात ही पद्धत अवलंबणे सर्वांनाच सोयीस्कर होईल.

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

## प्रयागराज महाकुंभ नियोजन उत्तम

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभाचे नियोजन किती बारकाईने करावे लागले. अगदी कुटुंबात एखादे मंगलकार्य ठरले की गृहिणीला सगळे अंदाज घ्यावे लागतात. कार्यात किती लोक येतील हे लक्षात घ्यावे लागते. मग पुढचे नियोजन करावे लागते. त्यांची संपूर्ण व्यवस्था आल्यापासून परत जाईपर्यंत करावी लागते. अगदी तशीच व्यवस्था महाकुंभ मेळ्यात केली आहे. स्नानांची व्यवस्था करण्याकरिता घाट बांधणे. जेवणाची व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था इत्यादी. या सगळ्याकरिता नियोजन आवश्यक आहे. जेवण म्हणजे त्याकरिता लागणारे साहित्य धान्य-पीठ व इतर सर्व पदार्थ. लोकं लाखोंनी येणार, विदेशातूनही येणारे आहेत. वेगवेगळी वाहने येणार त्याकरिता रस्ते चांगले हवेत. पार्किंगची व्यवस्था हवी. सोबतच राहायची व्यवस्था करायची. त्यातच खूप थंडी असणार. त्याप्रमाणे व्यवस्था केली आहे. तिथ वेगवेगळ्या आखाड्याचे साधुसंत त्यांच्या मानानुसार त्यांची व्यवस्था करायची, त्याचे नियोजन हवे. हे सर्व उत्तमरीतीने केले आहे. पूजा साहित्य विक्री करणाऱ्यांना जागा द्यायची; तेही मोठ्या प्रमाणात आहेत. पुन्हा इतके लोक येतच राहणार. साफसफाई करण्याची सोय हवी. हे किती मोठे नियोजन आहे. हे सर्व मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व त्यांच्या सरकारने उत्तम केले आहे. स्त्रियांना कुठलाही त्रास होणार नाही, ही काळजी घेतली आहे. लाखोंची व्यवस्था, त्यात शाही स्नानाला गर्दी होणारच आहे.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

## वाचक पत्रे



## हयातीत घरे मिळणार नसतील तर?

'गिरणी घरे' अंतर्गत प्रथम मोफत घरे, मग ८ लाख, मग १/३ हिस्सा यासम प्रस्ताव बदलत गेले; बरोबरीने प्रथम मिलच्या आवारातच, मग मुंबईत करता करता मुंबईलगत, परिसराबाहेर (निर्जन ठिकाणी) घरे देणार असे 'फक्त प्रसिद्धीपुरते' जाहीर करता करता आता खाजगी विकासकांपुढे पीपीपी आणि जेव्हीचे जाळे टाकत आणि दर्जेदार असा गोंडस शब्द गिरणी कामगारांच्या गृहनिर्माण प्रकल्पाला जोडत पुनश्च आभासी चित्र उभे करत गिरणी कामगारांच्या तोंडाला पाने पुसली जात आहेत. फक्त अपवाद म्हणून दीड लाख घरांच्या तुलनेत गेल्या काही वर्षांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या हजारभर (निकृष्ट बांधकामाच्या) घरांचे (मोबदला घेत) वाटप केले. आजपर्यंतच्या या कालहरणात गिरणी कामगार सत्तरीपार वृद्धत्वाकडे झुकलेले (काही निवर्तले), काही आपापल्या गावी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्थायिक झाले. शिवाय त्यांची वारस मुले आपापल्या व्यापात विखुरले गेल्याने बहुतेकांना घराची लॉटरी कोणत्या ठिकाणची व कधी लागेल याबाबत अशाश्नतता असल्याने त्यांना घर मिळण्यात स्वारस्य उरले नाही. यावर उपाय म्हणून पात्र गिरणी कामगार-वारसांपैकी ज्यांना आतापर्यंत कित्येक वर्षे मृगजळ वाटत आलेले घर घेण्यात स्वारस्य नसल्यास, त्यांच्या भरावयाच्या आर्थिक हिस्स्याची रक्कम वगळता उर्वरित रक्कम त्यांना अदा केल्यास 'ना रहेगा बाँस, ना बजेंगी बाँसुरी' प्रमाणे भविष्यात ना पोकळ आश्वासने, ना आशावाद झेलावा लागेल. महत्त्वाचे म्हणजे हा आर्थिक हिस्सा वृद्धत्वाकडे झुकलेले मूळ गिरणी कामगार लाभार्थी ठरून त्यांना त्यांच्या हयातीतच वाढत्या वैद्यकीय खर्चासाठी उपयुक्त ठरावा. ओघाने ते या मृगजळी घरजंजाळातून मुक्त होतील.

**किरण चौधरी**/९१५८८३९४१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## आदर्श आपले सरकारमध्ये अकरा केंद्रांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सेवा हमी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातून अकरा आदर्श केंद्राची निवड करण्यात आली आहे. या केंद्राने राबविलेल्या प्रभावी नागरिकांच्या हितासाठी दिलेल्या सेवामुळे त्यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती आपले सरकार केंद्राचे सम न्वयक महावीर काळे यांनी दिली. दरम्यान, जिल्ह्यात अक्कलकोटमध्ये समर्थनगर, बार्शीमध्ये खांडवी, करमाळा वरकटणे, माढा वरवडे, म ाळशिरस माळेवाडी बो, मंगळवेढा ब्रम्हपुरी, मोहोळ पेनूर, पंढरपूरमधून पुलूज, सांगोला, एखतपूर, उत्तर सोलापूर पाकणी आणि दक्षिण सोलापूर मधून मंद्रूप गावातील आपले सरकार सेवा केंद्राची निवड करण्यात आली आहे. सुरूवातील प्रत्येक तालुक्यातून दहा केंद्राची निवड करण्यात आली. त्यानंतर त्या ११० केंद्रामधून प्रत्येक तालुक्यातून एका केंद्राची आदर्श आपले सरकार सेवा केंद्र म्हणून निवड करण्यात आली आहे. या आदर्श केंद्रात आपले सरकार सेवा केंद्र करिता स्वतंत्र कक्ष, सुस्थितीत अद्यावत संगणक व प्रिंटर, भारतनेट अंतर्गत जलदगती इंटरनेट, वीज बॅटरी बॅकअप व स्वतंत्र फर्निचर, नागरिकांना ऑनलाईन जीटूसी व बीटू सी सेवा, दर्शनी भागात बॅनरवर दरफलक, नागरिकांना बसण्याची व पाणयाची सुविधा दिल्यामुळे निवड करण्यात आली आहे. शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात हे उद्दिष्ट आहे.

## निधन वृत्त...

### प्रवीण बाबर

**मंद्रुप, दि. २१ जानेवारी-**



बाबर ट्रेडर्सचे मालक प्रवीण लक्ष्मणराव बाबर (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी सोलापुरातील एका खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.हिंदू स्मशानभूमीत मंगळवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, भाऊ, भावजय, विवाहित बहीण, मुलगा, सून असा परिवार आहे. युवा उद्योजक आनंद बाबर यांचे ते वडील होत.

### डॉ. शांतीलाल भुतडा

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**



सम्राट चौकातील हरी पद्म रेसिडेन्सी येथील रहिवासी डॉ. शांतीलाल नारायणदास भुतडा (वय ७७) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. मरणोत्तर त्यांचे देहदान व्ही. एम. मेडिकल कॉलेज येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित मुले, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### लक्ष्मी काटे

**सांगोला,दि.२१ जानेवारी-**



सांगोला शहरातील संजय नगर येथील रहिवासी लक्ष्मी राजकुमार काटे (वय ५२) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे.

### नावात बदल

माझे जुने नाव - **शिवाप्रभा मृत्यूंजय मडके** असे होते. ते बदलून नवीन नाव - **शिवप्रभा मृत्यूंजय मडके** असे वाचण्यात यावे.

**ऑफी. नं. २२/२०२४**

### नावात बदल

माझ्या पत्नीने जुने नाव **शिवाप्रभा मृत्यूंजय मडके** असे होते. ते बदलून आधारकार्डनुसार नवीन नाव - **शिवप्रभा मृत्यूंजय मडके** असे वाचण्यात यावे.

**ऑफी. नं. २३/२०२४**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. १५८/२०२४

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, द. सोलापूर यांच्या न्यायालयात

**सिद्रामप्पा मल्लप्पा कलशेट्टी**
वय ७३ वर्षे, धंदा - वयोवृध्द
रा. वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत वळसंग,**
**ता. द. सोलापूर, जि. सोलापूर** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आजी, कै. मलकव्वा सिद्रामप्पा कलशेट्टी यांचा वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१/०८/१९८४ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली आहे. तसेच अर्जदाराची मावस आजी कै. गुरुबाई मल्लिकार्जुन कलशेट्टी यांचा वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १५/०२/१९८६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी नियम १०६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आजी कै. मलकव्वा सिद्रामप्पा कलशेट्टी यांचा मृत्यू दिनांक ०१/०८/१९८४ व अर्जदाराची मावस आजी कै. गुरुबाई मल्लिकार्जुन कलशेट्टी यांचा मृत्यू दिनांक १५/०२/१९८६ रोजी मौजे वळसंग, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७ जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर**

## महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/२४/२०२५ दि. ११/०१/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. चाँद गालिब शेख** - **अर्जदार**
रा. सिन्नूर ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**ग्रामपंचायत, सिन्नूर ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील चाँद गालिब शेख रा. सिन्नूर ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०३/०५/१९८२ रोजी मौजे सिन्नूर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन चाँद गालिब शेख या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २८/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि २१/०१/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

(शिक्का)

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

## महाराष्ट्र महसूल व वन विभाग
### तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र.२०२५/अभिलेख/कावि/२४/२०२५ दि. २१/०१/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्रीम. हसीना हुसेनबाशा शेख** - **अर्जदार**
रा. खराडी, पुणे ता. पुणे
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**ग्रामपंचायत, सिन्नूर ता अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील हसीना हुसेनबाशा शेख, रा. खराडी, ता. पुणे यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. १९/०४/१९७६ रोजी मौजे सिन्नूर ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतु माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन हसीना हुसेनबाशा शेख या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २२/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. २१/०१/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

(शिक्का)

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे खडकोणी तथा खडकोणी परिसर व बार्शी तालुका परिसर हद्दीतील व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे अशिल राधाबाई अंबऋषी जाधव यांनी माहिती दिलेवरुन व सांगितलेवरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अ) डि. सोलापूर सब डि. ता. बार्शी पैकी मौजे खडकोणी येथील जमीन गट नं. ३०० क्षेत्र ०२ हे. ३० आर + पो.ख. ०० हे. ३३ आर याचा आकार ०१ रु. ७० पैसे येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह.

ब) डि. सोलापूर सब डि. ता. बार्शी पैकी मौजे खडकोणी येथील जमीन गट नं. ३२९ क्षेत्र ०० हे. २९ आर आकार ०० रु. ९५ पैसे येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह. तसेच सदर गटामध्ये विहीरसह.

वर नमूद मिळकत ही आमचे अशिलाचे कब्जे मालकी वहिवाटीची आहे. परंतु आमचे अशिलास मूलबाळ नसल्याने व त्यांना किडनीचा आजार असल्याने आमच्या अशिलाची भाच्ची वर्षा दिनेश शिरसाट यांच्याकडून औषधोपचाराकामी जुलै २०२१ साली रक्कम रु.५,४०,०००/- वेळोवेळी घेतले व सदर रक्कमेस आधार असावा म्हणून खरेदीखत या शिर्षकाखाली गहाणखत लिहून दिले. गहाणखताच्यावेळी गट नंबर ३०० चे दस्तावर जादा रक्कम रु. ६,१२,०००/- घालून एकूण रक्कम रु. ११,५२,०००/- या रक्कमेचा दस्त नोंदवला. तसेच वरील गट नंबर ३२९ बाबत झालेल्या दस्तास पोकळ स्वरुपाची रु. १,७५,०००/- एवढी रक्कम नमूद करुन कागद नोंदवला. आमचे अशिल अशिक्षित असल्याचा गैरफायदा वर्षा शिरसाट यांनी घेतलेला आहे. सदर दोन्ही दस्ताचा खर्च ही आमचे अशिलांनी केलेला आहे. तसेच सदर खरेदी शिर्षकाखाली गहाणखत लिहून देतेवेळी सदर रक्कम परत केल्यानंतर सदरचे खरेदी शिर्षकाखाली लिहून दिलेले गहाणखत हे वर्षा दिनेश शिरसाट यांनी पलटून देण्याचे ठरवलेले होते व त्याचा खर्चही आमचे अशिलाने करण्याचा ठरलेले होते. सदर खरेदी वजा गहाणखताने वर्षा दिनेश शिरसाटख हिचे केवळ ७/१२ हक्कपत्रकी नाव लागले. परंतु कबजा आजही आमचे अशिलाचा खरेदीवजा गहाणखत लिहून देण्यापूर्वी होता तसा आजही कायम आहे. आमचे अशिलाने वरील नमूद रक्कम रुपये ५,४०,०००/- हे वर्षा दिनेश शिरसाट यांना परत दिले परंतु सदर रक्कम परत देवूनही वर्षा दिनेश शिरसाट ही खरेदीखतावरील पूर्ण रक्कम मला दे असे म्हणून खरेदीखत पलटून देण्यास नकार दिला. तसेच दस्तावरील रक्कमेस द.म.द.शे. १० टक्के प्रमाणे व्याजाची मागणी ही केली. त्यावेळी आमचे अशिलाने दिलेली रक्कम परत दिलेली असल्याने खरेदी दे असे म्हणता वर्षा हिने तुमची जमीन परत देणार नाही, मी ती विक्री करणार आहे, असे सांगितले. मुळता वरील नमूद गट नंबर ३०० व ३२९ बाबत २०१७ साली झालेले दोन्ही व्यवहार हे पोकळ स्वरुपाचे असून त्या आधारे वर्षा दिनेश शिरसाट यांना आमचे अशिलाने कब्जा दिलेला नाही. तसेच कुठल्याही स्वरुपात अधिकाराचे हस्तांतरण केलेले नाही. सदरचा व्यवहार हा केवळ दिलेल्या पैशास आधार असावा या शुद्ध हेतूने सदरचे दस्त करुन दिलेले आहेत. सदर वर्षा शिरसाट यांनी दिलेली रक्कम पूर्णपणे आमचे अशिलाने परत केलेली असल्याने अर्थाअर्थी वर्षा शिरसाट यांचा सदर मिळकतीशी काहीएक संबंध नाही. केवळ ७/१२ उताऱ्यावर पोकळ नावाची नोंद असल्याचा गैरफायदा वर्षा शिरसाट घेण्याच्या विचारात आहेत.

सबब या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत आमचे अशिलाचे हक्क व हितसंबंध असल्याने व वर्षा शिरसाट यांचे केवळ पोकळ स्वरुपाचे ७/१२ हक्कपत्रकी नोंद असल्याने वर्षा दिनेश शिरसाट यांचा कायदेशीर कुठलाही हक्क सदर मिळकतीशी नसल्याने त्यांचेशी कोणीही कसल्याही प्रकारे विक्री, साठेखत, गहाण, दान, लिज, मृत्यूपत्र, बोजा, कर्ज वगैरे हस्तांतरणाचे व्यवहार करु नयेत. केल्यास सदर मिळकतीचे आमचे अशिलाचे मालकी हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत. कुल्याही हस्तांतरण व्यवहाराने कोणालाही कब्जा मिळणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. तारीख : २१/०१/२०२५

सही/-
**ॲड. धनंजय एम. धस,**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं. ९८९०४७२०९६
अशिल राधाबाई अंबऋषी जाधव तर्फे ॲडव्होकेट

## लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

(मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

जा.क्र. ८५०४ दि. २१/०१/२०२५

रेणुका भवन, २ मजला, सर्वे नं. ३५/२अ-२ब, पुष्पक हॉटेलजवळ,
पाईप लाईन रोड, सावेडी, अ.नगर,
अहमदनगर - ४१४ ००१

### जाहीर नोटीस

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.,
अहमदनगर ----- अर्जदार

**विरुद्ध**

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ४२२३/२०२४ | कर्जदार | **श्री. श्रेयश राजेंद्र कापसे,** रा. गोदापुरे हॉस्पिटलजवळ, १५५०, सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. महेश दीपक भगत,** रा. सुभाषनगर, गोविंद डाळ मिलजवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. विवेक वासुदेव दीक्षित,** रा. १४ नं. शाळेच्या पाठीमागे, सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर |
| ४३४४/२०२४ | कर्जदार | **श्री. सय्यद साहिल सलीम,** रा. रामेश्वर मंदिरजवळ, कुर्डुवाडी रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. राजू बाळू दहिहंडे,** रा. रामेश्वर मंदिरजवळ, कुर्डुवाडी रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| | जामीनदार | **श्री. रहीम मुक्तार पठाण** रा. आशा टॉकीज रोड, बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक २५/०१/२०२५ रोजी ठीक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले असे.

सही/-
(गोल शिक्का) **ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं. २/२०२५
नि.४

### अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात
**(मे. शेख मॅडम यांचे कोर्टात)**

१) **श्रीमती सुनिताबाई अनंत सुरवसे**
रा. बुरूड गल्ली, पंढरपूर, जि. सोलापूर
२) **सौ. निर्मला सुभाष सुरवसे,**
रा. पंढरपूर
३) **संतोष रामचंद्र वडतिले,**
रा. सावजी वाडा, शिवाजी चौक, पंढरपूर
४) **जितेश रामचंद्र वडतिले,**
रा. बसवेश्वर गल्ली, वागदरी, ता. अक्कलकोट
५) **ब्रम्हदेव रामचंद्र वडतिले,**
रा. वागदरी, ता. अक्कलकोट — **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** - **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. २/२०२५ हा दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला असून अर्जदार क्र. १ ते ५ चे वडील रामचंद्र बिराजी वडतिले हे मौजे वागदरी येथे दि. २०/०१/२०१८ रोजी मयत झाले आहेत. तसेच अर्जदार क्र. १ ते ५ ची आई कमलाबाई रामचंद्र वडतिले ही मौजे वागदरी येथे दिनांक ०५/१०/२००७ रोजी मयत झाले आहेत. व अर्जदार क्र. १ हिचे पती अनंत पांडूरंग सुरवसे हे दि. २७/०७/२००४ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ते ५ हेच रामचंद्र बिराजी वडतिले व कमलाबाई रामचंद्र वडतिले यांचे कायदेशीर वारस आहेत तसेच अर्जदार क्र. १ ही अनंत पांडूरंग सुरवसे यांची विधवा पत्नी आहे व रामचंद्र बिराजी बडतिले यांची विधवा कन्या आहे. रामचंद्र बिराजी वडतिले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे सेकंड लाईफ अवार्ड ऑफ फॅमिली पेन्शन ही त्याची विधवा मुलगी अर्जदार नं. १ सुनिताबाई अनंत सुरवसे हिच्या नांवे मंजूर होणेकामी वारसा दाखला मिळणेकरीता अर्जदाराने मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार क्र. १ ते ५ हे वर नमूद मयतांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि.२५/०२/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फ देण्यात येईल.

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. १८/१/२०२५

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

## उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर सोलापूर यांचे कार्यालय

सिटी सर्वे नं. ८४१३, दूसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर - ३

**राष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१**
**व त्याखालील नियम १९६१ चे ८६ (अ) अन्वये**

### जाहीर नोटिस

**श्री. समर्थ महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर** - **वादी**
विरुद्ध
खालील तपशिलातील नमूद केलेले पतसंस्थेचे थकबाकीदार सभासद - **प्रतिवादी**

| अ. क्र. | दावा क्रमांक | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २०३/२०२४ | १७,००,९५९/- | कर्जदार | **निर्मल आजीनाथ ज्ञानोबा** पत्ता : मू. पो. तारापूर ता पंढरपूर. जि. सोलापूर |
| | | | जामीनदार | **जगताप अनिल संभाजी** पत्ता : मू. पो. तारापूर, ता. पंढरपूर. जि. सोलापूर |
| | | | जामीनदार | **निर्मल संतोष आजीनाथ** पत्ता : मू. पो. तारापुर ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| २ | २०४/२०२४ | १,८१,७१७/- | जामीनदार | **संजय नागनाथ जाधव** रा. घर नं. ३५/२/अ, तिरूपति नगर, सोलापूर |
| | | | जामीनदार | **लक्ष्मण विष्णु पारदे** रा. घर नं - ४०९, मुर्गी नाला लष्कर, सोलापूर |
| | | | जामीनदार | **दीपक सावळा शिंदे** रा. घर नं ९४/३१७, जोडभावी पेठ, सोलापूर |
| ३ | २०५/२०२४ | १,८६,४६१/- | कर्जदार | **दीपक सावळा शिंदे** रा. घर नं - ९४/३१७, जोडभावी पेठ, सोलापूर |
| | | | जामीनदार | **गोपाल तुकाराम मुंगसे** रा. ७२८/१/२८ ब, कुर्डूवाडी, अद्यापाक कॉलनी, बार्शी, जि. सोलापूर |
| | | | जामीनदार | **लक्ष्मण विष्णु पारदे** रा. घर नं - ४०१, मुर्गीनाला लष्कर, सोलापूर |
| ४ | २०६/२०२४ | १,६१,१४३/- | जामीनदार | **अभिषेक शिरिशकुमार गायकवाड** रा. शिवाजी नगर, बाळे, सोलापूर |
| | | | जामीनदार | **मनोज तडकल** शिवाजी नगर, बाळे, सोलापूर |

यांत वादी पतसंस्था यांनी कलम १०९ अन्वे दाखल केलेल्या अर्जावरील वर नमूद केलेल्या प्रतिवादी त्यांचे राहते पत्यावर सुनावणीस नोटिस पाठविली असता त्या व्यक्ति सदर पत्यावर राहत नसल्याचे दिसून आले. तरी सदर जाहीर नोटीसी द्वारे आपणास कळविण्यात येते की, उपनिदर्शित अर्जासंबधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः अथवा वकिला मार्फत दिनांक ४/२/२०२५ रोजी ठीक १२:०० वाजता कागद पत्रासह उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर सिटी सर्वे नं. ८४१३, दूसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवारा, सोलापूर-३ येथे हजर रहावे.

या नोटीस दवारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. व निर्णय देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर नोटिस दिले आहे.

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापूर शहर**

## सभा नोटीस

पिरळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्या. पिरळे, ता. माळशिरस जि. सोलापूर संचालक मंडळाची सभा दिनांक ३०/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११ वाजता संस्था कार्यालय पिरळे ता. माळशिरस जि. सोलापूर येथे श्री डी. पी. राऊत लेखा परीक्षक सहकारी संस्था अकलूज यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयावर चर्चा करणेसाठी आयोजित केलेली आहे तरी सर्व संचालकांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती

**सभेपुढील विषय :**
नं. १- सर्वसाधारण प्रवर्ग मतदार संघातील रिक्त पद भरणे बाबत

**सही /- सचिव**
**पिरळे विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्या.**
**पिरळे ता. माळशिरस जि. सोलापूर**

## सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., सोलापूर
### श्री सरस्वती सर्व व्यावसायिक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर
ताबा नमुना - नमुना झेड नोटीस
**सहकार कायदा कलम १५६ व नियम १०७ (११) ड १ पाहा**

### स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्याअर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी डी.व्ही. कुलकर्णी वसूली अधिकारी सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. सोलापूर द्वारा श्री सरस्वती सर्व व्यावसायिक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर, जि. सोलापूर यांचे वतीने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसा देवूनही थकबाकीदार यांनी नोटीसीमध्ये नमूद केलेली रक्कम भरण्यास बजावले असताना त्यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.

खाली सही करणाऱ्याने सदरच्या स्थावर मालमत्ता जप्त केलेल्या असून त्याचे पंचनामेही संस्थेच्या दप्तरी उपलब्ध आहेत. सर्व ऋणकोनी रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोना याप्रमाणे नोटीस देण्यात येते की खालील निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७(१०) व ११(ड)(१) नुसार मिळालेल्या अधिकारान्वये रितसर जप्ती नोंद करून ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोसह तमाम नागरिकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेच्या संदर्भात कोणतीही खरेदी विकी, गहाण, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत आणि व्यवहार केल्यास तो श्री सरस्वती सर्व व्यावसायिक नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर यांच्या खाली दर्शविलेल्या वसूलपात्र रक्कम व त्यावरील होणारे पुढील व्याज याच्या कायदेशीररित्या अधिन रहावे लागेल, याची नोंद घ्यावी.

| क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | १०१ दाखला क्र. दिनांक | स्थावर मिळकत जप्त केल्याची तारीख | वसुल पात्र रक्कम | स्थावर जप्ती मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जगन्नाथ सिद्राम केंदुळे | २३९३ ३०/०८/२०२२ | २४/०२/२०२३ | ११८६२३१.०० | गट नं. १४०/१ ब मौजे तेलगाव, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | १.५६ हे. आर. चौ.मी. |
| २ | अश्विनीकुमार हरी बच्चन | २१८४ १०/०६/२०१९ | २६/१२/२०२४ | ७५२८५९.०० | गट नं. ५०/१/२/३९ मौजे साफळे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | १.११.६३ हे. आर. चौ.मी. |

ही ताबा नोटीस दिली ता. २१/०१/२०२५

सदर नोटीस दिल्यापासून एक महिन्यांच्या आत सर्व रक्कम भरून त्याचा बेबाक दाखला संस्थेकडून घ्यावा अन्यथा कायद्यातील तरतूदी प्रमाणे मा. जिल्हा दंडाधिकारी सोलापूर यांच्या कडून प्रत्यक्ष ताबा घेवून या मालमत्तेचा लिलाव करून रक्कम वसूल केली जाईल याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**सही/-**
**डी.व्ही. कुलकर्णी**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., सोलापूर**

## Sahakar Maharshi Shankarrao Mohite-Patil Sahakari Sakhar Karkhana Ltd.,

**Shankarnagar-Akluj, Post Yeshwantnagar-413118, Tal. Malshiras**
**Dist. Solapur (M.S.) INDIA. Fax No. (02185) 222249**
**E-mail - smsmpssk@gmail.com Ph. Office (02185) 222048, 222248**

### TENDER NOTICE FOR EXPORT OF SUGAR

SEALED TENDERS ARE INVITED FOR EXPORT WHITE CRYSTAL SUGAR UNDER THE SCHEME. SUGAR SPECIFICATION, TERMS & CONDITIONS ARE AS PER BELOW.

| | | |
|---|---|---|
| 1 | Production | 2024-25 season |
| 2 | Grade of Sugar | Grade S-30 |
| 3 | Quality | ICUMSA below 100 by Method No.10 |
| 4 | Packing | 50 Kg. net sugar packed in P.P. bags. |
| 5 | Quantity | 3502.0 M.T. |
| 6 | Deposit | Rs.1000/- per M.T. immediate after sanction the tender. |
| 7 | Rate | To be quoted Ex-factory |
| 8 | Inspection | To the buyer's account |
| 9 | Payment | 100% payment in an advance by R.T.G.S. |
| 10 | Delivery | As per terms and condition of Release Order |
| 11 | Subsidy | If announced by State Govt. & Central Govt. will be on Karkhana Account |

**Other Terms & Conditions for Exporters:**

1) Exporter or Merchant Exporter having an IEC code No. & R.C.M.C. Certificate holder.
2) Central GST 'No Default Certificate' is essential.
3) Exporter should have to mention the name of country where sugar is to be exported.
4) Exporter should submit last 3 years Income Tax Clearance Certificate & GST certificate.
5) Submit the tender on or before 27-01-2025 by E-mail/Post/ By Hand at S.M.S.M.P.S.S.K. Shankarnagar-Akluj General Office.
6) Detail terms & Conditions will be informed at the time of negotiation.
7) Karkhana Reserves the right to reject fully or part of the tender.

Karkhana reserves all rights to accept or reject tenders without assigning any reason thereof.

**R.K. Chougule** — Managing Director
**S.R. Mane-Deshmukh** — Vice Chairman
**J.S. Mohite-Patil** — Chairman

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**

आज़ादी का अमृत महोत्सव

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्स्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 16/11/2024 रोजी डिमांड नोटिस जारी करून खालील गोष्टींना आवाहन केले. नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे 20/01/2025 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत.

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- फलटण गल्ली** <br> **कर्जदार - 1. मेसर्स बालाजी ॲग्रो इंडस्ट्रीज प्रोप.** <br> **श्री. पद्माकर माधवराव पाटील** <br> पत्ता 1:- प्लॉट क्र. F-98, स्थित चिंचोली औद्योगिक परिसरात, चिंचोली, तालुका-मोहाळ, जिल्हा- सोलापूर. <br> पत्ता 2 :- शनी मंदिराजवळ 204 दक्षिण कसबा दत्त चौक, सोलापूर. <br> **हमीदार - 2. श्री. आशिष पद्माकरराव पाटोदेकर** <br> पत्ता :- शनी मंदिराजवळ 204 दक्षिण कसबा दत्त चौक, सोलापूर. | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन** <br> वनस्पतींवरील हायपोथेकेशन आणि यंत्रसामग्री, विद्युत वस्तू, डीजी सेट आणि इतर फिक्स्चर खरेदी केले. येथे स्थित प्लॉट क्रमांक ऋ-९८ येथे बँक फायनान्स चिंचोली औद्योगिक क्षेत्र, चिंचोली, तालुका-मोहाळ, जिल्हा- सोलापूर. <br> 2. कारखान्याच्या जमिनीचे न्याय्य तारण आणि प्लॉट क्रमांक F-98 येथे असलेली इमारत, डमेजरिंग प्लॉट क्षेत्रफळ 1000 चौ. मीटर चिंचोली येथे स्थित आहे औद्योगिक क्षेत्र, चिंचोली, तालुका-मोहाळ, जिल्हा- सोलापूर. <br> **खालीलप्रमाणे सीमा:-** <br> पूर्व- प्लॉट क्रमांक F-99 आणि MIDC रोड 15 MTR.R/W <br> दक्षिण- MIDC रोड 15 MTR.R/W आणि प्लॉट क्रमांक F-97 <br> पश्चिम- प्लॉट क्रमांक F-99 आणि OS No.18 <br> उत्तर- OS No.18 आणि भूखंड क्र.97 <br> **हमीदार श्री. आशिष यांनी गहाण ठेवले पद्माकरराव पाटोदेकर** <br> Prop.M/s.तिरुपती तेल केक इंडस्ट्रीज. | **मागणी सूचना:** <br> दि. १६/११/२०२४ <br> रु.४,९९,९८,०९१.००/- <br> (चार कोटी नव्याण्णव लाख अठ्याण्णव हजार एक्याण्णव रुपया) प्लस <br> लागू न केलेले व्याज १६/११/२०२४ पासून च्या प्राप्तीपर्यंत कर्ज <br> **सांकेतिक ताबा तारीख :** <br> २०/०१/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २०/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**बार्शी, दि. २१ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालया माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थी चतराचे जिल्हाधिकारी रमेश घोलप, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, सचिव पी. टी. पाटील, प्राचार्य डॉ. दिपक गुंड, किरणकुमार डाके, दीपक पारडे, नितीन पवार, विशाल गायकवाड उपस्थित होते. प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी आतापर्यंत स्पर्धा परीक्षेत ७० पेक्षा जास्त विद्यार्थी यशस्वी झाल्याचे सांगितले. परिचय प्रा. डॉ. उलभगत यांनी करुन दिला. रमेश घोलप यांनी संयम व प्रामाणिकपणा हे गुण यशस्वी होण्यासाठी आवश्यक असतो. अधिकारी व्हावं ही इच्छा या अध्यापक विद्यालयांमध्येच निर्माण झाली, असे सांगितले. शाळा-महाविद्यालयामध्ये आपण प्रशिक्षण घेतोच. पण त्यापेक्षाही उघड्या डोळ्यांनी जग पहावं व त्यातून ज्ञान मिळवावं अशी इच्छादेखील त्यांनी व्यक्त केली. डॉ. बी. वाय. यादव यांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे या उद्देशाने मामांनी ही संस्था काढली व या संस्थेतील मुले यशस्वी झालेली पाहून संस्था स्थापनेचा उद्देश साध्य झाला आहे, असे वाटते, असे सांगितले. आभार प्रदर्शन प्रा. जे. पी. गायकवाड यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जितेंद्र जळकुटे यांनी केले.



### वळसंगमध्ये बसवभक्तांकडून निषेध

**वळसंग, २१ जानेवारी-**


कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील भालकी तालुक्यामध्ये कटक चिंचोळी गावातील समतानायक जगदज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याची काही समाजकंटकांनी विटंबना केल्याची घटना घडली. याचा निषेध वळसंग ( ता. द. सोलापूर) येथे लिंगायत समाज बांधव आणि बसवभक्तांकडून करण्यात आला. वळसंगच्या श्री बसवेश्वर मंदिरात महात्मा बसवेश्वरांचे प्रतिमेचे पूजन करून विटंबना झालेल्या जागी नवीन मूर्तीची प्रतिष्ठापना व्हावी, तसेच त्या समाजकंटकाला कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी गावातील लिंगायत समाजातील सर्व बांधवांनी केली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, विनोद सुरपुरे, अनिल बर्वे, श्री महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दयानंद करजाळ, उपाध्यक्ष राजकुमार धनशेट्टी, विश्वनाथ मोटगी, बालाजी पारसवार, रविराज किणगी, आनंद तोळणुरे, रमेश बागलकोटी, खजिनदार सचिन कोळी, सचिव पत्रकार कल्लय्या स्वामी, रवी मातनळ्ळी, विकास घोडके व समस्त लिंगायत समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.




### बार्शी येथील महाराष्ट्र विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बार्शी, दि. २१ जानेवारी-**

येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ , बार्शी संचलित महाराष्ट्र विद्यालयात २० व २१ जानेवारी रोजी विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, प्रसंगी संस्थेचे पदाधिकारी माजी जनरल सेक्रेटरी व्ही. एस. पाटील, अरुण देबडवार, प्राध्यापिका उषाताई गव्हाणे व मुख्याध्यापिका के.डी.धावणे, सर्व शाखा शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमानंतर बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के, सौ.वैशाली दत्तप्रसाद सोनटक्के, कु. समीक्षा सोनटक्के व शौर्या सोनटक्के यांनी भेट दिली व अभिप्राय दिले. संस्थेच्या सर्व शाखांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. तसेच सर्व शिक्षकांनी पण प्रदर्शनामध्ये सहभाग घेतला.




### प्रा. दत्तात्रय साळवे यांना पीएच. डी पदवी प्रदान

**नातेपुते, दि. २१ जानेवारी-**

नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयचे प्रा. दत्तात्रय साळवे हिंदी विभाग यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने १० जानेवारी रोजी पीएच. डी ही पदवी राज्यपालक सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई कुलपती पद्मभूषण प्रा. जेलराज जोशी, कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलपती प्रा. लक्ष्मीकांत दाया, सिनेट सदस्या पद्मजादेवी मोहिते-पाटील, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, कुलसचिव डॉ. योगिनी घारे, माजी प्राचार्य डॉ. चंद्रकांत कोळेकर, प्र. प्राचार्य डॉ. रज्जाक शेख आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांचे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर महासंघाचे उपाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. उर्वशीराजे मोहिते-पाटील, संचालिका धनश्री घुले-पाटील यांनी अभिनंदन केले.

# मंगळवेढ्यातील अवजड वाहतूक बंद करा

## अन्यथा प्रजासत्ताक दिनी नगरपरिषदेसमोर मनसेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ जानेवारी-**

मंगळवेढा शरहातून होणार्या अवजड वाहतूकीमुळे नाहक लोकांचे जीव जात असून ही अवजड वाहतूक तात्काळ थांबवावी अन्यथा दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी नगरपालिकेच्या गेट समोर उपोषण करण्याचा इशारा मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी लेखी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी यांना दिला आहे.

**अपघातांमध्ये कित्येकांचा मृत्यू**

नागरिकांचे जीव जावूनही अवजड वाहतूक थांबत नसेल तर अजून किती जीव जाण्याचे वाट नगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासन पाहत आहे. असा सवाल शहरवासीयामधून विचारला जावून सगळे लोक रस्त्यावर येवून आक्रमक झाल्यानंतर हा प्रश्न सुटणार का? व अशी वेळ येण्याची प्रशासन वाट बघतेय काय? असा सवालही विचारला जात आहे. या सर्व घटनेला कंटाळून मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनीच आता प्रशासनाविरुध्द आंदोलनाचे हत्यार उपसले असून दि.२६ जानेवारी प्रजासत्ताकदिनी नगरपालिका कार्यालयासमोर आंदोलन करण्यावर ठाम आहेत.

मंगळवेढा शहरातून नगरपालिका हद्दीमध्ये सिमेंटचा रस्ता तयार झाल्या पासून रात्रंदिवस अवजड वाहतूक विनाथांबा सुरु आहे. मागील तीन आठवड्यापुर्वी एका तरुणाचा अपघाती मृत्यू झाला. त्या अगोदर जवळपास ८ ते ९ व्यक्तींनाही अपघातामुळे जीव गमवावा लागला. दामाजी चौकात दोन वेळा ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी झाली. सुदैवाने हा अपघात पहाटे व रविवारी शाळेला सुट्टी असल्यामुळे यामध्ये दुर्घटना नशीबाने झाली नाही. मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी अवजड वाहतूक बंद करावी या मागणीसाठी वेळोवेळी आंदोलने केली.

नगरपालिका प्रशासनाने यावर उपाय म्हणून पंढरपूर बायपास व मरवडे रोड वर दोन कमानी उभ्या केल्या. मात्र या कमानीची ऊंची ज्यादा ठेवून रडक्याचे डोळे पुसण्याचे काम नगरपालिका प्रशासनाने केल्यामुळे शहरातून होणार अवजड वाहतूक आजतागायातही थांबली नाही. नगरपालिकेवर प्रांत अधिकारी हे प्रशासक म्हणून कार्यरत असताना त्यांनीही गांभीर्यपुर्वक एवढ्या लोकांचे जीव जावूनही त्याकडे पाहिले नसल्याने सुज्ञ नागरिकामधून संताप व्यक्त होत आहे.

पोलीस प्रशासनही येणारी जाणारी वाहने उघड्या डोळ्यांनी बघत असून ते वाहतूकीबाबत नियमावर बोट ठेवून ते आमचे काम नाही असा सोज्वळ सल्ला देत असल्यामुळे अवजड वाहतूक शहरातून जाणारी अवजड वाहतूक थांबविणे नेमके कोणाचे काम आहे असा प्रश्न तमाम नागरिकांना पडला आहे.

# किसन महाराज साखरे अनंतात विलीन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जानेवारी -**

संत साहित्याचे अभ्यासक आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार डॉ. किसन महाराज साखरे (वय ८९) यांचे सोमवारी (दि. २०) रात्री साडेदहा वाजता चिंचवड येथील खासगी रुग्णालयात निधन झाले. आळंदी येथे मंगळवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वारकरी संप्रदायासह, अध्यात्मिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मंडळी उपस्थित होते.

साखरे महाराज यांची प्रकृती बिघडल्याने दोन दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असतानाच त्यांना सोमवारी हृदयविकाराचा झटका आला. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. साखरे महाराज यांच्या पश्चात मुलगी यमुना कंकाळ, मुलगा यशोधन साखरे, चिदम्बरेश्वर साखरे आहेत. वारकरी कीर्तनकार, प्रवचनकार, संत वाङ्याचे प्रवाचक, अभ्यासक, तत्त्वचिंतक म्हणून प्रसिध्द होते. त्यांचा जन्म लातूर जिल्ह्यातील पानचिंचोली येथे झाला. त्यांचे परमगुरु विनायक तथा दादा महाराज साखरे, संत साहित्याचे अभ्यासक होते. वेद, उपनिषदे, गीता, भागवत, ज्ञानेश्वरी, सकल संतगाथेचे अध्ययन आणि



अध्यापन साखरे घराण्यात सुरू होते त्यामुळे कोणतेही औपचारिक शिक्षण न घेता बालवयात किसन महाराजांना संत साहित्याच्या अध्ययन, अध्यापनाचे संस्कार लाभले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संत ज्ञानेश्वर महाराज अध्यासन सुरू झाले त्याची मूळ प्रेरणा अध्यक्ष या नात्याने किसन महाराजांची होती. ग्रंथराज ज्ञानेश्वरीची दृकश्राव्य प्रत त्यांनी प्रकाशित केली आहे. किसन महाराजांनी संस्कृत आणि मराठीतून एकूण ११५ ग्रंथ लिहले आहेत. सार्थ ज्ञानेश्वरी, सार्थ एकनाथी भागवत, सार्थ तुकाराम महाराज गाथा, सार्थ भगवद्गीता, सार्थ ब्रह्मसूत्र, सार्थ उपनिषद, सोहम योग, ज्ञानेश्वर महाराज चरित्र या सारखी ग्रंथ संपदा त्यांच्या लेखणीतून साकार झाली आहे. एकूण ५०० ताम्रपटांवर त्यांनी ज्ञानेश्वरी प्रकाशित केली आहे. किसन महाराज साखरे यांना सन २०१८ सालचा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार महाराष्ट्र शासनातर्फे प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्काराच्या पाच लाख रुपयाच्या रकमेत स्वतःचे एक लाख रुपये जमा करून ही रक्कम संस्कृतमध्ये शिक्षण घेणाऱ्या अभ्यासकासाठी देता यावी म्हणून ती किसन महाराजांनी महाराष्ट्र शासनाला सुपूर्द केली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने डी. लिट या सर्वोच्च पदवीने त्यांना सन्मानित केले आहे. नागपूरच्या जिजामाता प्रतिष्ठानने जिजामाता गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. वारकरीरत्न, मोरया पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

> गुरूवर्य डॉ. किसन महाराज साखरे यांच्या वैकुंठगमनाचे वृत्त मनाला अतिशय व्यथित करणारे आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अध्यात्म, वैदिक ज्ञान परंपरेचे निस्सीम साधक म्हणून गुरूवर्य डॉ. किसन महाराज साखरे यांची कार्यसाधना पुढील कित्येक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखी तेजोमय राहील. गुरूवर्य डॉ. किसन महाराज यांनी साधकाश्रमाच्या माध्यमातून सुरू केलेले कार्य महत्त्वपूर्ण असे आहे. संतांची साहित्य संपदा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी कीर्तन-निरुपणातून अविरत प्रयत्न केले.
>
> **-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष बलभीम शिंदे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष, अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, गोकुळ परिवाराचे संस्थापक श्री बलभीमभाऊ शिंदे यांचे वयाच्या ७५ वर्षी मंगळवारी सकाळी निधन झाले.



सोलापूर येथील खासगी रुग्णालयात मंगळवारी पहाटे साडेसहाला त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी शोभा, गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता आणि मॅनेजिंग डायरेक्टर कपिल अशी दोन मुले, कन्या नीता, सुना असा परिवार आहे. त्यांच्यावर दहिटणे (ता. अक्कलकोट) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दहिटणे येथे १ जून १९५० रोजी त्यांचा जन्म झाला. लहानपणी त्यांच्या मनावर कोरलेल्या अनेक घटनांमुळेच ते समाजकारण आणि राजकारणात रमले. सन २००३ साली ते भाजपाचे जिल्हाध्यक्ष होते. भाजपाला वाढविण्यासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. सन १९९७ ते २००२ दरम्यान चपळगाव गटाचे जिल्हा परिषद सदस्य म्हणून ते विक्रमी मतांनी निवडून आले होते. भाजपचे ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, आ. बाबासाहेब तानवडे, दत्ताअण्णा तानवडे, माजी आ. सिद्रामप्पा पाटील यांच्याबरोबर त्यांचे सलोख्याचे संबंध होते. सन २००२ ते २००७ मध्ये किणी गणाचे पं. स. सदस्य, २००३ ते २००७ अक्कलकोट बाजार समितीचे सभापती, १९९२ मध्ये स्वामी समर्थ कारखान्याचे संचालक होते. मातोश्री शुगर्स, तडवळ व धोत्री या ठिकाणी साखर कारखान्याची निर्मिती केली.



# विद्यार्थी आधुनिक युगाचा शिल्पकार

### जयप्रकाश पाटील : बंकलगी येथे स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

माहिती तंत्रज्ञान युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. विद्यार्थी हा आधुनिक युगाचा शिल्पकार आहे. विविध स्पर्धा मनुष्याच्या बौद्धिक व शारीरिक क्षमता वाढवितात. विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा परिक्षेत मोठा सहभाग नोंदवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन हनुमान विद्यामंदिर बंकलगीचे मुख्याध्यापक जयप्रकाश पाटील यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित हनुमान विद्यामंदिर येथे आयोजित स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी राष्ट्रतेज स्वामी विवेकानंद, शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक आप्पासाहेब हत्तुरे, उपसरपंच नागनाथ कोणदे, काशिनाथ कोणदे गुरुजी, गोधराज भक्ति मंडळाचे अध्यक्ष सुनीलभाऊ देशमुख आदी उपस्थित होते. स्वागत व सत्कार मुख्याध्यापक जयप्रकाश पाटील यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुनिलभाऊ देशमुख, काशिनाथ कोणदे यांनी मनोगत व्यक्त केले. विवेकानंद सप्ताहात वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, खो-खो स्पर्धा, कबड्डी स्पर्धा, रांगोळी स्पर्धा आदी विविध प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. प्रास्ताविक आप्पासाहेब हत्तुरे यांनी केले. यावेळी आप्पासाहेब हत्तुरे, ए. व्ही. भावसार, पत्रकार पंडीत कुंभार, एस. एस. पाटील, एन. एस. राऊत, सुप्रिया जामगे उपस्थित होते.

### सरकारी कामात अडथळा; आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ जानेवारी-**

बार्शी येथील मे.सत्र न्यायाधीश श्री. चव्हाण साहेब यांनी सरकारी कामात अडथळा केल्याच्या गुन्ह्यात संशयित आरोपी बबलु उर्फ आदित्य कसबे याचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.



यात अधिक माहिती अशी की, बार्शी सब जेल येथील सब जेलर संदीपकुमार नालपे यांनी बबलू ऊर्फ आदित्य पुरुषोत्तम कसबे व इतर यांचे विरुध्द बार्शी तहसील कार्यालय, सब जेल येथे येऊन धक्काबुक्की करीत शिवीगाळ करुन सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने बबलू ऊर्फ आदित्य पुरुषोत्तम कसबे यांनी बार्शी येथील मे.सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी होऊन मे. सत्र न्यायाधीश चव्हाण यांनी २० जानेवारी रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला. सदर अटकपूर्व जामीन अर्जाचे काम ॲड.अमोल अलाट व ॲड. विशाल गोणेकर यांनी पाहिले.



# चंद्रशेखर विद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय सुवर्ण बाण पुरस्कारासाठी निवड

## हरीयाणाच्या गदपुरी येथे होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ जानेवारी-**

येथील चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक विभागातील सहा कब स्काऊट विद्यार्थी आणि सहा बुलबुल गाईड विद्यार्थिनींची द भारत स्काऊटस् आणि गाईडस् राष्ट्रीय मुख्यालय, नवी दिल्ली द्वारा आयोजित राष्ट्रीय सुवर्ण बाण पुरस्कार नवी दिल्ली-२०२५ यासाठी निवड झाली आहे.

२२ फेब्रुवारी २०२५ रोजी स्काऊट गाईड चळवळीचे आद्य संस्थापक लॉर्ड बेडन पॉवेल यांचे जन्मदिनी १० वर्षाच्या आतील स्काऊटींगमधील या सर्वोच्च राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने शाळेच्या विद्यार्थ्यांना नॅशनल युथ कॉम्प्लेक्स गदपुरी जिल्हा पलवल, हरियाणा राज्य येथील राष्ट्रीय कार्यक्रमात नॅशनल प्रेसिडेंट डॉ.अनिल कुमार जैन आणि राष्ट्रीय मुख्य आयुक्त डॉ. के. के. खंडेलवाल (आय.ए.एस) यांच्या हस्ते राष्ट्रीय सुवर्णबाण पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्काराने शाळेने २० वर्षांची राष्ट्रीय सुवर्णबाण पुरस्काराची परंपरा कायम राखली. यावर्षी या पुरस्कारा साठी मिथिलेश गणेश कुलकर्णी ,जयदीप सुभाष पवार, श्रेयश लक्ष्मण पवार, शंभूराजे सचिन मांगले, आयुष नागनाथ जाधव, पवन गणेश कुलकर्णी हे सहा कब विद्यार्थी व ईश्वरी महादेव मुंडफणे, स्वरा संजय सुरवसे, अन्वी महेंद्र लोंढे, सिद्धी विठ्ठल गमे, प्रांजल दत्तात्रय घुले, शिवन्या शंकर वाघमारे या सहा बुलबुल विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावरील परीक्षेमध्ये यश मिळवून राज्यस्तरावरील परीक्षेमध्ये प्राविण्य मिळवत चतुर्थ चरण राज्य पुरस्कार व हीरक पंख राज्य पुरस्कार प्राप्त केले होते. या पार्श्वभूमीवर पुरस्कार देण्यात येत असल्याची माहिती ट्रेनिंग कमिशनर शंकर यादव यांनी दिली.


याप्रसंगी प्लॉक लिडर करुणा मधुकर धाईजे उपस्थित होत्या. या यशाबद्दल सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा मुख्य आयुक्त कादर शेख, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, जिल्हा संघटक स्काऊट श्रीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया शिरसाट, आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट शैक्षणिक संकुलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामदासजी देशमुख, उपाध्यक्षा शुभांगी देशमुख, सचिव भारत कारंडे, संस्थेचे संचालक यशराज देशमुख,गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे, केंद्रप्रमुख भक्ती नाचणे, मुख्याध्यापिका सुरेखा जाधव उपस्थित होते.

# पंढरपूर येथील गोविंद सबनीस यांना पक्षीमित्र जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जानेवारी -**

गेली चार दशके महाराष्ट्रात पक्षीविषयक कार्य करणारी संस्था 'महाराष्ट्र पक्षिमित्र' तर्फे देण्यात येणाऱ्या २०२४ च्या पक्षिमित्र पुरस्कारांची घोषणा झाली असून यंदाचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार पंढरपूरचे गोविंद सबनीस यांना जाहीर करण्यात आला.

महाराष्ट्र पक्षीमित्रच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. इतर पुरस्कारांपैकी पक्षी संवर्धन व सुश्रूषा पुरस्कार कर्नाटकच्या बेळगाव जिल्ह्यातील निपाणी येथील फिरोज चाऊस यांना, तर पक्षी जनजागृती पुरस्कार वर्ध्याचे राहुल वकारे यांना जाहीर



झाला. पक्षी संशोधन पुरस्कार या गटात योग्य प्रस्ताव प्राप्त न झाल्याने यंदा हा जाहीर करण्यात आला नाही.यावर्षी पासून नव्याने पक्षीविषयक साहित्य पुरस्काराची घोषणासुद्धा यावेळी करण्यात आली. यावर्षीचा पहिला पक्षी साहित्य पुरस्कार परभणी येथील माणिक पुरी यांना जाहीर झाला.

पक्षीसंबंधित विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव व्हावा, या उद्देशाने महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे २०१९ पासून या पुरस्कारांची सुरुवात करण्यात आली. यामध्ये दरवर्षी चार पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी पासून यामध्ये साहित्य पुरस्काराची भर पडली आहे. या पुरस्कारांची घोषणा महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे अमरावती येथे संघटनेचे अध्यक्ष डॉ.जयंत वडतकर यांनी केली. पुरस्कारांचे वितरण शेवगाव जि.अहिल्यानगर येथे होणाऱ्या ३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार आहे.

यंदाचा स्व. रमेश लाडखेडकर स्मृती पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार हा दीर्घकाळपक्षिमित्र चळवळीत राहून, पक्षीसंवर्धन व जनजागृती साठी कार्यरत पक्षिमित्र, मार्गदर्शक पंढरपूरचे ज्येष्ठ सभासद गोविंद सबनीस यांना जाहीर झाला आहे. रोख रक्कम, मानपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कार विदर्भ पक्षिमित्र मंचद्वारे डॉ.अनिल पिंपळापुरे यांच्यातर्फे प्रायोजित केला आहे. यंदाचा पहिला सुशीला पाटकर स्मृती पक्षी साहित्य पुरस्कार ॲड. चंदना साळगावकर, मुंबई यांच्यातर्फे प्रायोजित केला आहे.

**फेब्रुवारीत होणार पुरस्कारांचे वितरण**

या पुरस्कारांचे वितरण ३७ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात करण्यात येणार असून यावर्षी महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन शेवगाव, जि.अहिल्यानगर (अहमदनगर) येथे १ व २ फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार आहे. या पुरस्कारांचे वितरण संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी दिली.

## महत्त्वाचे

### महाकुंभात हिमा दासने केले पवित्र गंगा स्नान



**महाकुंभ नगर :** महिन्यांच्या निलंबनानंतर नवीन हंगामाची तयारी करत असलेली भारताची स्टार धावपटू हिमा दास हिने येथील महाकुंभाला भेट दिली आणि पवित्र गंगेत स्नान केले, असे तिच्या आध्यात्मिक गुरूंनी सांगितले आहे. हिमा दास ही आसाममधील धिंग या दुर्गम गावाची असून ती २०१८ च्या आशियाई सुवर्णपदक विजेती आहे. तिला 'धिंग एक्सप्रेस' या टोपणनावाने ओळखले जाते. तिचे गुरु केशव दास जी महाराज यांचे आशीर्वाद घेतल्यानंतर ती आपल्या मित्रांसह येथे आली होती. महाराज निर्मोही आखाड्याशी संलग्न आहेत. जेव्हा हिमाला महाकुंभात ईशान्येकडील शिबिराबद्दल कळले तेव्हा ती भेटण्यास स्वतःला रोखू शकली नाही. ती तिच्या मैत्रिणींसह आली, गंगेत स्नान केले व रविवारी निघून गेली, असे महाराजांनी वृत्तसंस्थेला सांगितले. या अनुभवाबद्दल ती खूप उत्साहित होती व नामघर (एक पारंपारिक आसामी प्रार्थना कक्ष) पाहण्यासाठी आली. जत्रेतील तिची भेट खूप आनंददायी होती, असेही त्यांनी सांगितले. नामघरमध्ये 'मणिकुट' (आतील गर्भगृह), 'कीर्तनघर' (प्रार्थना कक्ष) आणि 'रंगली सुहा' (प्रवेशद्वार) मणिकुटमध्ये भगवान नारायण किंवा भागवत ग्रंथांची मूर्ती आहे.

### डी. गुकेश-नाकामुरा नॉर्वेत आमने-सामने

**स्टॅव्हेंजर :** येथे आयोजित नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत फिडे क्रमवारीत अव्वल १० पैकी पाच खेळाडूंनी आधीच आपला प्रवेश निश्चित केला आहे. या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत विश्वविजेता भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश व जगप्रसिद्ध अमेरिकन ग्रॅण्डमास्टर हिकारू नाकामुरा आमने-सामने उभे ठाकणार आहेत, असे नॉर्वे बुद्धिबळाचे संस्थापक व स्पर्धा संचालक केजेल मॅडलँड यांनी मंगळवारी जाहीर केले. नाकामुरा सध्या जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असून त्याची नॉर्वे बुद्धिबळात भाग घेण्याची ही सातवी वेळ असेल. या वर्षीच्या स्पर्धेत सर्वात तरुण जागतिक विजेता गुकेश डोम्मराजू जगातील अव्वल तीन खेळाडूंशी लढत देत असल्यामुळे तीव्र लढती होतील. भारताचा प्रथम क्रमांकाचा अर्जुन एरिगेसी आणि चीनचा वेई यी नॉर्वे बुद्धिबळात पदार्पण करतील. २६ मे ते ६ जून २०२५ या कालावधीत नॉर्वेच्या स्टॅव्हेंजर येथे होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रथम विश्वमानांकित मॅग्नस कार्लसन, दुसऱ्या क्रमांकावरील फॅबियानो कारुआना, तिसऱ्या क्रमांकावर हिकारू नाकामुरा, चौथ्या क्रमांकावर अर्जुन एरिगेसी, पाचव्या क्रमांकावर डी. गुकेश व नवव्या क्रमांकावरील वेई यी हे सहभागी होणार आहेत.

### वोल्व्हरहॅम्प्टनला हरवून चेल्सी चौथ्या स्थानावर

**लंडन :** चेल्सीने स्टॅमफोर्ड ब्रिज येथे वोल्व्हरहॅम्प्टन वॅण्डरर्सवर ३-१ असा विजय मिळवून प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धेतील पाच सामन्यांपासूनची विजयहीन मालिका संपवली आणि गुणतालिकेत चौथ्या स्थानावर झेप मारली. चेल्सीच्या विजयात तोसिन अदाराबियो, मार्क कुकुरेला आणि नोनी माडुके यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला व आपल्या संघाला पुन्हा पहिल्या चारमध्ये पोहोचवले. चेल्सीने सकारात्मक सुरुवात केली व पूर्वार्धात तोसिनच्या माध्यमातून संयमी गोल केला व योग्य आघाडी घेतली. तोसिन या हंगामात चेल्सीचा १३ वा वेगवेगळा प्रीमियर लीग गोल करणारा खेळाडू ठरला. २०२४-२५ मध्ये केवळ आर्सेनलनेच (१४) स्पर्धेत जास्त गोल केले आहेत. मॅट डोहर्टीने कॉर्नरवरून गोल केला व वोल्व्हरहॅम्प्टन वॅण्डरर्सला सामन्यात बरोबरी मिळवून दिली होती.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७५,८३८.३६ (-१,२३५.०८) |
| निफ्टी | २३,०२४.६५ (-३२०.१०) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | ८१,२३० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९६,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.४ | १५.९ |
| अमरावती | ३२.४ | १३.९ |
| भंडारा | ३०.८ | १३.६ |
| बुलडाणा | ३०.६ | १४.० |
| चंद्रपूर | ३०.६ | -.- |
| गडचिरोली | ३२.२ | १२.४ |
| गोंदिया | ३०.२ | १३.४ |
| नागपूर | ३१.६ | १२.२ |
| वर्धा | ३१.६ | १३.८ |
| वाशीम | ३२.६ | १६.२ |
| यवतमाळ | ३१.० | १२.२ |

# भारताचे इंग्लंडविरुद्ध दमदार सुरुवातीचे लक्ष्य

## शमीचे पुनरागमन लक्षवेधी







◆ **कोलकाता, २१ जानेवारी**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय टी-२० संघ बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत खेळणार आहे. कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर बुधवारी भारत-इंग्लंडदरम्यान पहिला टी-२० सामना खेळला जाणार आहे. भारताने इंग्लंडविरुद्ध नवीन व दमदारपणे सुरुवात करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. तंदुरुस्त झालेला वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या पुनरागमनाकडे सर्वांचे लक्ष असेल.

अलिकडच्या कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघाची स्थिती दयनीय झाली होती, परंतु आता या टी-२० मालिकेतून त्या नुकसानीची भरपाई करण्याचा प्रयत्न करतील.

पाच टी-२० व त्यानंतर तीन एकदिवसीय सामन्यांची मालिकेत सहभाग असलेल्या या दोन्ही संघांसाठी पुढील महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स चषकापूर्वी संयोजनांचा प्रयोग करण्यासाठी व फॉर्मचे मूल्यांकन करण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ आहे.

चार सामने गमावल्यानंतरही मोहम्मदग शमीने २०२३ च्या वन-डे विश्वचषकात भारताचा आघाडीचा बळी घेणारा गोलंदाज ठरला त्याने स्पर्धेत एकूण २४ बळी घेतले असून यात वानखेडे स्टेडियम येथे न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यातील ७ बळींचा समावेश आहे.

१९ नोव्हेंबर २०२३ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्यात झालेल्या पराभवानंतर गुडघ्याला दुखापत झाली होती व त्याला शस्त्रक्रिया करावी लागली होती. त्यानंतर काही आठवड्यांपूर्वी स्थानिक सामन्यात त्याच्या डाव्या गुडघ्यावर सूज आली होती. भारताच्या चॅम्पियन्स चषक संघात त्याचा समावेश झाल्यानंतर, शमीचे पुनरागमन राष्ट्रीय स्तरावर लक्ष वेधून घेईल.

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला पाठीच्या दुखापतीमुळे व चॅम्पियन्स चषकातील त्याच्या सहभागाबद्दल शंका असल्यामुळे शमीचे पुनरागमन अधिक महत्त्वाचे आहे.

३४ वर्षीय शमीने पश्चिम बंगालसाठी रणजी करंडकात स्पर्धात्मक पुनरागमन केले व ७ बळी टिपत हंगामातील आपल्या संघाला पहिला विजय मिळवून दिला. त्यानंतर त्याने सय्यद मुश्ताक अली चषकांत ११ बळी व विजय हजारे ट्रॉफीतही त्याने प्रभावी कामगिरी केली.

शमीची टी-२० आंतरराष्ट्रीय य कारकीर्द अधूनमधून घडत राहिली आहे. २०१४ मध्ये पदार्पणानंतर तो केवळ २३ सामने खेळला. या फॉरमॅटमध्ये त्याचा शेवटचा सामना २०२२ च्या टी-२० विश्वचषक उपांत्य फेरीत इंग्लंडविरुद्ध होता.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय कसोटी संघ अजूनही ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या पराभवाच्या धक्क्यातून सावरत आहे. मात्र आता भारतीय टी-२० संघाकडून चांगली कामगिरी करणे अत्यावश्यक झाले आहे.

**उपकर्णधार म्हणून अक्षरचे पदार्पण**

अष्टपैलू अक्षर पटेल टी-२० स्वरूपात भारतीय संघाचा उपकर्णधार म्हणून पदार्पण करेल. गत वर्षी कॅरिबियनमध्ये भारताच्या विजयी टी-२० विश्वचषक मोहिमेत त्याच्या उत्कृष्ट अष्टपैलू योगदानाबद्दल त्याला बक्षीस मिळाले आहे. अक्षरने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात ३१ चेंडूत ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. केरळच्या संजू सॅमसनवरही सर्वांचे लक्ष असेल.बुधवारच्या सामन्यानंतर मालिकेतील दुसरा टी-२० सामना २५ जानेवारी रोजी चेन्नई येथे होणार आहे. त्यानंतर राजकोट (२८ जानेवारी), पुणे (३१ जानेवारी) आणि मुंबई (२ फेब्रुवारी) भारत व इंग्लंड संघादरम्यान टी-२० सामने होतील.

एकदिवसीय सामन्यांची सुरुवात ६ फेब्रुवारी रोजी नागपूरमध्ये होईल, त्यानंतर कटक (९ फेब्रुवारी) आणि अहमदाबाद (१२ फेब्रुवारी) येथे वन-डे सामने होणार आहे.

**भारतीय संघ :** सूर्यकुमार यादव (कर्णधार), अक्षर पटेल (उप-कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, रिंकू सिंग, नितीश कुमार रेड्डी, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर आणि ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक).

**इंग्लंड संघ :** जोस बटलर (कर्णधार), हॅरी (उप-कर्णधार), फिल साल्ट (यष्टिरक्षक), जेकब बेथेल, लियाम लिव्हिंगस्टोन, रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, गस ॲटकिन्सन, ब्रायडन कार्स, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, जेमी स्मिथ, आदिल रशीद, साकिब महमूद आणि मार्क वूड.

◄(वृत्तसंस्था)

**भारत- इंग्लंड पहिला टी-२० सामना**

**स्थळ :** ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ :** सायंकाळी ७ वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# वैष्णवी शर्माने घडवला इतिहास

## १९ वर्षांखालील महिला टी-२० विश्वचषकात हॅट्ट्रिक घेणारी पहिली भारतीय खेळाडू





◆ **क्वालालम्पूर, २१ जानेवारी**

एक उल्लेखनीय कामगिरी करताना वैष्णवी शर्माने मंगळवारी १९ वर्षांखालील महिला टी-२० क्रिकेट विश्वचषकात हॅटट्रिक घेणारी पहिली भारतीय व जगातील तिसरी गोलंदाज होऊन क्रिकेट इतिहासात आपले नाव कोरले आहे.

मंगळवारी क्वालालम्पूरमधील बायुमास ओव्हल येथे मलेशियाविरुद्ध भारताच्या दुसऱ्या गट साखळी सामन्यात ही ऐतिहासिक कामगिरी करण्यात आली.

वैष्णवी शर्माने प्रभावी गोलंदाजी करत ४ षटकांत केवळ ५ धावा देत ५ बळी घेत सामन्याचा शेवट केला. तिच्या उल्लेखनीय कामगिरीने मलेशियाच्या संपूर्ण संघाला १४.३ षटकांत अवघ्या ३१ धावांत गुंडाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

वैष्णवी शर्माने आपल्या संघाला केवळ विजय मिळवून दिला नाही, तर १९ वर्षांखालील टी-२० क्रिकेट विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वोत्तम गोलंदाजीचा एक नवा विक्रमही प्रस्थापित केला.

वैष्णवीच्या जबरदस्त गोलंदाजीच्या बळावर भारताने मलेशियावर १० गड्यांनी एकतर्फी विजय नोंदवला. मलेशियाला ३१ धावांत गुंडाळल्यनंतर भारताने अवघ्या २.५ षटकांत एकही गडी न गमावता विजय प्राप्त केला.

भारताचा हा दुसरा विजय ठरला. अन्य सामन्यात श्रीलंकेने वेस्ट इंडीजवर ८१ धावांनी विजय नोंदविला. अ गटात भारत व श्रीलंकाचे प्रत्येकी ४ गुण झाले असून भारत अव्वल स्थानी आहे. श्रीलंकेने मर्यादित २० षटकांत ५ बाद १६६ धावा उभारल्या, परंतु प्रत्युत्तर देताना वेस्ट इंडीजचा संघ १९.४ षटकांत ८५ धावांतच गारद झाला.

◄(वृत्तसंस्था)

# दुसरी विश्वचषक खो-खो २०२७ ला इंग्लंडमधील बर्मिंगहॅममध्ये

## आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांची घोषणा



**नवी दिल्ली, २१ जानेवारी-**

पहिल्या-वहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेच्या यशस्वी समारोपानंतर आंतरराष्ट्रीय तथा खो खो फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांनी २०२७ मधील विश्वचषक स्पर्धेचे यजमानपद इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे होणार असल्याचे जाहीर केले.

भारतीय संघाने पुरुष आणि महिला या दोन्ही गटात ट्रॉफी जिंकून पहिल्या विश्वचषक स्पर्धेच्या स्पर्धेनंतरच्या पत्रकार परिषदेत त्यांनी हे जाहीर केले. यावेळी केकेएफआयचे सरचिटणीस एम.एस. त्यागी, आंतरराष्ट्रीय खो खो फेडरेशनचे सरचिटणीस रोहित हल्दानिया, इज माय ट्रिपचे वीरेंद्र कुमार, केकेडब्ल्यूसीचे सीईओ मेजर जनरल विक्रम देव डोग्रा आणि विश्वचषक विजेते दोन्ही कर्णधार प्रतीक वाईकर आणि प्रियांका इंगळे उपस्थित होते. केकेएफआयचे अध्यक्ष आणि सचिव यांच्याकडे ट्रॉफी सुपूर्द करताना कर्णधारांनी विजयाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

दोन्ही संघांचे प्रशिक्षक सुमित भाटिया, डॉ. मुन्नी जून, प्राची वाईकर (महिला) आणि अश्वनी शर्मा, शिरीन गोडबोले (पुरुष ) यांनीही या स्पर्धेचे आयोजन करून खेळाला जागतिक स्तरावर पोहोचण्यास मदत केल्याबद्दल महासंघाचे आभार मानले. पत्रकारांना बोलताना करताना अध्यक्ष सुधांशू मित्तल म्हणाले, पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा खूप यशस्वी ठरली. पुढील विश्वचषक २०२६-२०२७ मध्ये बर्मिंगहॅम, इंग्लंड येथे होणार असल्याची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे. दुसरी स्पर्धा पहिल्यापेक्षा मोठी आणि सर्व अपेक्षा ओलांडलेली पाहून आम्हाला अधिक आनंद होईल. आंतरराष्ट्रीय खो खो फेडरेशनचे पुढील अधिवेशन देखील १७ एप्रिल रोजी होणार आहे, ज्यात पुढील चार वर्षांच्या रणनीतीवर चर्चा केली जाईल आणि औपचारिकता ठरविली जाईल. पुढील खो खो विश्वचषक स्पर्धेचे ठिकाण जाहीर करताना श्री. मित्तल यांनी विश्वचषकाच्या यशाबद्दल विविध राजकारणी आणि मान्यवरांनी अभिनंदन केल्याचा खुलासाही केला. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा, रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक आणि केशव प्रसाद मौर्य, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल, समाजवादी पक्ष अध्यक्ष अखिलेश यादव आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांचा समावेश आहे.

# आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू भारतीय संस्कृतीच्या मोहात

## भारतीय आदरातिथ्याची केली प्रशंसा



**नवी दिल्ली, २१ जानेवारी-**

नवी दिल्लीमध्ये पार पडलेल्या पहिल्या खो-खो विश्वचषकात भारतीय पुरुष आणि महिला संघांनी विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेने जगभरातील प्रेक्षकांना खिळवून ठेवले आणि अनेकांसाठी अविस्मरणीय अनुभव ठरश्रला. या स्पर्धेची सुरुवात २३ देशांच्या सहभागासह सांस्कृतिक महोत्सवाने झाली, ज्यात सहा खंडांतील संघ सहभागी झाले होते. उत्कृष्ट संगीत, नृत्य सादरीकरणांनी सजलेल्या भव्य उद्घाटन समारंभाने स्पर्धेला सुरुवात झाली. भारतीय आदरातिथ्याचा सुखद अनुभव आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडूंनी घेतला, आणि रोमहर्षक खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भारतीय संस्कृती अनुभवणे हा आनंददायी प्रवास होता भारतात प्रथमच आलेल्या इराणच्या अमीर घियासी यांनी सांगितले, भारतामध्ये येण्याचा आमचा हा पहिलाच अनुभव होता, आणि तो खूप सुंदर ठरला. आदरातिथ्य अप्रतिम होते. आम्ही येथे पोहोचल्यापासून सर्व गोष्टी व्यवस्थित व नियोजनबद्ध होत्या. आम्हाला आमच्या गरजेनुसार आदरतिथ्य पुरविण्यात आले. भारतीय संस्कृती अनुभवण्याची संधी मिळाली, आणि ती खरोखरच अद्भुत होती. न्यूझीलंड महिला संघातील भारतीय वंशाच्या अमनदीप कौर यांनीही भारतीय आदरातिथ्याचे कौतुक करत सांगितले, स्पर्धा खूप आव्हानात्मक होती, जे आम्हाला अपेक्षित नव्हते. आम्ही स्पर्धेत खेळण्याचा खूप आनंद घेतला. पुढील स्पर्धेसाठी अधिक मेहनत घेण्यासाठी आम्हाला आत्मविश्वास या स्पर्धेतून मिळाला आहे. स्पर्धेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी खो-खो फेडरेशन ऑफ इंडिया (KKFI) चे अध्यक्ष सुधांशू मित्तल, सरचिटणीस एम.एस. त्यागी, आणि आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाचे सरचिटणीस रोहित हल्दानिया यांनी घेतली होती. प्रत्येक संघाच्या गरजांनुसार सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या. अमनदीप कौर पुढे म्हणाल्या, भारतीयांनी जे वातावरण तयार केले, ते खेळाडूंना अतिशय आवडले. सर्व देश एकत्र येऊन खेळाचा आनंद घेताना पाहणे अद्भुत होते. कोणत्याही समस्यांवर त्वरित उपाय केले जात होते. डॉक्टर्स, फिजिओ, अन्न आणि पेय यांची व्यवस्था उत्कृष्ट होती. भारत हा या स्पर्धेसाठी सर्वोत्कृष्ट यजमान ठरला आहे.

भारतीय संस्कृतीचा अनुभव व सफर आंतरराष्ट्रीय खेळाडूंना भारतीय संस्कृती जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. त्यांनी आग्र्यातील ताजमहाल पाहिला आणि भारतीय स्ट्रीट फूडचा आस्वाद घेतला.

पेरू पुरुष संघाचे प्रशिक्षक सिल्वाना पॅट्रिशिया म्हणाले, इथले आदरातिथ्य, अन्न, संगीत, नृत्यप्रदर्शन अप्रतिम होते. प्रत्येक ठिकाणी पाहण्यासारखे इतके काही आहे की, तुम्हाला सगळीकडे एकाच वेळी पोहोचायचे आहे असे वाटते. हा अनुभव अप्रतिम होता.

ब्राझील पुरुष संघाचे प्रशिक्षक लौरा डोएरिंग म्हणाले, भारतीय संस्कृती आमच्या संस्कृतीपेक्षा खूप वेगळी आहे. प्रत्येक गोष्टीकडे पाहताना आम्ही खूपच प्रभावित झालो आहोत. येथे आल्याचा खूप आनंद आहे. इथली माणसं खूप चांगली आहेत, आणि आदरातिथ्य ही सर्वोत्कृष्ट गोष्ट आहे. भारतीय नृत्याचे काही प्रकार शिकून ते आम्हाला आमच्यासोबत घेऊन जायचे आहे.

**खेळातून सांस्कृतिक बंध वाढवणारी स्पर्धा**

भारतीय संस्कृतीचा अनुभव घेत आणि खो-खोचा उत्साह अनुभवत, या स्पर्धेने आंतरराष्ट्रीय खेळाडूंना एकत्र आणले. या पहिल्या विश्वचषकाने केवळ खेळासाठीच नव्हे, तर संस्कृतीच्या देवाणघेवाणीसाठीही एक अनोखे व्यासपीठ उभे केले.

# डॉजबॉलमध्ये दमाणी प्रशाला तृतीय



**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

राज्य शालेय डॉजबॉल स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांच्या गटात बी. एफ. दमाणी प्रशालेने तृतीय स्थान मिळविले. यवतमाळ येथे झालेल्या स्पर्धेत पुणे विभागाकडून प्रतिनिधित्व केलेल्या दमाणी प्रशालेने ही कामगिरी केली. या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक समर्थ भिमरथी, पवन भोसले व शीतलकुमार शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे स्थानीय अध्यक्ष कालिदास जाजू , सचिवा मंगल काबरा, सहसचिव उज्वल तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहुल इंगळे यांनी अभिनंदन केले.

**संघ :** सार्थक सदाशिव मानकुसकर, अंशुल राम दरगड, मुजीब मोहम्मद शेख, पार्थ ज्ञानेश्वर सोलंकर, ओंकार महेश तोडकर, अथर्व रवींद्र होंडराव, सुमिरन माणिक डिंगणे, प्रद्युम्न जयेश उपासे, अथर्व अमर सोनी, समर्थ संदीप सलगर, संकेत संतोष तगारे, स्वानंद संतोष मुळे.


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन :- डिस्ट्रिक्ट व सबडिस्ट्रिक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढमधील मौजे मंजरेवाडी सोलापूर येथील सर्व्हे नं. १२३/२/१ 'चंद्रलोक नगरी' या नावाने ओळखले जाणारे नगरामधील प्लॉट नं. ११४ यासी एकूण क्षेत्र ११४४ स्क्वेअर फुट इतकी खुलीजागा आहे.

यासी चतुःसिमा खालीलप्रमाणे :- पूर्वेस - प्लॉट नं. ११३, दक्षिणेस - रचना हौसिंग सोसायटी, पश्चिमेस - प्लॉट नं ११५, उत्तरेस - ६ मी. डीपी रोड.

वरील नमुद वर्णनाची खुली जागा ही जयेंद्र कृष्णसागर मिठ्ठापल्ली यांचे मालकीहक्काची व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी सदर खुली जागा हि विकी करणेचे व आमचे अशिलांनी सदर मिळकत खरेदी करणेचा व्यवहार उभयंतामध्ये तोंडी व्यवहार ठरलेला आहे. वरील नमुद मिळकत ही निर्वेध व निजोखमीची असलेबाबतची खात्री व निर्वाळा जयेंद्र कृष्णसागर मिठ्ठापल्ली यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरीही सदरह खुली जागा संदर्भात कोणाचीही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, टाच, दान लिन, लिज पोटगी, वारसाहक्क, साठेखत, खरेदीखत, मृत्यूपत्र करारपत्र तसेच तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत खालील नमुद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे अशिल हे जयेंद्र कृष्णसागर मिठ्ठापल्ली यांचे सोबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणीचीही कोणतीही तक्रार चालणार नाही.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २१/०१/२०२५

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. ए.बी. बनसोडे
बी.ए., एल.एल.बी. ॲडव्होकेट
पत्ता ११६, अळ्ळे नगर, वसंत विहार रोड,
सोलापूर, मो. ९८२२७१७६०१



## Classifieds

**पाहिजेत**

**हेवेनली ब्युटी लेडिज सलोन ॲन्ड ॲकॅडमी पत्ता : शॉप नं. ७ मेलोडी अपार्टमेंटजवळ आयएमएस स्कूल येथे अनुभवी स्टाफ पाहिजेत. बेसीक टू ॲडव्हॉन्स कोर्स चालू आहेत.**
**संपर्क : ८८८८४३३२८५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



## जाहीर समन्स

रे. मु. नं. २५२/२०२१ नि.नं.२१
पुढील नेमलेली तारीख १८/०२/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्ही. साहेब यांचे न्यायालयात**

**श्री. नरहरी दगडू बारंगुळे,** वय ५१ वर्षे, धंदा- शेती, रा. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **वादी**

**- विरुद्ध -**

**श्री. मच्छिंद्र दगडू बारंगुळे, वगैरे,**
**४) श्री. बबन प्रभू बारंगुळे,** वय ५२ वर्षे, धंदा- शेती, रा. खांडवी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **प्रतिवादी**

ज्याअर्थी, वादीने यातील प्रतिवादी विरुद्ध सरसनिरस मानाने वाटप व निरंतर मनाई मिळणेसाठी दावा दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी नं. ४ बबन प्रभू बारंगुळे यांना वरील पत्त्यावर अनेकवेळा समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. ४ सदर पत्त्यावर आढळून येत नाही. प्रतिवादी नं. ४ याचा कायमचा पत्ता वरील पत्त्याशिवाय वादीकडे नाही.

तरी प्रतिवादी नं. ४ बबन प्रभू बारंगुळे यांना या जाहीर समन्सने कळविण्यात येते की, हे जाहीर समन्स प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत अथवा पुढील नेमलेली तारीख दि. १८/०२/२०२५ रोजी नेमलेल्या तारखेस सदर दाव्यात प्रतिवादी नं. ४ बबन प्रभू बारंगुळे त्याचे प्रतिनिधी अथवा जातीने हजर राहून आपला बचाव दाखल करावा व आपला कायमचा पत्ता दाव्यात हजर करावा.

वरील प्रमाणे प्रतिवादी नं. ४ याने सदर दाव्यात हजर न झाल्यास वादीच्या दाव्यातील मागणीप्रमाणे प्रतिवादी नं. ४ यांचे विरोधात वादीच्या हक्कात सदर दाव्याचा हुकुमनामा होईल. कळावे याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स आमच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. १६/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहा. अधीक्षक** सि. ज. ज्यु. डि., बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## ई निविदा सूचना

महावितरण

महावितरण बार्शी विभागांतर्गत एमपॅनेलमेंट योजनेअंतर्गत उच्चदाब व लघुदाब वीजवाहिन्या , वीज वितरण रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती करण्याच्या तसेच नामिकाप्रविष्ट (Empanelment) योजनेअंतर्गत नवीन वीजजोडणी/डीपीडीसी/१००% डीडीएफ/ NSC च्या कामाकरिता अनुभवी ठेकेदारांकडून सन २०२५ – २६ (१ वर्षाकरिता) या कालावधीसाठी ऑनलाईन ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई– निविदा क्र. **EE/BRS/T/07** ते **10/2024-2025** असून, निविदा विक्री दि. २०.०१.२०२५ ते ०९.०२.२०२५ पर्यंत आहे. निविदा सादर करण्याची अंतिम दि. १०.०२.२०२५ दु. ११:०० वाजेपर्यंत राहील. सदर तपशील महावितरण कंपनीच्या अधिकृत **http://works.mahadiscom.in/eTender/etender** संकेतस्थळावर उपलब्ध असेल. सदरील निविदा स्वीकारणे/ नाकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीदाराकडे राहतील.

**HO/PRO/NO/37/2024-25** सही/–
**कार्यकारी अभियंता, महावितरण, बार्शी विभाग**



## जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ०४/२०२५ नि.नं.०५
पुढील नेमलेली तारीख २४/०२/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनि. डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

१) **गुलाब बाबू गोफणे,** वय ८१ वर्षे, धंदा- काही नाही, रा. फपाळवाडी रोड, राणा कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **रमेश गुलाब गोफणे,** वय ३७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. आगळगांव रोड, सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **भारत गुलाब गोफणे,** वय ३६ वर्षे, धंदा- मजुरी, रा. फपाळवाडी रोड, राणा कॉलनी, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणीही नाही** — **सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ हे अर्जदार नं. २ व ३ चे वडील आहेत. यातील अर्जदार नं. १ ची पत्नी व अर्जदार नं. २ व ३ ची आई सोनाबाई गुलाब गोफणे ही दि. २९/०७/२०२४ रोजी बार्शी येथे मयत झालेली आहे आणि अर्जदार नं. १ ते ३ हेच मयत सोनाबाई गुलाब गोफणे हिचे कायदेशीर वारस आहेत. मयत सोनाबाई ही मार्केट यार्डात आडत दुकानी कामाला होती. मयत सोनाबाईने मार्केट यार्ड, बार्शी येथील पोस्ट ऑफिसमध्ये बचत खाते (Seving Bank General) उघडले होते. सदरचे खाते नं. १८०६७०३५४६ असे असून सदर बचत मयत सोनाबाई तिचे हयातीत सदर खात्यात वेळोवेळी रक्कमा जमा केलेल्या आहेत व काढून घेतलेल्या आहेत. तसेच सदर खातेचा CIF ID १३९९६३१२० आ नंबर आहे. त्यांचे नावे व्यवहार पाहता ता. १९/०४/२०२४ अखेर सदरच्या खात्यात र. रुपये १,१५,६४३.७५ जमा आहेत. यातील अर्जदार याने सदरची रक्कम वारस नात्याने अर्जदार नं. १ ते ३ यांना मिळावी म्हणून विनंती केली असता संबंधित पोस्ट अधिकारी यांनी वारसाच्या दाखल्याची मागणी केली. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात केलेला आहे.

त्याअर्थी वर नमूद अर्जदार नं. १ ते ३ यांचेशिवाय मयत सोनाबाई गुलाब गोफणे यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २४/०२/२०२५ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना मयत सोनाबाई गुलाब गोफणे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. दिनांक : २०/०१/२०२५

सही/- **वरिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का) सही/- **सहाय्यक अधीक्षक** दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## क्राईम वृत्त




### दोन सराईत गुन्हेगार दोन वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर, शहरातील दोन सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिले. इरफान अल्लाबक्ष शेख (वय ४०) व इम्रान अल्लाबक्ष शेख (वय ३७, दोघे रा. काडादी चाळ, सिध्देश्वर पेठ) अशी त्यांची नावे आहेत. या दोघांविरुध्द २००६, २०१३, २०१४, २०१९ व २०२४ या कालावधीमध्ये, आपखुशीने दुखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून दंगा करणे, नागरीकांच्या घरामध्ये बेकायदेशीररित्या घुसून मारहाण करणे, महिलेचा विनयभंग करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्यांच्याविरुध्द जेलरोड पोलीस ठाण्याकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वये तडीपारचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त कबाडे यांना सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने कबाडे यांनी कारवाई करुन दोघांना सोलापूर व धाराशिव जिल्हयातून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे. त्यांना तडीपार केल्यानंतर लातूर येथे सोडण्यात आले आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एकजण जखमी

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

एम्प्लॉयमेंट चौक जवळील केटर्स समोर थांबले असता, मोटारसायकलने दिलेल्या धडकेत प्रविण संजय दिन्नी (वय २१ रा. इरण्णा वस्ती) हा तरूण जखमी झाला. हा अपघात सोमवारी सायंकाळी ७ वाजता घडला. त्याला शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले असून, सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे.

### अडीच वर्षाच्या मुलीने केले औषध प्राशन

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

जय मल्हार चौकातील राहत्या घरात खेळत असताना, नजर चुकीने अनाबिया शाहबाज शेख या अडीच वर्षाच्या बालकाने घरात ठेवलेले औषध प्राशन केले. हा प्रकार सोमवारी सायंकाळी ६.१५ वाजता घडला. तिला त्रास होऊ लागल्याने वडील शाहबाज यांनी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### पैशाच्या कारणावरून एकास मारहाण

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

विजापूरा नाका येथील चैतल नगर पारधी वस्ती येथे पैशाच्या कारणावरून तिघांनी केलेल्या मारहाणीत माधव रंगप्पा पवार (वय ४०) हा व्यक्ती जखमी झाला. ही मारहाण सोमवारी रात्री ११ वाजता झाली. त्यांना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरून अपघात; एकजण जखमी

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

रेल्वे स्टेशनकडून भैय्या चौकाच्या दिशेने जात असताना शनी मंदिर जवळ दुचाकी घसरून झालेल्या अपघातात अर्जून मोहन टिके (वय ४० रा. अनिता नगर, सोलापूर) हा इसम जखमी झाला. त्यांना उपचारासाठी मित्र अनिल गायकवाड यांनी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### दुकानाची सापसफाई करताना सर्पदंश

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

एमआयडीसी रोडवरील चेतन हॉटेल जवळ दुकानाची साफसफाई करताना दिलीप दशरथ बिकुले (वय ३५ रा. देसाई नगर, एमआयडीसी) यांना सापाने दंश केला. हा प्रकार मंगळवारी सकाळी ९.३० वाजता घडला. त्यांना उपचारासाठी मित्र कृष्णा म्हेत्रे यांनी उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.

### महिलेने सेवन केल्या २० गोळ्या

सोलापूर : संतोष नगर बाळे येथील राहत्या घरी अज्ञात कारणावरून संगीता दीपक चव्हाण (वय ३०) या महिलेने बी.पी. च्या २० गोळ्या सेवन केल्या. हा प्रकार मंगळवारी सकाळी ९ वाजता घडला. तिला त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी भाऊ अमोल शिंदे यांनी शासकीय रूग्णालायत दाखल केले आहे. याची नोंद सिव्हील पोलिस चौकीत झाली आहे.




### रिक्षा उलटून एकजण जखमी

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

विजय लक्ष्मी नगरच्या दिशेने रिक्षातून जात असताना लक्ष्मीनारायण टॉकीज जवळ डुक्कर आडवा आल्याने उलटून झालेल्या अपघातात रमेश राम चुडामनी (वय २८ रा. विजय नगर लक्ष्मी नगर, सोलापूर) हा तरूण प्रवासी जखमी झाला. हा अपघात सोमवारी रात्री ११.३० वाजता घडला. त्याला उपचारासाठी वडील राम चुडामनी यांनी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

### चौघांच्या मारहाणीत तरूण जखमी

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

नडगीरी पेट्रोल पंम्पाजवळ थांबले असता, पूर्वी भांडण झाले होते. तु का मिटवलास असे म्हणत चौघांनी चाकून व लाथाबुक्यांनी केलेल्या मारहाणीत तुषार शिलू रणखांबे (वय २१ रा. विजापूर नाका झोपडपट्टी नं.१) हा तरूण जखमी झाला. ही मारहाण मंगळवारी दुपाी १२.१५ वाजता झाली. त्याला उपचारासाठी नातेवाईक सुरज वाघमारे याने रूग्णालयात दाखल केले आहे.

# माता रमाई पुतळा उभारणीला मंजुरी; भीमसैनिकांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरामध्ये त्यागमूर्ती माता रमाई यांचा पुतळा उभारण्यासाठी अंतिम मंजुरी मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली भीमसैनिकांनी मिठाई वाटप करत जल्लोष केला.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरामध्ये मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पुतळा समितीच्या बैठकीमध्ये अंतिम मंजुरी देण्यात आली. याबद्दल शहरामध्ये विविध ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली भीमसैनिकांनी मिठाई वाटप करत जल्लोष केला.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माता रमाई यांच्या प्रतिमेस भीमसैनिकांच्यावतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला यानंतर भीमसैनिकांमध्ये मिठाई वाटप करत जल्लोष करण्यात आला.



यावेळी आनंद चंदनशिवे म्हणाले की, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान मध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्याची सर्व राजकीय पक्ष, सर्व सामाजिक संघटना आणि भीमसैनिकांची इच्छा होती. हा विषय महापालिका सभेत मंजुरीसाठी आला असता त्यावेळेस २८ नगरसेवकांनी माता रमाई यांचा पुतळा व्हावा म्हणून स्वतःच्या मानधनामधून ३ लाखांपेक्षा जास्त रक्कम जमा केला. निधी कमी पडत असल्याने आम्ही पुढे आलो आणि १० लाखाचा निधी संबंधित मूर्तिकारला दिला. यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या माध्यमातून शासन स्तरावर मान्यता घेतली. त्यांनतर आज जिल्हाधिकारी यांनी माता रमाई यांचा पुतळा उभारण्यासाठी अंतिम मंजुरी दिली. माता रमाई पुतळा उभारणीसाठी मंजुरी दिल्याबद्दल जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पुतळा उभारण्यासाठी ज्या नगरसेवकांनी स्वतःचे मानधन दिले त्यांचे तसेच विविध पक्षातील नेत्यांनी व विविध सामाजिक संघटनेच्या नेत्यांचे देखील अभिनंदन केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शांतीकुमार नागटिळक, प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख गौतमचंदनशिवे, चंद्रकांत सोनवणे, पँथर गौतम नागटिळक, अविनाश भडकुंबे, सर्पमित्र दीपक इंगळे, भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य आणासाहेब वाघमारे, बौद्धाचार्य राजेंद्र माने, सामाजिक कार्यकर्ते विनोद इंगळे, देविदास लंकेश्वर, पी.बी.ग्रुपअध्यक्ष आदित्य चंदनशिवे, उमेश रणदिवे सिद्धांत सुर्वे, रल्हाद रोकडे, धम्मप्रकाश दुडे, कमलाकर बनसोडे, अजित अंकुश, आशिष पात्रे, विनायक क्षीरसागर, दीपक वाघमारे, बाळू डोळसे, नागनाथ आखाडे, अजित वाघमोडे, राजाराम लोखंडे, मुन्ना आखाडे, अमर सोनकांबळे, नितीन शिरसाट, सिद्धार्थ दुपारगुडे, सचिन आवारे, लखन चंदनशिवे, प्रशांत गवळी, धना कापुरे, संतोष गायकवाड, अजय इंगळे, श्रीपती गायकवाड आदी उपस्थित होते.

## जामगावमध्ये वन्य प्राण्याने बैलाचे शेपूट खाल्ले

**● बार्शी तालुक्यात वाघ, बिबट्याची दहशत कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २१ जानेवारी-**

वैराग भागात आठवडाभरापासून बिबट्याची दहशत आहे. शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वैराग, जवळगावनंतर जामगाव पा. येथ मंगळवारी पहाटे शेतकऱ्याच्या बैलाची शेपटी खाल्ल्याचे शेतकऱ्याकडून सांगण्यात येत आहे तर दुसरीकडे वनविभागाच्या टिमने घटनास्थळी भेट दिली व तो बिबट्या नसल्याचे सांगितले.

सारोळे येथे सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास शेतात पाणी देण्यासाठी गेले असता ५० फूट अंतरावर मोटरसायकलच्या उजेडात उभा राहिलेला बिबट्या दिसला. त्यानंतर शेजारील शेतकऱ्याला बोलावले असता तो अंधारात पुढे कासारी गावच्या दिशेने निघून गेल्याचे पाहिले. आमच्या गावातील अशोक गाटे यांना सोमवारी रात्री शेतात पाणी द्यायला गेल्यावर त्यांना बिबट्या आढळून आला. त्यामुळे आमच्या गावातील शेतकरी नागरिक भयभीत झालेले आहेत. तरी वीज वितरण कंपनीने शेतकऱ्यांना दिवसा शेतीसाठी लाईट द्यावी, अशी माजी सरपंच बाळराजे घाटे यांनी केली आहे. जामगाव पा (ता. बार्शी) येथील शेतकरी आनंद खंदारे यांच्या गोठ्यात बांधलेल्या बैलावर मध्यरात्री बिबट्याने हल्ला करून शेपटी खाल्लयाची घटना घडली आहे. जामगाव येथील घटनास्थळी मंगळवारी सकाळी भेट दिली असता बिबट्याने हल्ला केल्याबाबत बैलावर नख्याचे ओरबडलेले चिन्ह, अथवा त्याच्या पायाचे ठसे कुठेही आढळून आले नाहीत. त्यामुळे बिबट्याने हल्ला केला नसावा, असे वनपाल सचिन पुरी यांनी सांगितले.



> **वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून**
>
> ताडोबाची टीम परतल्यानंतर सर्व जबाबदारी आलेल्या पुण्याच्या रेस्क्यू टीमने धाराशिव जिल्ह्यातील वडजी येथे आपली यंत्रणा सतर्क ठेवली आहे. बिबट्या पकडण्याचा मोठा अनुभव पाठीशी असलेल्या या टीमकडून वाघाला देखील कोणत्याही क्षणी जेरबंद केले जाऊ शकते. विशेष म्हणजे या मोहिमेसाठी राज्याचे अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि पुणे वन्यजीव विभागाचे मुख्य वनसंरक्षक दोघेही वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी स्वतः हजर राहून लक्ष ठेवून आहेत.
>
> **- कुशाग्र पाठक, उपवनसंरक्षक, सोलापूर**

## महाराष्ट्र बँकेचे एटीएम सील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सुमारे ८८ लाखांचे मिळकतकर थकीत ठेवल्याबद्दल महापालिका प्रशासनाने मंगळवारी पार्क चौकातील महाराष्ट्र बँकेचे एटीएमचे सेंटर सील केले आहे.मिळकत कर थकबाकी वसुलीसाठी ही कारवाई करण्यात आली. आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.

थकबाकी वसुलीसाठी ही कारवाईची मोहीम महापालिकेच्या विविध पथकांकडून सुरूच राहणार आहे. महापालिका मिळकतकर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विविध पथकांद्वारे ही कारवाई करण्यात येत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील हुतात्मा स्मृती मंदिर परिसरात महाराष्ट्र बँकेचे एटीएम सेंटर आहे. त्यांनी महापालिकेचा ८८ लाख ६० हजार २९६ इतका मिळकत कर थकविला आहे. महापालिकेच्यावतीने थकीत मिळकतकर वसूल करण्याची धडक मोहीम सुरू आहे. या अंतर्गत नळ कनेक्शन तोडणे, गाळे सील करण्याची कारवाई सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत मंगळवारी महाराष्ट्र बँकेचे एटीएम सेंटर सील करण्याची कारवाई करण्यात आली. दरम्यान, मोठ्या प्रमाणात मिळकतकर थकीत ठेवणाऱ्यांची नावे होम मैदानात लावण्यात आली आहेत. याशिवाय शहरातील विविध ठिकाणी असे डिजिटल बोर्ड लावण्याची मोहीम देखील सुरू आहे.



## पंढरपुरात वाल्मीक कराडच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फाशी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ जानेवारी-**

येथील मराठा समाजाचे नेते बापु शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी पंढरीतील आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे व्यायाम शाळेसमोर बीड जिल्ह्यातील खंडणीच्या गुन्ह्यातील अटक केलेला आरोपी वाल्मिक कराड याच्या प्रतिकात्मक पुतळ्याला फाशी देण्यात आली.

बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्येप्रकरणी वाल्मिक कराड वर ३०२ चा गुन्हा दाखल करावा, त्याचे पंढरपुरात दोन वाडे आहेत तसेच राज्यातील इतर भागातही कोट्यावधींची माया त्याने जमा केली आहे. या त्याच्या सर्व बेहिशेबी संपत्तीची शासनाने जप्त करुन ती शासनजमा करून घ्यावी.ज्या पध्दतीने सरपंच संतोष देशमुख यांची क्रुरपणे हत्या केली ती पाहता बीड जिल्ह्यातील वाल्मीक कराड व त्याने पोसलेले कुख्यात गुंड हे माणसाच्या नावाला कलंक ठरत आहेत.

या सर्वांना तातडीने फाशी देण्यात यावी अशी देखील मागणी यावेळी बापु शिंदे यांनी केली आहे. यावेळी शेगावदुमालाचे सरपंच किरण आटकळे, पिंटू मोरे, माऊली आबा काळे, धनंजय लकडे, नागेश जाधव, बंटी परचंडे, पवन खंडागळे, माऊली नायको यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

## सांगोला तालुक्यात शुध्द पाणीपुरवठा, स्वच्छतेसाठी सतर्क रहा

**● गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२१ जानेवारी-**

पाण्याच्या शुद्धीकरण प्रक्रिया व पाण्याच्या विविध तपासण्या बाबत पुरेसे ज्ञान सर्वांना होणेसाठी पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षण माहिती पुस्तिका तयार करणेत आली आहे. माहिती पुस्तिका कर्मचारी यांना मार्गदर्शक ठरणार आहे. तालुक्यातील शुध्द पाणी व स्वच्छ अंगणवाडी, शाळासाठी सतर्क रहा असे आवाहन सांगोला पंचायत समिती गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी केले.

ते पंचायत समिती,सांगोला येथील बचतभवन मध्ये पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय पाणी गुणवत्ता कार्यशाळेत बोलत होते. याप्रसंगी जलजीवन मिशनचे उपअभियंता सेनापती केदार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश खांडेकर, सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, पंचायत विस्तार अधिकारी देवराव पुकळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.ज्योती साळे, डॉ. कल्याणी सरवदे, डॉ. संदीप देवकते, डॉ. कल्याण ढाळे उपस्थित होते.



प्रारंभी कार्यशाळेचे उद्‌घाटन व पाणी गुणवत्ता विषयक प्रशिक्षण माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. पाणी गुणवत्तामध्ये तालुक्यातील प्रा. आ. केंद्र महुदने उत्कृष्ठ काम केल्याबद्दल डॉ.कल्याण ढाळे, राहुल देवडकर, प्रकाश ऐवळे, विजय दंदाडे, मनोज जाधव व पंचायत अधिकारी बाळू शिंदे यांचा गौरव करण्यात आला.

प्रास्ताविकात आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत यांनी पाणी शुद्धीकरण करण्याच्या पवित्र कामाचा वसा घ्यावा. पाण्याचे शुध्दीकरण व निर्जंतुकीकरण करणे साठी टीसीएल वापरणे बाबत तसेच स्त्रोतांची माहिती व नोंदी ठेवणे, योजनांची देखभाल दुरुस्ती करणेसाठी नियोजन करणेची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी पाणी गुणवत्ता सल्लागार सागर कोळेकर, डॉ.अविनाश खांडेकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कनिष्ठ प्रशासन अधिकारी बंडु नागणे, महेश जाधव, बीआरसी अनिकेत जगताप, सीआरसी सावित्री गायकवाड उपस्थित होते.

## भाजपा सक्रिय सदस्यता अभियान महाराष्ट्र प्रदेश प्रमुख राजेश पांडे यांच्या उपस्थितीत बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

भारतीय जनता पार्टी ची प्राथमिक सदस्य नोंदणीसाठी भाजपच्या वतीने महाराष्ट्रात सर्वत्र सदस्यता नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. त्या निमित्ताने आज सोलापूर शहरात सोलापूर जिल्हा आणि शहरातील भाजपा पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

सदर बैठक भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आणि भाजपा सक्रिय सदस्यता अभियान महाराष्ट्र प्रदेश प्रमुख राजेशजी पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनात संपन्न झाली. यावेळी शहर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. यावेळी सोलापूर शहरातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सदस्यता नोंदणी मोहिमेला अधिक गती देण्याचे आवाहन केले. जनतेशी थेट संवाद साधणे आणि नागरिकांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करून अभियान यशस्वी करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे अधोरेखित करण्यात आले. यावेळी माझ्यासह भाजपा सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्हाध्यक्ष श्री. चेतनसिंह केदार सावंत, सोलापूर जिल्हा सरचिटणीस श्री शशिकांत चव्हाण, सोलापूर जिल्हा सरचिटणीस श्री मनीष देशमुख, सोलापूर जिल्हा सरचिटणीस विकासजी वाघमारे, श्री सचिन शिंदे, भाजपा सोलापूर शहर उपाध्यक्ष श्री जय साळुंखे, भाजपा सोलापूर शहर सरचिटणीस आणि सदस्यता नोंदणी अभियान सोलापूर शहर संयोजक प्रा.डॉ नारायण बनसोडे सर, भाजपा सोलापूर शहर सरचिटणीस श्री विशाल गायकवाड, भाजपा सोलापूर शहर सरचिटणीस सौ. रोहिणी तडवळकर जी आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




### एसव्हीसीएस प्रशालेतील १५ विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षेत उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

शासकीय रेखाकला परीक्षेत होटगी प्रशालेचे यश (ता. दक्षिण सोलापूर) येथील एस व्ही सी एस होटगी प्रशालेतील एलिमेंट्री परीक्षेत १५ विद्यार्थी तर इंटरमीडिएट परीक्षेत ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला आहे या विद्यार्थ्यांना कलाशिक्षिका सीमा देगावकर, गुणके अमसिध्द यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी, मुख्याध्यापक नंदकुमार धाये,पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे यांनी अभिनंदन केले.

बैद्यनाथ
नागपूर
असली आयुर्वेद
पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?
सिड्पाईल्स टॅबलेट
मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.




अभयामृत
बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.




स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन
वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**राष्ट्रीय सणाची लगबग...**
सोलापूर : सोलापूर शहरात राष्ट्रीय सण २६ जानेवारीची लगबग सुरू झाली. विविध शाळांमध्ये बॅन्ड पथक वाजंत्री दुरुस्ती आणि खरेदीची लगबग दिसून येत आहे.
(छायाचित्र केवल तिवारी)



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### घरावर कब्जा करणाऱ्या तीन महिलांवर गुन्हा

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
घराचे कुलूप तोडून बेकायदेशीर कब्जा करून पती-पत्नीस मारहाण करून घरातील संसारोपयोगी साहित्य बाहेर फेकून दिल्याप्रकरणी याप्रकरणी तिन महिलांवर एमआयडीसी पोलिसांत सोमवारी गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत प्रकाश लक्ष्मण कमलापुरे (वय ६२, रा. कुचन नगर,सोलापूर) यांनी फिर्यादी दिल्याने भंगरव्वा माळेकर, लक्ष्मी जाधव (दोघी रा.मंगळवेढा),अबोली मंजी(रा.सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना २८ जून २०२३ ते आज अखेर न्यु सुनिल नगर एमआयडीसी रोड, सोलापूर याठिकाणी घडली आहे. फिर्यादीच्या मालकीचा न्यू सुनिल नगर,एमआयडीसी रोड




येथे १२०० स्केअर फुट कच्चा बांधकाम असलेले घर आहे. या जागेतील घरामध्ये ललिता सुरेश विटकर यांचे नातेवाईक भंगरव्वा मळेकर, लक्ष्मी जाधव व अबोली मंजी यांनी प्रकाश कमलापुरे यांच्या संमतीशिवाय घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. व घरावर बेकायदेशीर कब्जा केला आहे. तसेच त्यानंतर २५ ऑगस्ट २०२३ रोजी साडे सहा वाजण्याच्या सुमारास प्रकाश व त्यांची पत्नी सुनिल नगर येथील घरात किंवा गाळ्यात राहत होते. त्यावेळी वरील आरोपींनी बेकायदेशीर अतिक्रमण करूनफिर्यादीच्या पत्नीस मारहाण केली. रुममधील भांडी व सर्व सामान बाहेर फेकून दिले. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी व त्याच्या पत्नीस शिवीगाळ,दमदाटी करीत मारहाण करून घरातून बाहेर काढले. कमलापुरे यांच्या जागेतील स्टील पत्रे व वासे भंगारवाल्याला विकल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक बनसुडे करीत आहेत.

### वन अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार करणाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
वन विभागातील उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या विरोधामध्ये मंत्रालयामध्ये तक्रार करणाऱ्या अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १२ नोव्हेंबर रोजी दुपारी २.४२ वा.सुमारास मुख्य पोस्ट ऑफिस सोलापूर याठिकाणी घडली आहे. याबाबत डॉ. संभाजी सिद्राम मस्के (रा. क्रांती नगर घरनं ३७,रा राजीव गांधी नगर,भवानी पेठ सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलिसांत सोमवारी दि २० जानेवारी रोजी गुन्हा नोंद झाला आहे. अज्ञात आरोपीने फिर्यादी डॉ. संभाजी मस्के यांच्या परिवर्तन समता पार्टी व त्याची खोटी सही करून सोलापूर वन विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याविरुद्ध मंत्रालयामध्ये तक्रार केली आहे. मात्र प्रत्यक्षात फिर्यादीने अशी कोणतेही तक्रार केलेली नाही. हे ज्यावेळेस तक्रारीचे पत्र फिर्यादीचा नावाने घराच्या पत्त्यावर परत आल्यानंतर लक्षात आले. त्यावरून फिर्यादीने तात्काळ सदर बझार पोलिसांत आपल्या नावाने कोणीतरी खोटी सही खरी भासवून तक्रार केली आहे. यावरून अज्ञाताविरुध्द सदर बझार पोलिसांत सोमवारी गुन्हा नोंद झाला आहे. या घटनेचा पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.



### दुचाकी धडकून झालेल्या अपघाताप्रकरणी मयतावर गुन्हा

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
भरधाव वेगाने दुचाकी चालवून दुभाजकास धडकून स्वत:च्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या दुचाकीस्वारांवर गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना ७ जानेवारी रोजी दुपारी सव्वा तीन च्या सुमारास हत्तुरे वस्ती ते आसरा रोड,सोलापूर या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी पोलिस अंमलदार बहिर्जे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मयत श्रीकांत सायबण्णा न्हावी (वय ३२ रा. टिक्केकरवाडी सोलापूर) यांच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. बळीराम चौगुले (वय ५०) यांच्याकडे झालेल्या एकंदर तपासावरून आरोपी श्रीकांत हा सात जानेवारी रोजी दुपारी सव्वा तीनच्या सुमारास हत्तुरे वस्ती ते आसरा सोलापूर दरम्यान स्वत:च्या दुचाकीवरून जात होता. जात असताना होटगी रोडवरील उदय इंटरप्रायजेस समोर असलेल्या डिव्हायडरच्या मधोमध दुचाकी वेगाने चालवून धडकली. या झालेल्या अपघातात श्रीकांत यांच्या डोक्यास गंभीर दुखापत करून मयत झाला आहे. याप्रकरणाचा तपास पोलिस हवालदार गायकवाड करीत आहे.

# शहरातल्या सिग्नलचे ‘टाईमर’ खराब

**-स्मार्ट सिटीत वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा**
**-दुरूस्तीसाठी पोलिसांकडून पालिकेला वारंवार पत्रे**

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
दिवसेंदिवस शहरातील वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी महत्वाची यंत्रणा असणाऱ्या ट्रॅफिक सिग्नलची अवस्था मात्र ‘असून अडचण, नसून खोळंबा’ अशी झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील सोलापूर स्मार्ट सिटीमध्ये मात्र वाहतूक व्यवस्थेचा मात्र पूर्णतः बोजवारा उडाला आहे. चौका-चौकात असलेल्या सिग्नपैकी अनेक सिग्नलचे टाईमर खराब झाल्याने वाहनचालकांना मनस्तापासह इंधन वाया घालवावे लागत आहे. त्यामुळे शहरातील चौकांमधून असलेली सिग्नल व्यवस्था ही दुरूस्त करून पूर्णपणे अद्ययावत करून द्यावी, याबाबत पोलिस प्रशासनाकडून महापालिका प्रशासनास वारंवार पत्रव्यवहार केला जात आहे. परंतु पालिका प्रशासनाकडून पोलिसांच्या पत्राला केराची टोपली दाखविली जात असल्याचे दिसून येते.




शहर व जिल्ह्यात लाखोंच्या संख्येने वाहने आहेत. सोलापूर प्रादेशिक परिवहन विभागाकडे असलेल्या नोंदीनुसार जवळपास ११ लाख चार हजार ७०० वाहनांची नोंद आहे.

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी बसविण्यात येणारी सिग्नल यंत्रणा उभी करणे व त्याची देखभाल, दुरूस्ती करण्याची जबाबदारी ही पूर्णपणे महापालिकेची असून वाहतुकीचे नियमन करण्याची जबाबदारी ही वाहतूक पोलिसांवर अवलंबून आहे.

चौकाचौकांमध्ये वाहतूक नियमनासाठी वाहतूक शाखेचे कर्मचारी देखील ठिकठिकाणी उभे असतात.

शहरात जवळपास १९ चौकांमध्ये महापालिकेकडून सिग्नल बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये शहरातील भैय्या चौक, आम्रपाली चौक, नाना-नानी पार्क, जुना बोरामणी नाका, जुना अक्कलकोट नाका, अशोक चौक, महिला हॉस्पिटल, महावीर चौक, पत्रकार भवन, गांधीनगर चौक, रंगभवन चौक, गुरुनानक चौक, डफरीन चौक, संत तुकाराम चौक, आसरा चौक, सरस्वती चौक, सिव्हिल चौक आदी चौकांमध्ये सिग्नल आहेत. परंतु केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या चौकातीलच सिग्नल यंत्रणा सुरु आहे. सुरू असलेली सिग्नल यंत्रणादेखील पूर्णपणे कोलमडली असल्याचे दिसून येत आहे. सिग्नलला असलेल्या टाईमरमुळे नेमका आपल्या बाजूचा सिग्नल सुरू होण्यासाठी किती वेळ आहे ते वाहनचालकांना कळते. परिणामी वाहनचालक तेवढा वेळ आपले वाहने बंद करून पेट्रोल, डिझेलची बचत करू शकतात. परंतु अनेक म्हणण्यापेक्षा सर्वच चौकांतील सिग्नल्सचे टाईमर बिघडल्याने व काही बंद पडल्याने याचा वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. चालकांना आपल्या बाजूचा सिग्नल ग्रीन होण्यासाठी किती वेळ आहे, हे कळत नाही. वाहनचालक तेवढा वेळ आपली वाहने सुरूच ठेवतात. परिणामी पेट्रोल, डिझेल वाया जाते व प्रदुषणातही वाढ होत आहे. यापेक्षा अनेक वाहनचालक घाईगडबडीत सिग्नल तोडून निघून जातात. प्रत्येक ट्रॅफिक सिग्नलचे टाईमर व्यवस्थित असणे आवश्यक आहे. सिग्नल व्यवस्थित असेल तर वाहनचालक आपली वाहने विशिष्ट वेळेसाठी बंद ठेवतील. त्यामुळे रोज लाखो रुपयांचे पेट्रोल, डिझेल वाचेल तसेच वाढणारे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. वाहनचालक सिग्नल ग्रीन होईपर्यंत थांबतील व होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसेल.



**महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष : उपायुक्त अजित बोऱ्हाडे**
शहरातील चौकांमध्ये असलेली सिग्नल व्यवस्था ही फार जुनी असून ती अद्ययावत नाही. इतर शहरांमध्ये सध्या सर्वत्र अद्ययावत सिग्नल यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील यंत्रणा दुरूस्त करून अद्ययावत करावी म्हणून पोलिस आयुक्तालयाकडून महापालिका प्रशासनाला वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. पोलिस यंत्रणेला सिग्नल बसविणे किंवा दुरुस्ती किंवा देखभालीसाठी कोणताही निधी येत नाही तो महापालिकेकडे येत असल्याने सिग्नल यंत्रणा उभारणे त्याची दुरुस्ती व देखभालीची पूर्णपणे जबाबदारी ही महापालिकेची असल्याचे पोलिस उपायुक्त अजित बोऱ्हाडे यांनी सांगितले.

## रिक्षा परवाना असणाऱ्यांना नोकरी करण्यास मनाई

**नोकरीत असणाऱ्या व्यक्तींनी ऑटोरिक्षा परवाने जमा करावेत; १५ फेब्रुवारीनंतर होणार कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
सरकारी, निमसरकारी, खाजगी कंपनी अथवा संघटीत क्षेत्रातील इतर कोणत्याही संस्थेत उद्योगात नोकरीमध्ये असणाऱ्या व्यक्तींनी ऑटोरिक्षा परवाना प्राप्त केला असल्यास अथवा परवाना प्राप्त केल्यानंतर ते नोकरीत रूजू झाले असल्यास अशा व्यक्तींनी दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ पुर्वी त्यांचे ऑटोरिक्षा परवाने सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे स्वेच्छेने जमा करावेत असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी केले आहे.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये ऑटोरिक्षा परवाना संख्या मर्यादित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय शासन अधिसुचना दि. १७ जून २०१७ अन्वये विखंडीत केल्याने, सध्या खुले ऑटोरिक्षा परवाना धोरण राबविण्यात येत आहे. ऑटोरिक्षा परवाना धारण करताना अथवा परवाना धारण केल्यावर परवानाधारक सरकारी, निम सरकारी, खासगी कंपनीत अथवा संघटीत क्षेत्रातील इतर कोणत्याही संस्थेत, अद्योगात नोकरी नसावेत अशी प्राधिकरणाची अट आहे. या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १७ जुलै २०१७ मधील अनुक्रमांक ३ नुसार अर्जदारास तो सरकारी, निमसरकारी, खाजगी कंपनी अथवा संघटीत क्षेत्रातील इतर कोणत्याही संस्थते, उद्योगात नोकरी करीत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. असे विहित करण्यात आलेले आहे.

अशा पध्दतीने धारण केलेले ऑटोरिक्षा परवाने निदर्शनास आल्यास त्यांचेवर मोटार वाहन कायदा व प्राधिकरणाने विहित केलेल्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार यांनी कळविले आहे.

## सुशिल कराडविरूद्ध केलेली फिर्याद न्यायालयाने फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**
वाल्मिक कराड यांचा मुलगा सुशिल कराड यांचे नावे असलेली फर्म सान्वी ट्रेडर्स व त्यांचे पत्नीचे नावे असलेली फर्म अन्वी इंटरप्राइझेस या फर्ममध्ये फिर्यादी महिलेचा पती मॅनेजर पदावर कामास होता. त्याने सन २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३ या आर्थीक वर्षामध्ये व्यापा-याकडील होणारी वसुली स्वतः च्या व यातील फिर्यादी पत्नीचे नावे वळती करून घेवून रक्कम रु. १ कोटी ८ लाखांचा अपहार केल्याचा सुशिल कराड यांनी दि.१९ जुलै २०२४ रोजी परळी शहर पोलिस स्टेशन येथे दाखल केली आहे.



तेव्हापासून आजतागायत फिर्यादी व तिचा पती फरार आहेत. त्यांनी न्यायालयातून जामिन ही घेतलेला नाही अथवा पोलिसांना सहकार्य करण्यासाठी हजर ही झालेले नाहीत असे असताना प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी महिलेने जबरदस्तीने गाडया, सोने व प्लॉट जागा खरेदीखतान्वे लिहून घेतल्याचा तक्रारी अर्ज एमआयडीसी पोलिस स्टेशन सोलापूर येथे दाखल केलेला होता. परंतु घडलेल्या घटना या परळी शहरातील असल्याने पोलिसांनी तिकडे तक्रार दाखल करण्याचे समजपत्र फिर्यादीस दिले होते. त्यानंतर फिर्यादी महिलेने पोलिस महासंचालकाकडे तक्रार दाखल केली त्याचा तपास परळी, बीड पोलिसांनी केला. त्यामध्ये साक्षीदारांचे जबाब नोंदवून व पुरावा गोळा केल्यानंतर फिर्यादी महिलेचे तक्रारीत तथ्य नसल्याचे व तिने अपहाराच्या गुन्ह्यास शह देण्यासाठी तक्रार केल्याचे निरीक्षण नोंदवून पोलिसांनी गुन्हा घडला नसल्याचा अहवाल दिला. त्यामुळे फिर्यादी महिलेने सोलापूर न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केलेली होती. न्यायालच्या आदेशाप्रमाणे पोलिसांनी तपास करुन कथित घटना परळी, बीड येथे घडल्याने एमआयडीसी पोलिसांना या घटनेचा तपास करण्याचा अधिकार नसल्याने फिर्यादीचा तक्रारी अर्ज निकाली काढल्याचा अहवाल कोर्टात दाखल केला होता. यात सुशील कराडतर्फे ॲड. संतोष न्हावकर यांनी लेखी म्हणणे दाखल केले होते व त्यासोबत बीड पोलिसांनी केलेल्या तपासाची कागदपत्रे दाखल केली होती. फिर्यादीच्या जबाबामध्ये फिर्यादीने पोक्सोच्या घटनेबाबत सोलापूरमध्ये घडलेल्या कथीत घटनेचा उल्लेख केला नसल्याचे कोर्टाच्या निर्दशनास आणून दिले होते. यामुळे अतिरिक्त सत्र न्या. जे.जे. मोहिते यांनी फिर्यादीची खासगी फिर्याद फेटाळून लावली व तिने योग्य अधिकारक्षेत्रात दाद मागावी असे आदेश दिले. यात आरोपीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड. राहुल रुपनर, ॲड. शैलेश पोटफोडे यांनी तर फिर्यादीतर्फे ॲड. विनोद सूर्यवंशी यांनी काम पाहिले.

# शहरात विनापरवाना डिजिटल होर्डिंग लावण्यास मनाई

**● अन्यथा ते फलक निष्कासन करुन गुन्हे दाखल होणार**
**● महापालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
सोलापूर शहरात कोणत्या स्थितीत विनापरवाना डिजिटल फलक, होर्डिंग लावण्यास सक्त मनाई आहे. तसे आढळून आल्यास ते फलक निष्कासन करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येतील असा निर्णय महापालिका आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आला आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाचे अनधिकृत होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स किंवा पोस्टर्स लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे व लावल्यास त्यांचे तात्काळ निष्कासन करुन गुन्हे दाखल करण्यासंदर्भात पोलीस आयुक्त कार्यालयात बैठक झाली. यावेळी पोलीस उपायुक्त विजय कबाडे, महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, पोलीस निरीक्षक आणि महापालिका झोन अधिकारी आदींची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये सोलापूर शहरात परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचे डिजिटल फलक होर्डिंग लावण्यात येणार नाहीत. प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. सोलापूर शहरात अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, होर्डीग्स लावल्यास महानगरपालिका व पोलिस प्रशासन यांच्या वतीने ते डिजिटल फलक निष्कासन कारवाई व गुन्हे दाखल करण्याचे सुचित करण्यात आले आहे.

**सर्व विभागीय अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे दिले आदेश : उपायुक्त लोकरे**
सर्व अनधिकृत बॅनर्स, फ्लेक्स, कमानी, कटआऊटस निष्कासनाची कार्यवाही संबंधित महापालिकेच्या विभागीय कार्यालयामार्फत पोलिस विभागाच्या सहकार्याने करण्यात येणार आहे. सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात कोणत्याही स्वरुपाचे अनधिकृत होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स किंवा पोस्टर्स लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे व लावल्यास त्यांचे तात्काळ निष्कासन करुन गुन्हे दाखल करण्याचे आदेश सर्व विभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

**परवानगी घेऊनच बॅनर्स लावण्याचे आवाहन**
सर्व राजकिय पक्ष, कार्यकर्ते व सोलापूर शहर वासियांना सोलापूर महानगरपालिकेच्या ़ीश्ररिींलेींरिंळेप.सीं.ळप या संकेत स्थळावर `पश्रळपश परवानगीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून महापालिकेच्या संकेतस्थळावरुन परवानगी प्राप्त करुनच फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर्स लावण्यात यावे, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

**राजकीय नेते, कार्यकर्ते नियम पाळतील अशी अपेक्षा**
सोलापूर शहरात विविध कार्यक्रमासाठी नेते गण आणि मंत्री येत असतात. या निमित्ताने विविध राजकीय पक्ष आणि कार्यकर्त्यांकडून नेत्यांच्या स्वागताचे फलक लावण्यात येतात. हे फलक लावत असताना महापालिका प्रशासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. लवकरच नूतन पालकमंत्र्यांचे शहरात आगमन होणार आहे. या निमित्ताने राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते नियमानुसार परवानगी घेऊन शहरात डिजिटल फलक लावतील, अशी अपेक्षा सुजाण नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# ३० नवीन आरोग्य उपकेंद्राची निर्मिती

**१३ कोटी निधीची तरतूद**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**
जिल्ह्यातील अकरा तालुक्यात नव्या आरोग्य उपकेंद्रांची निर्मिती करण्यात येत आहे. राष्ट्रीय आरोग्य मिशन योजनेअंतर्गत पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून सुमारे १३ कोटी २५ लाख २१ हजार ५६५ निधीची तरतूद यासाठी करण्यात आली आहे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सदरच्या कामांना निविदा प्रक्रियेच्या माध्यमातून मंजुरी देण्यात आली होती. त्यासाठी १५ व्या आयोगाने या निधीची तरतूद केली आहे. अक्कलकोट, बार्शी, करमाळा, माढा, माळशिरस, सांगोला, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मंगळवेढा आणि मोहोळ या तालुक्यात नवीन आरोग्य उपकेंद्र निर्माण होत आहेत. उर्वरित दोन उपकेंद्रांची फेर निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. ११ तालुक्यात नवीन आरोग्य उपकेंद्रांची निर्मिती ही प्राथमिक टप्प्यात आहे. काही उपकेंद्रांची निर्मिती ही अंतिम टप्प्यात आलेली आहे. तर उर्वरित दोन आरोग्य उपकेंद्रांची फेरनिविदा काढण्यात येणार आहे. त्यानंतर त्याचे कामकाज सुरू होणार आहे. त्या दोन उपकेंद्राच्या पूर्णत्वास सहा महिन्यांनाहून अधिकचा कालावधी लागणार आहे. मात्र जी उपकेंद्रे प्राथमिक टप्प्यात आहेत. त्यांना सहा महिन्यांचा कालावधी लागेल. तर जी उपकेंद्र ही द्वितीय व तृतीय टप्प्यात आहेत.

**ग्रामस्थांना तात्काळ मिळणार प्रथमोपचार**
जिल्ह्यात नवीन निर्माण करण्यात येणाऱ्या आरोग्य उपकेंद्रांच्या ओपीडीतून तात्काळ प्रथमोपचार उपलब्ध होणार आहे. सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये ११ तालुक्यात उपकेंद्रे तयार होतील. उपकेंद्रांची पाहणी होत आहे.
**- डॉ. संतोष नवले,**
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद सोलापूर

**जिल्ह्यातील तालुका निहाय उपकेंद्रांची गावे आणि तरतूद निधी**

| तालुका | उपकेंद्र गाव | निधी (लाखात) |
|---|---|---|
| अक्कलकोट | नाविदगी | ४४,९४,२२८ |
| अक्कलकोट | दर्शनाळ | ४४,८०,१६१ |
| बार्शी | बोरगांव | ४४,४५,५९१ |
| बार्शी | पिंपळगाव | ४४,७०,८३६ |
| बार्शी | सारोळे | ४४,८६,९७६ |
| बार्शी | राऊळगाव | ४४,८७,२२२ |
| बार्शी | सौंदणे | ४४,४७,३०४ |
| करमाळा | शेळगाव | ४४,४७,९१६ |
| माढा | जामगाव | ४४,०६५९१ |
| माढा | शिराळा मा. | ४४,४५,८५७ |
| माढा | बादालेवाडी | ४४,७१,८६५ |
| माढा | चिंचगाव | ४४,८३,२८१ |
| माढा | शिराळा टें. | ४४,२६,०७९ |
| माढा | उपळाई खे। | ४४,३३,०१८ |
| माढा | सापटणे टें. | ४४,५५,८७९ |
| माढा | अंजनगाव | ४४,५५,५९५ |
| माळशिरस | चंदनपुरी | ४४,१४,०१७ |
| मंगळवेढा | मंगळवेढा | ३९,७१,५४० |
| मंगळवेढा | ढवळस | ४४,८५,२०३ |
| मंगळवेढा | कात्राळ | ४४,१७,१०३ |
| मंगळवेढा | अकोला | ४३,९६९०५ |
| मंगळवेढा | खोमनळ | ४४,१२,०३४ |
| मोहोळ | खावणी | ४४,७२,०१३ |
| मोहोळ | भोपळे | ४४,८६,७३७ |
| पंढरपूर | पंढरपूर | ३९,६७,२८७ |
| सांगोला | लोणविरे | ४४,२८,९०८ |
| सांगोला | सोनलवाडी | ४४,२८,९०८ |
| उ.सोलापूर | हगलूर | ४४,०६,५५९ |
| द. सोलापूर | कर्देहळळी | ४३,९५,८०२ |
| द. सोलापूर | सिंदखेड | ४५,००३५० |
| | एकूण | १३,२५,२१,५६५ |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१०

**नाना गाय चरे डोंगरी । परि चित्त बांधिले वत्सेंघरी ।**
**तैसें प्रेम एथिंचे करीं । स्थानपती ॥**

आपले खरे स्वरुप काय आहे? आपण मुळात कोण आहोत? या प्रश्नांची उकल भगवंतांनी विश्वरुपातून अर्जुनाला करुन दिली आहे. विशेष म्हणजे विश्वरुप दाखविल्यानंतरही अर्जुन म्हणेल तसे वागण्याची आपली मानसिक तयारी भगवंतानी ठेवली आहे. अर्जुन म्हणतो आहे, हे भगवंता तुझे विश्वरुप पाहून आता पुरे झाले असल्याने हे विश्वरुप तू आता गुंडाळून घे. तुझ्या विश्वरुपात सर्व जीवमात्र पाहून मला कळून चुकले आहे की तू म्हणजे सर्व जीव व सर्व जीव म्हणजे तू. प्राणीमात्रापासून तू वेगळा नाहीस. प्राणीमात्रांशी चांगले वागणे म्हणजे तुझ्याशी चांगले वागणे होय. प्राणीमात्रातच तू असल्याने त्यांची सेवा केलेली तुला आवडते. हे जरी सर्व सत्य असले तरी मला आता तुला अलिंगन द्यावयाचे असल्याने तू मूळस्वरुपात आला पाहिजेस. तुझ्या मूळ स्वरुपालाच मी अलिंगन देऊ शकेन, या विश्वरुपाला शारिरीकदृष्टया मी अलिंगन देऊच शकत नाही. अर्जुनाचे हे वाक्य ऐकून भगवंत त्याला म्हणाले,नाना गाय चरे डोंगरी । परि चित्त बांधिले वत्सेंघरी । तैसें प्रेम एथिंचे करीं । स्थानपती ॥. अर्थात, अर्जुना माझे विश्वरुप हेच खरे स्वरुप आहे. श्रीकृष्णाचे व्यक्तिगत रुप म्हणजे पूर्णत: मी नव्हे. या विश्वरुपातच सर्व काही सामावले असल्याने तू विश्वरुपापासून दूर जाण्याचा प्रयत्न करु नकोस. गाय डोंगरात चरत असते पण तिचे सर्व चित्त घरी बांधलेल्या तिच्या वासराजवळ असते. त्याप्रमाणे तू तुझे चित्त या विश्वरुपाजवळ ठेव.



श्रीकृष्णाचे जे रुप आहे ते नाशिवंत आहे. तो एक देह आहे, जो आज ना उद्या संपणार आहे. या नाशिवंत देहाची आसक्ती न बाळगता, जे कधीही नाश पावणार नाही अशा विश्वरुपाजवळ तु तुझे मन ठेव. पंख न फुटलेल्या पिलाजवळ आपले मन ठेवून जसे पक्षिण अंतराळात जाते, तसे तू तूझे मन या विश्वरुपाच्या ठिकाणी ठेव. धनाचा लोभी माणुस आपली चित्तवृत्ती जसे धनाजवळ ठेवून चित्तवृत्तीरहित देहाने तो स्वत: राहतो, तसे तू विश्वरुपालाच खरे धन समजून चित्तवृत्ती या विश्वरुपाच्या ठिकाणी ठेवायला हवी असे भगवंत म्हणत आहेत, असे माऊली सांगतात. या ओव्यातून माऊली केवळ श्रीकृष्ण, अर्जुनाचा संवाद सांगत नाहीत तर तुम्हा-आम्हाला दृष्टांतही देत आहेत. मुक्या प्राण्यांचे म्हणजे गायीचे आपल्या वासरावर, पक्षिणीचे आपल्या पिलावर प्रेम कसे असते हे दाखवितांना आईवडिलांच्या प्रेमाचीही आठवण ते देत आहेत. आईवडिलांच्या प्रेमाची परतफेड आपल्याकडून होणे शक्य नसते, हे सुध्दा माऊलींना येथे सांगायचे असेल. धनाचा लोभी होऊन मनविरहित देहाने वागण्यात अर्थ नसतो. मनच नसेल तर त्या देहाला घेऊन काय करायचे? मानवाने आपले मन धनात न गुंतविता चांगल्या गोष्टीत, सत्कार्यात गुंतवावे असेही माऊलींना दुस-याबाजूने येथे सांगायचे आहे. माऊलींच्या उपदेशाप्रमाणे आपले मन धनात गुंतणार नाही, तसेच आई-वडिलांच्या प्रेमाचा विसर आपणाला पडणार नाही याची आपण दक्षता बाळगू या.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - जडबसवलिंगेश्वर महास्वामी पुण्यतिथी |
| दि. २२ जानेवारी २०२५ | चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - पौष | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. अष्ठमी - (१५.१७) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - शिशिर | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - स्वाती (२३.३३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - शूल (२८.३६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - तैतिल (२८.३०) | |

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# ‘शिवस्मारक’तर्फे सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा

### अधिकाधिक शाळा आणि खुल्या गटांनी सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

श्री छत्रपति शिवाजी महाराज स्मारक मंडळ शिवस्मारकतर्फे रथसप्तमीनिमत्त मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता शिंदे चौक येथील शिवस्मारक पटांगणात सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

ही सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा शालेय व खुल्या अशा दोन गटांमध्ये होणार आहे. एका संघात किमान २० व अधिकाधिक ५० स्पर्धकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. सूर्यनमस्कार घालण्याच्या सरावाकरिता ध्वनिफीत देण्यात येणार असून संगीताच्या तालावर १३ सूर्यनमस्कार घालायचे आहेत.


या स्पर्धेत शाळा, क्रीडा मंडळे, संस्था यासारखे कोणतेही गट सहभागी होऊ शकतात. स्पर्धकांची नाव नोंदणी शाळेच्या अधिकृत पत्रावर संबंधित शिक्षकांच्या सहीने असणे आवश्यक आहे. एका शाळेतून तीनच संघ सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास पाच हजार रुपये, द्वितीय विजेत्या संघास तीन हजार रुपये तर तृतीय विजेत्या संघास दोन हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच विजेत्या संघांना रोख रकमेसह स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धेनंतर लगेच स्पर्धेच्या ठिकाणी होणार आहे. या स्पर्धेची नोंदणी १ फेब्रुवारीपर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत शिवस्मारक कार्यालयात करता येईल. अधिक माहितीसाठी शिवस्मारकचे व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. यावेळी सचिव गंगाधर गवसने, धनंजय कुलकर्णी, मल्लिनाथ होटकर उपस्थित होते.

**स्पर्धेचे यंदाचे ४२ वे वर्ष**

१९८३ पासून शिवस्मारकतर्फे ही सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा घेण्यात येत आहे. स्पर्धेचे यंदाचे तब्बल ४२ वे वर्ष असून आजवर हजारो विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे, असे सचिव गवसने यांनी सांगितले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

**अलक:- (२८) संकल्प**

डॉक्टर हेडगेवार जन्मजात देशभक्त होते. आणि श्री गोळवलकर गुरुजींचा दृष्टिकोन व्यापक, उदार व राष्ट्रीय होता. त्यांच्या दृष्टीने स्वयंसेवक चा अर्थ आहे स्व चे समर्पण, स्व ची आहुती. आपले संपूर्ण जीवन एका आदर्शासाठी या दोघांनीही समर्पित केले होते. त्यांनी आपल्या जीवनात विश्राम आणि विराम ला तिलांजली दिली होती.डॉक्टर हेडगेवार म्हणायचे सर्व लोक आपले खाणे-पिणे- भोजन- निवास- संतती या सर्वांच्या निर्मितीत व्यस्त आहेत. मग या देशाची निर्मिती कोण करणार? भारत मातेचे रक्षण कोण करणार? ‘क्रियां सत्वसिद्धी नोपकारणे’ म्हणजे क्रियेची सिद्धी एखाद्या उपकरणाद्वारे नाही तर महान विचार व विश्वासाद्वारे केलेल्या संकल्पामुळे होते. याच संकल्पानी डॉक्टरजींनी संघ स्थापना करून वटवृक्षाचे बीज पेरले. आणि मग डॉक्टरजी, गुरुजी व स्वयंसेवकांच्या निरंतर प्रयत्नातून वटवृक्ष साकारला. त्या बीजातून कार्याची गुरुता, कार्याची क्षमता, कार्याची पुण्यशीलता व त्यांच्या कार्यापासून लोकांना मिळणारा संतोष निरंतर वाढू लागला. आणि मग स्वयंसेवकांची या राष्ट्र कार्यासाठी श्रृंखला तयार झाली. ज्यामुळे 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हे सिद्ध झाले आणि संघ यशस्वी वाटचाल करू लागला.

**- क्रमशः**

## शुक्रवारपासून तीन दिवसीय अभिनव कला महोत्सव

### २७ स्टॉल स्वर पाहायला मिळणार सुमारे ३०० चित्र अन् शिल्पे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा आर्टिस्ट अभिनव सहकारी संस्थेच्यावतीने शुक्रवार दि. २४ ते २६ जानेवारी या कालावधीत अभिनव कला महोत्सवाअंतर्गत सोलापुरातील कलावंतांचे चित्र व शिल्प प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर पार्किंग येथे हे प्रदर्शन दररोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत भरविण्यात आले आहे. शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबई येथील सर जेजे स्कूल ऑफ आर्ट शिल्पकला विभागाचे प्रा. मधुकर वंजारी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार या राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव धर्मराज काडादी, चेन्नई येथील प्रसिद्ध चित्रकार भगवान चव्हाण, उद्योगपती दत्ता सुरवसे, स्कूलऑफ डिझाईन एमआयटीचे डीन अतुल केडिया, एमआयटी ॲडमिशन विभाग प्रमुख वैष्णवी डिवरे उपस्थित राहणार आहेत.

या प्रदर्शनात विविध २७ स्टॉल राहणार आहेत. यामध्ये २५० चित्रे आणि ५० शिल्प पाहायला मिळणार आहेत. सुमारे ४० चित्रकारांचा सहभाग यामध्ये राहणार आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे. शुक्रवारी सायंकाळी ६.३० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा सोलापूरच्या वतीने याच ठिकाणी कवी संमेलन होणार आहे.

## केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे शुक्रवारी रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने शुक्रवार दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सोलापुरातील सेवासदन प्रशालेजवळील पोलीस कल्याण केंद्रात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड रजिस्टर असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त देशपातळीवरील रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. त्या अंतर्गतच हे शिबिर घेण्यात येणार आहे. सोलापूर जिल्ह्यात विविध ३५ ठिकाणी रक्तदान शिबिर होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व केमिस्ट बांधव आणि त्यांच्या मित्र परिवाराकडून ७५ हजार बॉटल रक्त संकलन करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सर्वांनी या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष व्यंकटेश पुजारी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत जिल्हा सचिव राजेश विरपे, मनीष बलदवा, सिद्धेश्वर घाले आदी उपस्थित होते.



## गोविंदराज मंडळाच्यावतीने महेश कोठेंना पुष्पांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

माजी महापौर तथा पद्मशाली पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष व विडी घरकुलचे भाग्यविधाते महेश कोठे यांच्या अकाली निधनामुळे विडी घरकुलसह शहरातील सर्वसामान्याचे अपरिमित असं नुकसान झाले आहे, अशी भावना व्यक्त करत विडी घरकुल येथील गोविंदराज नगर रहिवाशांनी श्रध्दांजली शोकसभेत वाहिली.

सोमवारी रात्री विडी घरकुल प्रगती चौकजवळील गोविंदराज नगर मधील रहिवाशांनी माजी महापौर तथा विडी घरकुलचे भाग्यविधाते महेश कोठे यांच्या प्रयागराज येथील महाकुंभ मेळाव्यात गंगास्नान करताना हृदयविकाराचा तीव्र झटक्याने निधन झाले होते.

यावेळी स्व. महेश कोठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सर्वांनी गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण अवधूत, सचिव व्यंकटेश दोंता यांच्यासह मंडळाचे उमेश गायकवाड, गोविंद गाजूल, अनिल गोसकी, हिरालाल माकम, प्रमोद मार्गम, शंकर श्रीकोंडा, चक्रधर अन्नलदास, सुशांत शेंडगे, विनायक ताला,बालकिसन गुंडला, श्रीनिवास अरकाल आदींनी गुलाबपुष्प अर्पण करून कोठे यांना अभिवादन केले.

## ऑर्किड महाविद्यालयाचा एचसीएल लिमिटेडबरोबर सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

तळे हिप्परगा येथील ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय आणि एच.सी.एल. सॉफ्टवेअर लिमिटेड यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. या सामंजस्य करारांतर्गत एच.सी.एल. सॉफ्टवेअर, ऑर्किडच्या विद्यार्थ्यांना डीएफएम प्रो (डिझाईन फॉर मॅन्युफॅक्चरिंग प्रोफेशनल), लोवियस आणि कॅमवर्कस या सॉफ्टवेअरचे मोफत प्रशिक्षण व उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

डीएफएम प्रो. ग्लोवियस आणि कॅमवर्कस हे एच सी एल सॉफ्टवेअरने विकसित केलेले सॉफ्टवेअर आहे. डीएफएम प्रो प्रोडक्शन डिझाइन प्रोसेस सुधारण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे सॉफ्टवेअर उत्पादन क्षमतेसाठी आवश्यक असलेल्या डिझाइन त्रुटी ओळखून त्यावर उपाय सुचवते, ज्यामुळे उत्पादनाचा खर्च, वेळ आणि त्रुटी कमी करता येतात. ग्लोवियस हे एक प्रगत थ्री डी कॅड फाइल व्ह्युअर सॉफ्टवेअर आहे. हे सॉफ्टवेअर विविध प्रकारच्या थ्री डी कॅड फाईल्स पाहण्यासाठी, विश्लेषणासाठी आणि त्यावर काम करण्यासाठी वापरले जाते. कॅमवर्कस हे एक अत्याधुनिक कंप्युटर-एडेड मॅन्युफॅक्चरिंग सॉफ्टवेअर आहे, जे सीएनसी मशीनिंग प्रक्रियेस जलद, अचूक आणि कार्यक्षम बनवते. ऑटोमोबाईल, एरोस्पेस, वैद्यकीय उपकरणे आणि औद्योगिक उत्पादन यांसारख्या क्षेत्रांत डिझाइन आणि उत्पादन प्रक्रियेतील तांत्रिक कौशल्ये असणाऱ्या अभियंत्यांची प्रचंड प्रमाणात मागणी आहे. तसेच या सॉफ्टवेअरचे प्रमाणपत्र मिळवल्याने विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर नोकरीच्या संधी मिळू शकतील.



या सामंजस्य करारावर महाविद्यालयाच्यावतीने प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे आणि एचसीएल सॉफ्टवेअरच्यावतीने कंपनीचे असोसिएट व्हॉइस प्रेसिडेंट बाबुराज अय्यर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. त्यासोबतच साक्षीदार म्हणून उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन आणि एचसीएल सॉफ्टवेअरचे ग्रुप मॅनेजर योगीराज दामा यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या सामंजस्य करारासाठी प्रमुख संपर्क अधिकारी म्हणून प्रा.ए.एच. कांबळे यांनी काम पाहिले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही. के. पत्की, यान्त्रिकी विभाग प्रमुख प्रा. एस. एस. काळे उपस्थित होते.

## दाजी पेठ येथे मोटारसायकल जळून खाक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

दाजी पेठ येथील राममंदिरासमोर मंगळवारी पहाटेच्या सुमारास दुचाकी वाहन जाळल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. दाजी पेठ येथील राममंदिरासमोर असलेल्या भास्कर अंजय्या रापर्ती या रहिवाशांच्या घरासमोर रस्त्यावर रात्रीच्या सुमारास नियमितपणे MH १३ Y ०१८७ मोटारसायकल पार्किंग करून रात्री झोपी गेले. सकाळी उठल्यानंतर आजूबाजूच्या राहणाऱ्या रहिवाशांनी घरासमोर ठेवलेली मोटारसायकल जळून खाक झाल्याची माहिती दिल्यानंतर भास्कर रापर्ती यांनी घराच्या खाली येऊन पाहिले असता गाडी पूर्णपणे जळून खाक झाल्याचे दिसले. या घटनेनंतर रापर्ती यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिस घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आहे. याठिकाणी असलेल्या सीसीटीव्हीत या घटनेची दृश्य कैद झाले आहेत का ? याची चाचपणी पोलिसांकडून करण्यात येत आहे.



# जिल्ह्यात २२ जानेवारी ते ८ मार्चपर्यंत जनजागृती कार्यक्रम

### ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ योजनेला १० वर्षे पूर्ण; जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मुलींच्या जीवनाची हमी देण्यासाठी, बेटी बचाओं बेटी, पढ़ाओ ही योजना राबविण्यात येते. या योजनेला दि. २२ जानेवारी २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. यामुळे महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यात दि. २२ जानेवारी ते ०८ मार्च २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्या सर्व कार्यक्रमांची संबंधित विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.




बेटी बचाओ बेटी पढाओ अंतर्गत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, बाल विकास प्रकल्प अधिकारी विजय खोमणे, उपस्थित होते.

**प्रभात फेरी**

स्थानिक प्रशासनाच्या सहकायनि आयोजित करणे. प्रभात ३ फेरीची तारीख, वेळ आणि मार्ग ठरवून सहभागींना माहिती द्यावी. स्थानिक शाळा आणि समुदायांना सहभाग करण्यासाठी आमंत्रित करावे. सांस्कृतिक कार्यक्रम: सांस्कृतिक विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित करणे. विविध शाळा आणि कला संस्थांमध्ये स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे. महिलांच्या सशक्तीकरणाचे संदेश देणारे नाट्य, नृत्य आणि गायन सादर करावे.

शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग. आरोग्य विभाग, वन विभाग, शिक्षण कार्यक्रम, दौरे आणि जागरूकता मोहीम राबवावी. शिक्षण विभागाने शाळांमध्ये शैक्षणिक कार्यक्रम आणि जागरूकता मोहीम आयोजित करावी. हेल्पलाइन क्रमांकांचा प्रचार करण्यासाठी विशेष सत्रे आयोजित करावी. मैदानातील भेटी/जनतेशी संवाद/जागरूकता सत्रे/कॅम्प/प्रशिक्षण सत्रे :- महिला आणि बालविकास विभागाने विविध क्षेत्रांमध्ये सत्रे आयोजित करावी. प्रशिक्षण देण्यासाठी व्याख्याते आणि तज्ज्ञांची निवड करावी.

**शाळांमध्ये मुलींच्या नावनोंदणीसाठी मोहीम**

शिक्षण विभागाने शाळांमध्ये मुलींच्या नावनोंदणीसाठी जनजागृती मोहीम आणि नावनोंदणी कार्यक्रम आयोजित करावे. सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी योजना: महिला आणि बालविकास विभागाने किशोरवयीन मुलींसाठी विविध योजनांवर जनजागृती मोहीम आणि नावनोंदणी कार्यक्रम आयोजित करावे.

**सॅनिटरी पॅड मशीनची स्थापना**

शिक्षण विभागाने सरकारी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सॅनिटरी पॅड मशीनची स्थापना करण्यासाठी सहकार्य करावे, खासगी शाळांमध्येही हे मशीन स्थापित करण्यासाठी प्रयत्न करावे. मुलांचे आणि पुरुषांचे लैंगिक संवेदनशीलतेचे प्रशिक्षण: सामाजिक न्याय विभागाने शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी लैंगिक संवेदनशीलतेचे प्रशिक्षण सत्रे आयोजित करावी.

**आयसीडीएस, शिक्षण विभाग, पोलीस विभाग**

बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ शपथ आणि स्वाक्षरी मोहीम महिला आणि बालविकास विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित करणे, शपथ आणि स्वाक्षरी मोहीम संयोजकाने आयोजनाची तारीख, वेळ आणि ठिकाण ठरवावे. शाळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी सत्र आयोजित करावे. बाईक/सायकल रॅली: पोलीस विभागाच्या सहकायनि आयोजित करणे. रॅलीची तारीख, वेळ आणि मार्ग ठरवून सहभागींना माहिती द्यावी.महिलांच्या सक्षमीकरणाचे बॅनर आणि फलक तयार करावे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### ॲड. विद्या मैंदर्गी-काडादी यांचा पुणे बार कौन्सिलतर्फे सत्कार

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

भारत सरकारच्या विधी व न्याय विभागाकडून नोटरीपदी नियुक्ती झाल्याबद्दल पुणे येथील बार कौन्सिल तर्फे ॲड. विद्या मैंदर्गी-काडादी यांचा सत्कार करण्यात आला. आळंदी येथील संत ज्ञानेश्वर मंदिर समितीचे प्रमुख विश्वस्त तथा महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप यांनी बालगंधर्व सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ॲड. काडादी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल ॲड. काडादी यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. सोमशेखर मैंदर्गी यांच्या ॲड. काडादी या कन्या आहेत.




### मोडनिंब येथे भाजपा सदस्य नोंदणी शिबिराला चांगला प्रतिसाद

**मोडनिंब, दि. २१ जानेवारी-**

भाजपच्या वतीने देशभर १ ते १५ जानेवारी दरम्यान सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानास मोडनिंब (ता. माढा) येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मोडनिंव येथील आठवडी बाजारामध्ये राबविण्यात आलेल्या अभियानामध्ये सुमारे पाचशे नागरिकांनी भारतीय जनता पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले.यावेळी भाजप माढा तालुका (पूर्व)चे अध्यक्ष योगेश पाटील म्हणाले, युवक, शेतकरी व महिलांमधून सदस्य नोंदणीसाठी प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. यावेळी जिल्हा कार्यकारिणी सदस्य धनाजी लादे, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश सुर्वे, रविकांत जाधव, नंदकिशोर लोकरे, हनुमंत सुर्वे, राहुल केदार, नंदकुमार मोरे, नवनाथ मोहिते, अमोल काटकर उपस्थित होते.




### पुढील युद्ध पाण्यासाठी : डॉ. दीपक देडे

**अणदूर, दि. २१ जानेवारी-**

जवाहर महाविद्यालय अणदूरचे, राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर आलियाबाद येथे सुरु असून राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये 'जलसंधारणाचे महत्त्व' या विषयावर डॉ. दीपक देडे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. देडे यांनी यांनी पाण्याचे महत्व, पाणी म्हणजे जीवन आहे. जगामध्ये एकूण पाण्यापैकी पिण्याला लायक पाणी हे २७ टक्के आहे आणि भारतामध्ये तेच प्रमाण २३ टक्के आहे. त्यासाठी आपण पाण्याचे महत्व ओळखले पाहिजे. आवश्यक तेवढाच पाण्याचा वापर केला पाहिजे. जगामध्ये पुढील युद्ध हे इतर गोष्टीसाठी न होता पाण्यासाठीच युद्ध होईल असे ते म्हणाले. डॉ. देडे यांनी अनेक प्रसंग, घटनांमधून त्यांनी पाण्याचे, जलसंधारणाचे महत्त्व विशद केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. सूर्यकांत आगलावे, शिबिरार्थी विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि गावातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. दयानंद कांबळे यांनी केले तर आभार डॉ. सुधाकर सांगळे यांनी केले.



### गणेशगाव येथे रेशन दुकान सुरु

**माळीनगर, दि. २१ जानेवारी-**

गणेशगाव (ता. माळशिरस) येथील जिजामाता स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अध्यक्षा सुरेखा नलवडे, उपाध्यक्षा स्वाती मोरे यांच्या बचत गटाने स्वस्त धान्य दुकान सुरू केले. नवीन स्वस्त धान्य दुकान चालू केल्यामुळे महिला वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. दुकानाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी महिलांना मार्गदर्शन करताना बचत गटाच्या अध्यक्षा सुरेखा नलवडे म्हणाल्या की, जिजामाता स्वयंसहाय्यता महिला बचत गटाने आज सरकार मान्य स्वस्त धान्य दुकान सुरू केल्यामुळे आता महिलांना रेशनकार्डवरील मिळणारे धान्य सर्वांना वेळच्या वेळी मिळणार आहे. आज गणेशगांव येथील महिलांनी अजून एका क्षेत्रात प्रगतीचे पाऊल टाकले आहे. यावेळी सरपंच सदाशिव शेंडगे, उपसरपंच बाळू ठोकळे, माजी सरपंच शोभा विठ्ठल नलवडे, उषा रामचंद्र ठोंबरे, ग्रामसेविका लता घुले, पोलीस पाटील भाईसाब शेख, दादासाहेब नलवडे, रामचंद्र ठोंबरे, नजीर शेख, विशाल नलवडे, दत्तात्रय मोरे, बालम शेख, कुंडलिक शेंडगे, पत्रकार नूरजहाँ शेख, कामिनी ताटे, संयोगिनी मनीषा जाधव, वर्षा ठोकळे, रेश्मा शेख, गजानन लिगाडे, जावेद शेख, संतोष नलवडे, लाला पानसरे, लाला शेंडगे, उद्धव शेंडगे, गावातील सर्व बचत गटातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाळीस वर्षापूर्वी जागेसाठी... आता बांधकामासाठी धडपड

## मदतीसाठी ३५ वर्षांपूर्वीचे माजी विद्यार्थी सरसावले; निमगाव टें. येथील विठ्ठलराव शिंदे प्रशालेचे भोग संपेनात

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २१ जानेवारी-**

निमगाव टे. येथील विठ्ठलराव शिंदे प्रशालेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सत्तेचाळीस वर्षापूर्वी आर्थिक नियोजन बेताचे असल्याने तत्कालीन शिक्षक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून दगड-मातीमध्ये शाळेची इमारत बांधण्यात आली. सध्या पत्र्यांच्या इमारतीची धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्याने शाळा प्रशासनाने १९६९ ते १९९९ सालच्या दहावीमध्ये प्रथम आलेल्या गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा शाळा बांधकामास आर्थिक मदत मिळावी या हेतूने सत्कारसमारंभ घेतला. चाळीस वर्षापूर्वी शाळेला जागेसाठी तर चाळीशीनंतर बांधकामासाठी वणवण करावे लागत आहे. याची जाणीव झाल्याने पस्तीस वर्षानंतरही आपल्या मातृभूमीत शैक्षणिक विकासच दिसून न आल्याने आश्चर्य वाटल्याने सर्व सत्कारमूर्तींनी मदत करण्याचे आश्वासन दिले.

१९६० साली निमगांव टें. येथे विठ्ठल मंदिरामध्ये सुरू झालेल्या विद्यालयास तत्कालीन ग्रामस्थ, शिक्षक, शिपाई व विद्यार्थी यांच्या श्रमदानातून माजी मुख्याध्यापक औदुंबर शिंदे यांच्या अथक प्रयत्नातून श्रमदानातून १९८७ ला नवीन दगडमातीची इमारत मिळाली. या इमारतीस दानशूर शेतकरी दादा चटे यांनी दोन एकर जागा दान केली होती. आज या इमारतीस ४७ वर्ष पूर्ण होत आहेत. अतिशय जीर्ण, भिंतीला भेगा पडलेल्या, विंचू, काट्यांची सतत भीती, खराब झालेले पत्रे, पावसाळ्यात वर्गात बसणेदेखील धोकादायक परिस्थिती तर पत्र्यावर सतत प्लास्टिक कागद दर पावसाळ्यातच टाकावा लागतो. काही वर्ग तर पत्र्याच्या सेडमध्ये भरतात. हे २१ शतकातील वास्तव आहे. यासाठी प्रशालेतील सर्वच शिक्षकांनी एकत्रित येऊन वर्गणी करून पदरमोड करीत कित्येकवेळा शाळेची तात्पुरती दुरुस्ती केली. तरीही संभाव्य धोका कायम असल्याने शाळा प्रशासनाने सन १९६९ ते १९९९ सालातील दहावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा ज्ञानशिदोरी दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी माजी आ. बबनराव शिंदे होते. यावेळी माजी मुख्याध्यापक औदुंबर शिंदे उपस्थित होते.

माजी आ. बबनराव शिंदे यांनी यापुढील काळात फक्त प्रथम क्रमांकच आलेले नव्हे तर मोठ्या पदावर असणाऱ्या सर्वच माजी विद्यार्थ्यांना बोलावून सन्मान करुन मदतीचे आवाहन करण्याच्या सूचना दिल्या. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याकडून पाच लाख रूपयांची मदत जाहीर केली. एप्रिलमध्ये प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यास सांगितले. विठ्ठलराव शिंदे प्रशालेच्या शिक्षण कमिटीच्या माध्यमातून सरपंच यशवंत शिंदे यांनी गुणवत्ता वाढवण्यासाठी आजपर्यंत जोरदार प्रयत्न केले आहेत. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची विठ्ठलराव शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक शाखा आहे. प्रास्ताविक व्ही. डी. मल्हाव यांनी केले. ज्ञानेश्वर शिंदे, नवनाथ शिंदे, संतोष वाघमोडे, महादेव वाघमोडे, अभिजित पुजारी यांनी मनोगत व्यक्त केले.



> पस्तीस वर्षानंतर ज्या मातीत जन्मलो. ज्या शाळेत घडलो. त्या शाळेशी व मातीशी पुन्हा एकदा नाळ जोडण्याची संधी शाळा प्रशासनाने आम्हाला सन्मानपूर्वक दिली आहे. त्याबद्दल मी शाळेचा कायम ऋणी आहे. गरीब विद्यार्थ्यासाठी आपण फी, गणवेश, दप्तर या स्वरूपात मदत करणार आहोत.
> **- नवनाथ शिंदे, सीईओ, प्रॉपर्टीज अँड रिॲलिटीज पी. व्ही. टी. लि., पुणे**

### यांचा झाला सन्मान

बाबू गुरव, रघुनाथ शेंडे, मधुकर घाडगे, विकास शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, शोभा शिंदे, नवनाथ भोळे, शिवाजी येळे, औदुंबर शिंदे, बाबासाहेब ढवळे, नवनाथ शिंदे, महादेव वाघमोडे, विठ्ठल क्षीरसागर, संतोष वीर, रुक्मिणी वाघमोडे, संतोष वाघमोडे, सुहास पाटील, अभिजीत पुजारी यांचा माजी आ. बबनराव शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यापैकी बाबू गुरव यांनी पाच संगणक, ज्ञानेश्वर शिंदे यांनी २५ हजार रूपयांची मदत केली.

# राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाची कामगिरी सरस

### राज्य सरचिटणीस सचिन सरवदे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २१ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर, वैद्यकीय मदत कक्षाचे प्रदेशाध्यक्ष जितेंद्र सातव यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्यात ग्रामस्तरापर्यंत अत्यंत प्रभावीपणे पोहचून कार्यरत असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्षाची स्थापना एक वर्षापूर्वी करण्यात आली.

या एका वर्षाच्या कालखंडामध्ये महाराष्ट्र राज्यातील सबंध जिल्ह्यातील गोर, गरीब रुग्णांना मदत मिळवून देण्यास कक्ष यशस्वी ठरला. नुकत्याच शिर्डी येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेकडून या कक्षाची प्रशंसा करण्यात आली. रुग्णांना मदतीव्यतिरिक्त कक्षाच्या माध्यमातून विविधस्तरावर आरोग्य, रक्तदान, अवयवदान शिबिरे राबवण्यात आल्याने याचा फायदा अनेक गरजू रुग्णांना झाला हे अत्यंत आनंदाने नमूद करावेसे वाटते.



> महात्मा फुले जन आरोग्य योजना, धर्मादाय, मुख्यमंत्री सहायता निधी, पंतप्रधान सहायता निधी, सिद्धिविनायक ट्रस्ट यांसारख्या विविध ट्रस्टच्या माध्यमातून दाखल रुग्णांचे बिल कमी करणे,अल्पदरात रुग्ण सेवा,महाग औषधे कमी दरात मिळून देणे, रुग्णवहीका, मृत्यू दाखला मिळन्यासाठी सहकार्य करणे, विविध योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविणे यासारखे असंख्य उपक्रम राष्ट्रवादी वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून राबवण्यात येत आहेत. जिल्ह्यातील नियुक्त पदाधिकाऱ्यांची कामे वाखण्याजोगी सरस ठरत आहेत.
> **-सचिन सरवदे, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष, महाराष्ट्र राज्य**

याबरोबरच महाराष्ट्रातील गरीब रुग्णांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून लाखो रुपयांची मदत मिळवून देण्यास आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख जितेंद्र सातव यांच्या माध्यमातून २०० हून अधिक पदाधिकाऱ्यांच्या तालुका, जिल्हा, राज्यस्तरावर नियुकत्या करण्यात आल्या. १४०० पेक्षा जास्त सदस्य, सहकारी जोडण्यात यश आले.जिल्हास्तरीय वैद्यकीय पदाधिकर्यांकडून मदत करण्यात येते. हजारो रुग्णांपर्यंत कोट्यावधिंचा निधी हा विविध योजनेच्या माध्यमातून पोहचवण्यात यश आले.

# किणी येथे शनिवारपासून वीरभप्रद्रेश्वर यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ जानेवारी-**

तालुक्यातील किणी येथील जागृत श्री वीरभद्रेश्वर देवस्थान अग्निप्रवेश यात्रा महोत्सवानिमित्त २५ व २६ जानेवारी रोजी विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रम होणार असल्याचे माजी विस्तार अधिकारी भीम तुळजापूरे यांनी सांगितले.



शनिवारी २५ जानेवारी रात्री ९ वा. अग्निपूजन, रात्री आठ वाजता भारुडकार दिनकर औताडे, भारुडकार देविदास जगतापूर दिनकर कदम, पांडुरंग पवार यांच्या भारुडाचे कार्यक्रम होणार आहे. याशिवाय नरसिंह भजनी मंडळ कर्देहळ्ळी व किणी येथील भजनी संघ यांचे भजन गायन होणार आहे. श्री. वीरभद्रेश्वर मंदिर येथे शिवानंद बसवराज बिराजदार मणूर यांच्याकडून महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे.

रविवारी २६ जानेवारी रोजी पहाटे पाच वाजता गंगा-गणपती पूजन व श्रीस महारुद्राभिषेक, सकाळी नऊ वाजता पुरवंतासह विविध वाद्यामवेत भव्य पालखी मिरवणूक, सकाळी दहा वाजल्यापासून दिवसभर मयुरी प्रसाद भोसगे मुरुम व अनिल विरपाक्षप्पा तंबाके यांच्याकडून श्री अंबाबाई मंदिर किणी येथे महाप्रसाद वाटप होणार आहे. दुपारी एक वाजता अनिप्रवेश होणार आहे. रात्री ८ वाजता हभप आबा महाराज कुरनूरकर यांचे कीर्तन होणार असून, वागदरी, कुरनूर व किणीयेथील भजन संघांचा कार्यक्रम होणार आहे.

### डिजिटल साक्षरता काळाची गरज : प्रा. डॉ. एस. जी. बिराजदार

**अणदूर, दि. २१ जानेवारी-**

येथील जवाहर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर आलियाबाद जळकोट येथे चालू असून या शिबिरात विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरता विषयी प्रा. डॉ. एस. जी. बिराजदार यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक व्यक्तीने संगणक साक्षरतेप्रमाणे डिजिटल साक्षर होणे ही काळाची गरज आहे. दैनंदिन व्यवहारात विविध शासकीय योजना वित्तीय साक्षरता यासाठी डिजिटल साक्षर होणे अत्यावश्यक आहे. डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, आरटीजीएस, नेफ्ट , नवीन खरेदी ऑनलाईन बँकिंग यांचा उपयोग करण्यासाठी डिजिटल साक्षर होणे गरजेचे आहे, असे सांगितले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. डी. एन. गटलेवार होते. डॉ. एन. एस. सोमगोंडे उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी आगलावे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. दूधभाते यांनी आभार मानले.

# अन्नछत्र मंडळाचे व्यवस्थापन कौतुकास्पद : गोंडगे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्कृष्ट व्यवस्थापन होत असल्याने सुलभ महाप्रसाद मिळत असल्याचे मनोगत वालचंदनगर इंडिस्ट्रिज लि. मधील आय. एम. डी. कामगार समन्व्य संघ वालचंदनगर माजी अध्यक्ष नंदकुमार गोंडगे यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आल्या असता न्यासाचे अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, योगेश कटारे, राहुल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह पदाधिकारी, सेवक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वटवृक्ष मंदिर समितीला सहकार्य करण्यास कटिबद्ध : आ. प्रवीण दरेकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

मुंबई बँकेचे अध्यक्ष आ. प्रवीण दरेकर यांचा वटवृक्ष श्री स्वामी समर्थ देवस्थान यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वटवृक्ष मंदिर समितीला सहकार्य करण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट दिली. मंदिर परिसराची पाहणी करत व मंदिरातील भाविकांसाठी असलेल्या सोयी सुविधांबद्दल समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्याकडून माहिती जाणून घेतली. श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आमदार प्रवीण दरेकर यांचा सन्मान केला.

याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शिवशरण जोजन, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी, महेश हिंडोळे, कापसे, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, अभिजीत लोकापुरे, प्रथमेश इंगळे, अतिश पवार, छोटू पवार, डांगे, राठोड, प्रवीण देशमुख, ननू कोरबू, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, आदींसह भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



# वाशिंबे रेल्वे स्थानक असुरक्षित


### वाढत्या चोऱ्या, दगडफेकीच्या घटनांमध्ये वाढ; जीआरपी पोलीस चौकी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२१ जानेवारी-**

वाढत्या चोऱ्या व दगडफेकीच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी जेऊर ते भिगवणदरम्यान असलेल्या वाशिंबे रेल्वे स्थानकावर जीआरपी पोलीस चौकी करण्याची मागणी प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी एसपी जीआरपी कार्यालय पुणे यांच्याकडे प्रत्यक्ष निवेदनाद्वारे केली आहे. वाशिंबे रेल्वे स्थानक सध्या असुरक्षित बनले आहे.

मध्य रेल्वेच्या कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिस ठाण्यावर कुर्डूवाडी ते वाशिंबे तसेच कुर्डूवाडी ते मोहोळदरम्यानच्या सुरक्षेची जबाबदारी आहे. तसेच वाशिंबेपासून दौंडपर्यंतची सुरक्षा ही दौंड लोहमार्ग पोलीस ठाण्यावर अवलंबून आहे. भौगोलिक परिसर व अंतराचा विचार केला तर रेल्वे स्थानक, लोहमार्ग व प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सद्याची पोलीस ठाणी पुरेशी नाहीत. भाळवणी, पोफळज, वाशिंबे, पारेवाडी, जिंतीदरम्यान मागील अनेक वर्षापासून चोऱ्या, दरोडे, दगडफेक यासारखे प्रकार घडत असतात. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत आहे.

जेऊर ते भिगवणदरम्यान मध्यवर्ती वाशिंबे (ता. करमाळा) या स्थानकावर जीआरपी पोलीस चौकी होणे आवश्यक आहे. यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी पाटील यांनी केली आहे. सदर निवेदनाच्या प्रती विभागीय व्यवस्थापक सोलापूर तसेच महाप्रबंधक कार्यालय मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.



### कायमस्वरुपी उपाययोजना करा

जिंती, पारेवाडी, वाशिंबे, पोफळज, भाळवणी स्थानकांदरम्यानच्या सिंग्नल यंत्रणेशी छेडछाड करणे, रुळावर दगड ठेवणे, चालत्या गाडीवर दगडफेक करणे, क्रॉसिंगसाठी थांबलेल्या गाडीत खिडकीतून हात घालून महिला प्रवाशांचे दागिने हिसकावणे असे प्रकार वारंवार घडत होते आणि आजही घडत आहेत. हा परिसर उजनी लाभक्षेत्रात असल्याने या भागातून रेल्वे ही नदीवरील पूल, अधिक लांबीचे खोल भुयारी मार्ग व उंच भराव यावरुन गेलेली आहे. तसेच लोहमार्गाच्या दोन्ही बाजूंना उसाचे क्षेत्र असल्याने धोका मोठ्या प्रमाणात आहे. भौगोलिक परिस्थितीमुळे चोरट्यांना वाव मिळत आहे. त्यामुळे कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी या परिसरातील वाशिंबे स्थानकावर जीआरपी पोलिस चौकी उभारण्याची आवश्यकता आहे

**-संजय पाटील, अध्यक्ष, प्रवासी सेवा संघ**

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## औषधनिर्माण शास्त्रामध्ये मोठ्या संधी : डॉ. निलेश चौगुले

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २१ जानेवारी-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर, टेंभुर्णी येथे बी. फार्मसी फार्मसी विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्रामध्ये भविष्यातील विविध संधी यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.



डॉ. निलेश चौगुले, प्राचार्य एम आयपी अम्बाप कोल्हापूर यांनी या व्याख्यानात औषधनिर्माणशास्त्राच्या भविष्यातील संधी आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर यावर सखोल विचार मांडला. प्रास्ताविक ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे यांनी केले. याप्रसंगी डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. शिवराज ढगे, प्राचार्य डॉ. रुपाली बेंदगुडे, संस्थापक सचिव प्रा. डॉ. रवींद्र बेंदगुडे, अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### उंदरगाव येथे भूमिपुत्रांचा सन्मान

**करमाळ, दि. २१ जानेवारी-**

उंदरगाव (ता. करमाळा) येथील वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये भरारी घेणाऱ्या व नावलौकिक मिळवणाऱ्या तरुण व नागरिकांचा ग्रामपंचायतीच्या वतीने भूमिपुत्रांचा सन्मान करण्यात आला. गावांमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथील राष्ट्रीय सेवा योजनेचा कॅम्प गावांमध्ये ग्राममस्वच्छतेची कामे करत आहेत. यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमसाठी आयएफएस अधिकारी आप्पासाहेब निकत, सेवानिवृत्त अभियंता चांगदेव पाटील, ग्लोबल सायन्स इंस्टिट्यूटचे महेश निकत, सोमनाथ पाटील, प्रा. राजेंद्र निकत, सोमनाथ कांबळे, मेजर सिताराम खरात, नारायण कांबळे, श्रीधर कांबळे, ग्रामसेवक संतोष कांबळे, ज्योतीराम पाटील, नामदेव पाटील, ॲड. सोमनाथ कोकरे, प्रवीण गरदडे, लक्ष्मण पाटील, गणेश जावळे, सागर कुंभार, सेविका जयश्री ताकमोगे, स्वाती सरडे, मदतनीस भारती जावळे, कोमल कांबळे, वंदना शिंदे यांच्यासह इतर भूमिपुत्रांचा फेटा फळांचे रोपं व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मणराव राख यांनी गावच्या भूमिपुत्रापुढं मदतीसाठी पदर पसरला त्यानुसार अनेकांनी भरघोस मदत यावेळी जाहीर केली. या सन्मानासाठी सरपंच युवराज मगर, उपसरपंच शिवाजी कोकरे, ग्रामसेवक यशवंत कुदळे व ग्रामस्थांनी परिश्रम घेत आहेत.



### मराठा सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**करमाळ, दि. २१ जानेवारी-**

मराठा सेवा संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन तहसीलदार शिल्पाताई ठोकडे, डीवायएसपी अजित पाटील, पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे, संभाजी ब्रिगेडचे नितीन खटके, गणेश कुकडे, प्रा. शिवाजीराव बंडगर, राजाभाऊ कदम, जोतीराम लावंड, ॲड. नवनाथ राखुंडे, ॲड. सविताताई शिंदे, संदीप तळेकर, अंगद देवकते, अण्णा सुपनवरवर, पत्रकार सिद्धार्थ वाघमारे, विशाल घोलप, आलीम शेख, अशोक मुरूमकर, विशाल परदेशी, नासीर कबीर, विजयकुमार निकत, नरसाळे उपस्थित होते. तालुकाध्यक्ष सचिन काळे यांनी आभार मानले.



### न्यू इंग्लिश स्कूल प्रशालेतर्फे अमृता सरगुलेचा सत्कार


**करकंब, दि. २१ जानेवारी-**

कोल्हापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय शालेय योगा स्पर्धेत करकंब येथील अमृता सरगुले या विद्यार्थिनीने महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करताना वैयक्तिक व सांघिक अशा दोन्ही प्रकारात सुवर्णपदक पटकावले. करकंब सारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेत असताना तिने मिळविलेल्या या सुवर्णपदकाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे. त्या अनुषंगानेच न्यू इंग्लिश स्कूल करकंब या प्रशालेतर्फे सुवर्णकन्या अमृता सरगुले, तिचे आई, वडील व योगाशिक्षक राजू अनवते यांचा सत्कार प्रशालेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते यांच्या हस्ते करण्यात आला.

### करकंबमधील आदर्श प्रशालेचे सात विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धेत विजयी

**करकंब, दि. २१ जानेवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण प्रसारक व क्रीडा मंडळ संचलित आदर्श प्रशाला व ज्युनियर कॉलेज करकंबच्या सहा विद्यार्थ्यांनी गदायुद्ध स्पर्धेत तर एका विद्यार्थिनीने योगासन स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर विजय संपादन करून शाळेचे नाव उज्वल केले. शालेय क्रीडा स्पर्धेत आदर्श प्रशाला व ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी तालुका,जिल्हा स्पर्धेत यशस्वी होऊन विभागीय राज्य स्पर्धेसह राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडले गेले.या यशस्वी विद्यार्थ्यांचे मा.जि.प.सदस्य बाळासाहेब देशमुख,संस्थेचे अध्यक्ष रामदास शेटे,सचिव पांडुरंग व्यवहारे,मा.सभापती रजनी देशमुख,मा.सरपंच सुलभा व्यवहारे,प्राचार्या विजया उंडे,प्रशिक्षक राजू अनवते,थोरात सर,शिक्षक व पालकांनी अभिनंदन केले. अमृता सरगुले योगासन, राष्ट्रीय गोल्ड मेडल. लखन मदने गदायुद्ध, राष्ट्रीय गोल्ड मेडल.हर्षद चौधरी गदायुद्ध, राष्ट्रीय गोल्ड मेडल. महेश जाधव गदायुद्ध, राष्ट्रीय गोल्ड मेडल. संकेत पवार गदायुद्ध, राष्ट्रीय सिल्वर मेडल. बालाजी तरंगे गदायुद्ध, राष्ट्रीय सिल्वर मेडल. प्रबुद्ध कडलाक, गदायुद्ध, राष्ट्रीय ब्रॉन्झ मेडल. वैष्णवी जव्हेरी कराटे, राज्य गोल्ड मेडल. आदित्य जगताप योगासन, राज्य गोल्ड मेडल. वैष्णवी व्यवहारे सायकल विभाग गोल्ड मेडल.



## भंगार बसमधून जीवघेणा प्रवास

### अक्कलकोटधील ६० पैकी ३५ गाड्यांची अवस्था बिकट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

राज्य परिवहन महामंडळ अक्कलकोट आगाराकडे ६० लालपऱ्यांपैकी ३५ बस गाड्या या कंडम झाल्या असल्यातरी त्या उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून फिटनेस घेऊन तश्याच चालविल्या जात आहेत. अशा परिस्थितीमुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लगत असल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



राज्यात सार्वजनिक वाहतूक म्हणून रापमची बस ही म हत्वाची प्रवासी सेवा आहे. मेट्रो शहरातील कानाकोपऱ्यात जाण्यासाठी बस ही व्यवस्था असताना याकडे महामंडळाकडून दुर्लक्ष होताना दिसत आहे. श्री क्षेत्र अक्कलकोटचे बसस्थानक ५ दशकानंतर रुपेड पालटताना दिसत आहे. बसस्थानक सुधारत असताना बसचा विषय हा चर्चेचा बनत चालला आहे. अक्कलकोट आगाराच्या माध्यमातून दूरवरची सेवा राज्यासह परराज्यात दिली जाते. श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारोंच्या संख्येने स्वामी भक्त रापम बसमधून ये-जा करतात. महामंडळाला एक उत्पन्न देणारे आगार म्हणून राज्यात ओळखले जात आहे. मात्र तेथील बसची अवस्था दयनीय झाली आहे. एकूणच ६० पैकी ३५ बसेस या चालक केबिनमधील यंत्र सामुग्रीपासून ते शेवटच्या शीटपर्यंतचे सर्वच शिट, खिडक्या तावदाने, बस या मागील बाजूने ४५ ते ९० अंशाच्या कोनात वाकलेले, अंतर्गत लाईटची दुरावस्था पाहायला मिळत आहे.

#### स्टेअरिंगची आवस्था तर फारच वाईट

अक्कलकोट आगाराची शनिवारी सोलापूरहून अक्कलकोटला जाणारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमाराच्या बस चालकाने आगारातील मेकॅनिक हेडला चक्क स्टेरिंगची अवस्था हलवून दाखवली. यावेळी हेड मेकॅनिकने सदर चालकास सदरची तक्रार लॉकशीटला नोंदवावी असा सल्ला दिला. सदर चालकाने बसच्या तक्रारीबाबत लॉकसीटदेखील पुरणार नाही अशी मुश्कील टिप्पणी नोंदवताच उपस्थित प्रवाशांनी महामंडळाच्या कारभारावर सडकून टीका केली.

#### नव्या १०० गाड्यांची गरज

अक्कलकोट आगारातील इलेक्ट्रिक बसचा मंजूर प्रस्ताव हा चार्जिंग स्टेशनचा विषय सद्या लालफितीत अडकला आहे. महाराष्ट्राच्या या नवीन सरकारने तीर्थ क्षेत्र अक्कलकोटकरिता नवीन १०० बस गाड्या असाव्यात. यामध्ये इलेक्ट्रिकचादेखील समावेश असावा अशी मागणी स्वामी भक्त व तालुकावासियातून होत आहे.

## राष्ट्रवादी पक्ष संघटनासाठी जिल्ह्यात काम करणार

### माजी आमदार यशवंत माने : मोडनिंब येथे उदय कीर्ती उद्योग समूहाला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २१ जानेवारी-**

जिल्ह्यात राष्ट्रवादी पक्ष संघटनासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत राहणार असून, महायुतीच्या माध्यमातून विकासकामे पुढे करत राहणार. साडेतीन हजार कोटीचा निधी उपलब्ध करून मोहोळ तालुक्याच्या विकासासाठी प्रयत्न केला. आमदार म्हणून जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आणि यापुढेही करणार असल्याचे मोहोळ तालुक्याचे माजी आमदार यशवंत माने यांनी सांगितले.



मोडनिंब (ता. माढा) येथे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उदय माने यांच्या उदय कीर्ती उद्योग समूहाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्रवादीचे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते उद्योजक उदय माने यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी ऊसदर नियंत्रक समितीचे सदस्य प्रा. सुहास पाटील, मोहोळ मार्केट कमिटीचे माजी उपसभापती दत्ता पवार, युवा उद्योजक आकाश माने, उदय कीर्ती बँकेचे साईप्रसाद काळे, मुख्याध्यापक नवनाथ कावरे, आप्पासाहेब ढेकळे, आकाश कोळी, विशाल रणपिसे, शंभू व्यवहारे, अर्णव शहा, गणेश तोडकरी, ओंकार ओहोळ, उज्वल माने, दीपक व्यवहारे, प्रशांत कदम, बाळासाहेब खरात, भांगे, मिथुन माने आदी उपस्थित होते. प्रेस क्लबच्या नूतन अध्यक्षपदी निवडीसाठी प्रथमेश पवार, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सतीश सुर्वे यांचा सत्कार करण्यात आला. अजित पवार जी जबाबदारी देतील ती सक्षमपणे पार पाडणार असल्याचे उद्योजक उदय माने यांनी सांगितले. यावेळी आमदार माने यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सतीश सुर्वे यांनी केले. प्रास्ताविक सुहास पाटील यांनी केले तर आभार उदय माने यांनी मानले.

#### जिल्हाध्यक्षपदासाठी उदय माने यांचे नाव चर्चेत

सध्या सोलापूर जिल्हात अजित पवारांच्या पक्षाचा एकही आम दार नसल्याने ग्रामीण भागात पक्ष संघटन वाढवण्याच्या कामासाठी नव्या उमेदीचा चेहरा दिला तर पक्षाला बळ मिळु शकेल. दरम्यान उदय माने यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन जिल्हाध्यक्ष पदावर काम करण्यासाठी इच्छुक असल्याच सांगितले.अजित पवार गटाचे सोलापूर जिल्हाध्यक्षपद तीन महिन्यांपासून रिक्त आहे. मोडनिंबचे उद्योजक उदय माने यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे.

## नशेत वाहन चालविल्याप्रकरणी शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ जानेवारी-**

मंगळवेढा ते कारखाना रोड वर सुतगिरणी जवळ एक ४१ वर्षीय जिल्हा परिषद शिक्षक दारुचे सेवन करुन वेडी वाकडी गाडी चालवत असताना पोलीसांना मिळून आल्याने मोटर वाहन अधिनियम कलमान्वये शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार वैभव घायाळ हे दि.१७ जानेवारी रोजी पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग व अपघाताचे प्रमाण कमी करण्याच्या हेतूने पथकातील चालक पोलीस हवालदार चौधरी,साळुंखे असे शासकीय वाहनाने कारवाई कामी मंगळवेढा ते कारखाना रोड सुतगिरणी जवळ कारवाई करत असताना दामाजी कारखान्याकडून मंगळवेढ्याचे दिशेने यातील आरोपी सिध्दनाथ रामचंद्र साळुंखे (वय ४१ रा.मनिषा नगर,पंढरपूर) हे त्यांच्या ताब्यातील एम.एच.१३ बी.एन.०३३० ही गाडी दारुचे सेवन करुन वेडी वाकडी चालवत असतानाचे निदर्शनास येताच पोलीसांनी ८.२० वाजता गाडी थांबवून नाव पत्ता विचारले, यावेळी बोलताना आरोपीच्या तोंडाचा आंबट उग्र घाण वास येत असल्याने मशीनने पोलीसांनी ब्रेथ ॲनालायझर तपासणी केली असता त्यांचे टेस्ट पॉझीटीव्ह आली. यामध्ये अंमलाचे प्रमाण २३.६ एम.जी.दिसून आले असल्याचे पोलीस अंमलदार वैभव घायाळ यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. शिक्षकच रस्त्यावर दारुचे सेवन करुन धोकादायक स्थितीत वाहन चालवत असतील तर ते मुलांना वाहतूकीच्या नियमाबाबत कसे मार्गदर्शन करणार? याबाबत सुज्ञ नागरिकामधून सवाल केला जात आहे.

## डॉ. अरविंद कुंभार यांना साहित्य पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ जानेवारी-**

ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी लिहिलेल्या पक्ष्यांवरील संशोधन व संपादित 'पक्ष्यांची दुनिया' या पुस्तकाला मराठवाड्यातील एकता फौंडेशनने जाहीर केलेले राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले.



बीड जिल्ह्यातील दहिवंडी-शिरूर कासार येथील महात्मा फुले विद्यालयातील राष्ट्रसंत भगवान बाबा साहित्य नगरीत आयोजित केलेल्या सातवे एकता मराठी साहित्य संमेलनात छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्षा तथा संमेलनाचे अध्यक्षपद भूषविलेले प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते डॉ. कुंभार यांना रोख रक्कम अडीच हजार व स्मृतिचिन्ह प्रदान करून सत्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, विलास सिंदगीकरांसह मराठवाडा साहित्य परिषदेचे माजी कोषाध्यक्ष, साहित्यिक डॉ. भास्कर बडे, एकता फौंडेशनचे अध्यक्ष अनंत कराड, संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड. भाग्यश्री ढाकणे-चेमटे हे उपस्थित होते.

## स्वामींच्या दर्शनाने कार्याला मिळते प्रेरणा : बरडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थांचे आपण निस्सिम भक्त असून त्यांच्या दर्शनाने आपणांस राजकीय व सामाजिक कार्य करण्यास नेहमीच प्रेरणा मिळत आहे, असे मनोगत शिवसेनेचे लोकसभा संपर्कप्रमुख पुरुषोत्तम बरडे यांनी व्यक्त केल.



स्वामींच्या दर्शनाकरिता येथे आले असता ते बोलत होते. या प्रसंगी वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी त्यांचा सत्कार केला. पुढे बोलताना बरडे यांनी स्वामींचे दर्शन आपल्याप्रमाणे इतर भाविकांनाही समाधान देऊन जात असल्याने व मंदिर समितीच्या वतीने भाविकांकरिता उपलब्ध करून दिलेल्या सोई सुविधांबद्दल महेश इंगळे यांनी स्वतः पुढाकाराने उभे राहून जेष्ठ, दिव्यांग व वयोवृद्ध स्वामी भक्तांना व्हीलचेअरच्या माध्यमातून, स्वतंत्र दर्शन व्यवस्थेच्या माध्यमातून स्वामींचे दर्शन घडवून देत असल्याचे चित्र पाहून माझ्या मनाला अत्यंत समाधान लाभले आहे. वटवृक्ष मंदिरातील दर्शन व्यवस्थेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली मंदिर समितीचे हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. त्यामुळे येथे येणारे भाविक स्वामींचे दर्शन घेऊन आनंदाने माघारी परतत असल्याचे प्रतिपादनही पुरुषोत्तम बरडे यांनी केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, सागर गोंडाळ, विपुल जाधव, उपस्थित होते.

## करमाळा तहसीलचे स्थलांतर नकोच

- आहे त्याच ठिकाणी नवीन कार्यालय करा;
- किसान मोर्चाचे प्रदेश सचिव दीपक चव्हाण यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी




**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ जानेवारी-**

करमाळा तहसील कार्यालय मौलाली नगर परिसरात स्थलांतरित न करता सद्या कार्यरत असलेल्या ठिकाणीच नवीन कार्यालय करण्याची मागणी भाजप किसान मोर्चाप्रदेश सचिव दिपक चव्हाण यांनी महसुली मंत्री चंद्र शेखर बावनकुळे यांची मुंबई मंत्रालय येथे भेट घेत केली आहे.

दिलेल्या निवेदनात चव्हाण यांनी म्हटले आहे की, सध्या कार्यरत असलेल्या तहसील कार्यालय परिसरात नवीन कार्यालयासाठी लागणारी आवश्यक जागा शिल्लक आहे. तसेच याच परिसरात पोलीस स्टेशन,पंचायत समिती, संस्था निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, तसेच करमाळा नगरपालिका व दिवाणी न्यायालय येथून जवळच्या अंतरावर आहे. ही सर्व कार्यालय एकाच ठिकाणी असल्यामुळे शासकीय काम करण्यासाठी नागरीकांसाठी सोयीस्कर आहे. तरीही तहसील कार्यालय मौलाली नगर माळावरती बांधण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. सद्या कार्यरत असलेल्या तहसील कार्यालयापासून एसटी स्टँड, राष्टीकृत व सहकारी बँका, शाळा, महाविद्यालये, कृषि उत्पन्न बाजार समिती, खासगी व सरकारी दवाखाने, करमाळा शहराची बाजारपेठ जवळ आहे. त्यामुळे सद्याचे ठिकाण सर्व बाबींचा विचार केल्यास सोयीस्कर आहे. जर हे तहसील कार्यालय मौलाली नगर येथे बांधण्यात आले तर करमाळा शहरातील मुख्य बाजारपेठेवरती परिणाम होणार आहे. नवीन कार्यालयाची जागा एसटी स्टँडपासून जास्त अंतरावरती असल्याने ग्रामीण भागातील अबाल वृद्ध, नागरीक, शालेय विद्यार्थी, महिला यांसाठी गैरसोयीचे होणार आहे. त्यामुळे सद्या कार्यरत असलेल्यात ठिकाणीच नवीन कार्यालय व्हावे यासाठी आपल्यास्तरावरुन आदेश देण्यात यावेत अशी मागणी चव्हाण यांनी केली असून याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित प्रशासनास कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याचे सांगितले.



## मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून मायलेकी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ जानेवारी -**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एक २७ वर्षीय विवाहिता व तिची मुलगी या दोघी बेपत्ता झाल्या असल्याची तक्रार तिच्या पतीने पोलीसात दिली असून पोलीस त्या दोघींचा कसून शोध घेत आहेत.

यातील २७ वर्षीय विवाहिता व तिचे पती दि.१८ रोजी दुपारी शेतात गेले होते. त्यावेळी बेपत्ता २७ वर्षीय विवाहितेला कोणाचा तरी फोन आल्याने ती मोबाईलवर बोलत होती. हे तिच्या पतीने पाहिल्यानंतर पतीने विचारणा केल्यावर पतीला तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पती-पत्नीत किरकोळ वाद झाला होता. तद्नंतर ते दोघे पती-पत्नी घरी आले. सायंकाळी ७ वाजता पती घराजवळ काम करत असताना बेपत्ता पत्नी घरात होती. ७.३० च्या दरम्यान पती घरात गेले असता पत्नी व मुलगी घरात दिसून आले नसल्याने पतीने गावात,आजूबाजूला,मंगळवेढा,नातेवाईक यांच्याकडे शोध घेतला मात्र मिळून आल्या नसल्याने खात्री झाली की कोणास काही न सांगता ते कोठेतरी निघून गेले असल्याचे दिलेल्या खबरी जबाबामध्ये म्हटले आहे. तिचे वर्णन ऊंची १६५ सें.मी.वर्ण सावळा, अंगात नेसनेस निळसर रंगाची साडी व काळ्या रंगाचा ब्लाऊज आहे. निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भाविकाकडून श्री तुळजाभवानीस पाच तोळ्याची सोनसाखळी अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**
कर्नाटकातील बिदर येथील भाविक पांडुरंग हुलाजीराव पाटील यांनी तुळजाभवानी देवीस ४७.९४ ग्रॅम वजनाची म्हणजे सुमारे पाच तोळे (सुमारे ३.५ लाख किमतीची) सोन्याची साखळी दि २१ जानेवारी मंगळवार रोजी अर्पण केली.

तुळजाभवानी मंदिर संस्थांतर्फे मंदिर प्रशासकीय कार्यालयात त्यांचा साडीचोळी आणि देवीजींची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदिर संस्थानचे कर्मचारी विश्वास कदम, गणेश माटे, राकेश पवार उपस्थित होते.





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### प्रवीण दरेकर यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**
भाजपचे विद्यमान आमदार तथा माजी विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर हे दि.२१ जानेवारी रोजी तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आले असता दर्शनानंतर मंदिर प्रशासकीय कार्यालयात कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सचिन पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, राम छत्रे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

### दिल्लीतील परेडसाठी वैभवी हिची निवड

**उमरगा, दि.२१ जानेवारी -**
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागातील कॅडेट वैभवी गोपाळ शेंडगे हिची



दिल्ली येथे होणाऱ्या २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी होणाऱ्या RDC संचलन परेडसाठी दिल्ली येथील राजपथावर होणाऱ्या पंतप्रधान रॅलीसाठी ड्रिल मधुन तिची महाराष्ट्राच्या मुलीच्या संघात निवड झाली आहे. प्रत्येक वर्षी होणाऱ्या या संचलनासाठी देशातुन सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातुन एनसीसी कॅडेटस ड्रिल परेड इतर सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात. तालुक्यातील कोरेगाववाडी येथील छोट्याशा खेडगावातुन कठिन अशा परिस्थितीताला सामोरे जाऊन एका गरीब शेतकऱ्याची मुलीने स्वतःच्या जिद्द, आत्म विश्वास, कठोर परिश्रम घेऊन हे यश वैभवी शेंडगे या मुलीने पूर्ण करून दाखविले आहे. वैभवी शेंडगे हीचे जिल्हाभरातू कौतुकन होत आहे.

### परंडयात जुगार अड्ड्यावर छाप

**परंडा, दि.२१ जानेवारी -**
परंडा पोलीसांनी दि.१८ जानेवारी रोजी भिमनगर परंडा येथे छापा टाकून एका व्यक्तीला कल्याण मटका जुगार खेळताना रंगेहाथ पकडले. पोलिसांनी त्याच्याकडून २०५० रुपये रोख रक्कम आणि जुगार साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी आरोपीवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### अथलेटिक्स स्पर्धेसाठी सिद्धीची निवड

**परंडा, दि.२१ जानेवारी -**
धाराशिव येथे घेण्यात आलेल्या धाराशिव जिल्हा अम्युचर अथलेटिक्स असोसिएशन आयोजित जिल्हा स्तर सब ज्युनिअर अथलेटिक्स स्पर्धा मध्ये सिद्धी महेशकुमार शिंदे हिने स्टँडिंग ब्रॉड जम्पमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तिची पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्याबद्दल बावची विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे व हायटेक कॉम्प्युटर्सचे संचालक दत्ता काशीद यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच तिचे मार्गदर्शक शिक्षक व पालक महेश शिंदे यांचाही विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




### सरस्वती विद्यालयाला पारितोषिक

**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**
ब्रम्हदेवदादा माने पॉलिटेक्निक कॉलेज, सोलापूर आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सरस्वती विद्यालय, तामलवाडी येथील विद्यार्थ्यांने रस्त्यावरील प्रकाश उर्जेची बचत या प्रयोगाचे सादरीकरण केले होते. या प्रयोगाला राज्यस्तराचे व्दितीय क्रमाकांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मसुते बसवण्णाप्पा, सचिव लोंढे यशवंत, उपाध्यक्ष पाटील ज्ञानेश्वर, विद्यालयाचे प्राचार्य वडणे सुहास, पर्यवेक्षक सांळुखे चंद्रकांत, सर्व शिक्षिक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक पाटील एल.एस., सावंत एम.एन., साठे बी.डी, चुंगे पी.व्ही. या सर्वांचे अभिनंदन केले.

### अवैध मद्य विक्री : आरोपीला अटक

**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
अवैध मद्य विक्री विरोधात बेंबळी पोलीस ठाण्याच्या पथकाने तालुक्यातील उमरेगव्हाण येथे कारवाई करत




अवैध मद्यसाठ्यासह आरोपीला अटक केली आहे. दि. १८ जानेवारी रोजी दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे उमरेगव्हाण येथे छापा टाकण्यात आला. या कारवाईत आरोपी सतिश वसंत सपकाळ (वय ४८ वर्षे) हा आपल्या ताब्यात १,४०० रुपये किंमतीच्या देशी आणि विदेशी मद्याच्या २० सीलबंद बाटल्या विक्रीच्या उद्देशाने ठेवून होता.

# जिल्ह्याला मिळणार पहिल्या टप्प्यात २० इलेक्ट्रिक बस

**शिवसेनेचे आनंद पाटील यांच्या मागणीला यश...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात इलेक्ट्रिक बस देण्यात आल्या आहेत.परंतु धाराशिव जिल्ह्याला एक ही इलेक्ट्रिक बस देण्यात आली नव्हती. याच अनुषंगाने परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या कडे धाराशिव जिल्ह्यासाठी १०० इलेक्ट्रिक बसेसची मागणी शिवसेनेचे युवा नेते आनंद पाटील यांनी केली. परिवहन मंत्री सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांना धाराशिव जिल्ह्याला पहिल्या टप्प्यात वीस इलेक्ट्रिक बस देण्याचे निर्देश दिले आहेत.



शिवसेना युवा नेते आनंद पाटील यांच्या पहिल्याच मागणीस यश मिळाले आहे.

धाराशिव येथील शिवसेना युवा नेते आनंद पाटील यांनी मंगळवार २१ जानेवारी रोजी मुंबई येथे राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची यांची भेट घेतली. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल आनंद पाटील यांनी सत्कार केला. यावेळी आनंद पाटील यांनी मंत्री सामंत यांना धाराशिव जिल्ह्याला १०० इलेक्ट्रिक बस देण्याची मागणी केली. धाराशिव जिल्हयातील अंतर्गत वाहतुकीने धाराशिव शहर हे लोकांनी गजबजलेले शहर आहे. रोज धाराशिव शहरात आजुबाजुच्या खेडेगावातुन हजारो लोकांची शहरात ये-जा होत असते. यासाठी खेडे गावातील लोक हे परीवहन विभागाच्या गाड्यांचा जास्तवापर करत असतात. त्यामुळे जिल्ह्यात अंतर्गत वाहतुकीसाठी चांगल्या बसेसची आवश्यकता आहे. त्या तुलनेत धाराशिव परिवहन विभागाच्या ज्या बसेस आहेत त्या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या आणि खराब आहेत. परिवहन विभागाच्या बसेस या कित्येकदा रस्त्या मध्येच बंद पडलेल्या आढळतात. त्याचा प्रचंड प्रमाणात त्रास व मनस्ताप हा प्रवाशांना होताना दिसत असतो. तसेच बसचे चालक-वाहक यांनाही या वाहन सततच्या बंद पाडण्याचा त्रासाला सामोरे जावे लागत असते. बऱ्याच वेळेस प्रवासी हे खाजगी वाहनांना प्राधान्य देतात. खाजगी वाहनांमुळे अपघातही होण्याचे प्रमाण वाढलेले दिसते.

त्यामुळे धाराशिव परिवहन विभागाला १०० इलेक्ट्रिक बसेस देण्यात याव्यात अशी विनंती पाटील यांनी केली आहे.

> परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचे निस्सीम भक्त आहेत. पाटील यांनी धाराशिव जिल्ह्याला एकही इलेक्ट्रिक बस मिळालेली नसल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे व्यवस्थापक संचालक यांना धाराशिव जिल्ह्यासाठी पहिल्या टप्प्यात वीस इलेक्ट्रिक बसेस देण्याचे निर्देश दिले असल्याचे युवा नेते आनंद पाटील यांनी सांगितले.

**चोऱ्यांचे व दरोड्यांच्या घटनेमुळे शहराचे नाव बदनाम...**

## तुळजापूरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर



**महाविकास आघाडीचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**
महाविकास आघाडीच्या वतीने दि.२१ जानेवारी रोजी पोलीस निरीक्षक यांना शहरात वाढत चाललेल्या चोऱ्या आणि अवैध धंदे बंद करा म्हणून निवेदन देण्यात आले.

सदरील निवेदनात असे नमूद केले आहे की, गेल्या २-३ महिन्यापासुन शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असुन दिवसा ढवळ्या घरफोडी, रस्त्यावर महिलेच्या गळ्यातील दागिणे पळवुन नेणे असे अनेक प्रचंड प्रमाणात घटना होत असुन सदरील तुळजापुर शहरामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढतच चालले असुन यामुळे सर्वसामान्य जनता व येणरे भाविक हे भयभित झाले असुन या प्रकरणावरती आपणाकडुन कुठलीही ठोस कारवाई झालेली दिसुन येत नाही.

विशेषतः शहरातील सर्वच बाजुच्या बाहेरील भागात विशेषतः असल्या चोऱ्यांचे प्रकार व शस्त्रांचे धाक दाखवुन घरफोडी केली जात आहे. तुळजापुर शहरात प्रत्येक चौकाचौकात सीसीटीव्ही कॅमेरा असुनही आपण दुर्लक्ष करत आहात याची खंत वाटते. तुळजापुर शहर हे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीची पावन नगरी आहे. तसेच तुळजापुर शहरात गेल्या महिन्यापासुन घरफोडी, रस्त्यावर लुट, महिलांच्या गळ्यातील दागिणे हिसकावुन घेणे, शस्त्र दाखवुन लुटणे अशा घटना घडत आहेत. मुळे शहरातील नागरिक व येणारे भक्त हैराण झाले आहेत.

त्याठिकाणी अशा चोऱ्यांचे व दरोड्यांच्या घटनेमुळे तुळजापुर शहराचे नाव बदनाम होत आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सुविधा तात्काळ चालु करण्यात याव्या. नाविलाजास्तव तुळजापुर महाविकास आघाडी व सर्व घटक पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी अमोल कुतवळ, अमर मगर, शाम पवार, भाऊ भांजी, अक्षय कदम, नरेश पेंदे, भरत जाधव, नवनाथ जगताप, बबन गावडे, सुधीर कदम, शंतनु कुतवळ, बाळासाहेब मुळे, अभिमान सगट, विकास भोसले, बापूसाहेब नाईकवाडी, सुदर्शन वाघमारे, चंद्रकांत साळुंखे तसेच महाविकास आघाडीचे शहरातील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर अतिवृष्टीचे अनुदान जमा होण्यास सुरुवात

**सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांच्या मागणीला यश...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
जिल्हा प्रशासनाच्या अहवालानंतर अतिवृष्टी अनुदान २०२४ पहिल्या टप्प्यातील धाराशिव जिल्ह्यातील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांना मंजूर झाले होते. त्यासाठी २२१ कोटी ८१ लाख निधीची आवश्यकता होती. राज्य शासनाने १० डिसेंबर रोजी राज्यातील अतिवृष्टी नुकसान भरपाई साठी २९२० कोटी सत्तावन्न लाख निधीची तरतूद केली होती. धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केवायसी प्रक्रिया करून तीन आठवडे होऊनही अद्याप पर्यंत अतिवृष्टी अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर पडत नव्हते. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी १९ डिसेंबर रोजी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना तातडीने अनुदान द्यावे अन्यथा एक आठवड्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला होता.



अनिल जगताप यांच्या इशाऱ्यानंतर तातडीने २० डिसेंबर पासून शेतकऱ्यांच्या खात्यावरती अतिवृष्टी अनुदान जमा होण्यास सुरुवात झालेली आहे.

८ ऑक्टोबर २०२४ च्या जिल्हा प्रशासनाच्या अहवालानुसार धाराशिव, कळंब, वाशी आणि परंडा या चार तालुक्यांना पुढील प्रमाणे अनुदान मिळणार आहे. घराशीव तालुक्यातील ६५६३३ शेतकऱ्यांना ९८ कोटी ४७ लाख रुपये मिळणार आहेत. तर परंडा तालुक्यातील १४,३९५ शेतकऱ्यांना नऊ कोटी ४४ लाख रुपये मिळणार आहे. तसेच कळम तालुक्यातील ६५ हजार ३३१ शेतकऱ्यांना ७३ कोटी ४५ लाख रुपये मिळणार आहे. वाशी तालुक्यातील ३५ हजार ५७ शेतकऱ्यांना ४० कोटी तीन लाख रुपये मिळणार आहेत. आत्तापर्यंत धाराशिव जिल्ह्यातील १४,९७९ शेतकऱ्यांच्या खात्यावरती अतिवृष्टी अनुदान जमा झाले असून अनुदान जमा होण्याची प्रक्रिया सुरूच आहे.

तर धाराशिव जिल्ह्यातील अद्यापही २५ हजार ३३९ शेतकऱ्यांनी अद्याप केवायसी केलेली नाही की त्यांनी तातडीने करून, घ्यावी अशी सूचना व विनंती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी केली आहे.

## अवैध उत्खनन करून वाळू चोरी करणारा टॅक्टर महसुल पथकाच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ जानेवारी -**
अवारपिपरी, कारंजा शिवारातील शेत रस्ता खुला करून देण्या साठी गेलेल्या नायब तहसिलदार माढेकर, मंडळ आधिकारी पवार, मंडळ अधिकारी सुररवसे, तलाठी गुळमीरे, स्वामी, तलाठी काळे यांच्या पथकाच्या जाळ्यात भरदिवसा वाळू चोरी करून वाहतूक करणारा टॅक्टर मंगळवार दि.२१ जानेवारी रोजी सापडला आहे.

टॅक्टरमध्ये वाळू असल्याने महसुलच्या पथकाने टॅक्टर थांबवीला व मंडळ अधिकारी पवार हे टॅक्टर वर चढले असता टॅक्टर चालकाने टॅक्टर २ते ३ किलो मीटर पर्यंत जोरात पळविले.

खराब रस्त्यामुळे टॅक्टर वर चढलेले मंडळ आधिकारी पवार टॅक्टर मधून खाली पडले. यामध्ये पवार यांना मार लागला आहे. यावेळी टॅक्टर चालकाने टॅक्टर सोडून पसार झाला. हा थरार सुरू असताना महसुलच्या पथकाने परंडा पोलिसांना तात्काळ माहिती देऊन मदत मागीतल्याने पोलिस हवालदार विशाल खोसे, पोलिस अमलदार उंदरे यांनी घटनास्थळी धाव घेतली पोलिसांच्या मदतीने टॅक्टर पोलिस ठाण्यात आणले आहे.

या प्रकरणी परंडा पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे.

तालूक्यात भर दिवसा व रात्री मोठ्या प्रमाणात वाळू चोरी होत असल्याचे आता उघड झाले आहे.

तालुक्यातील वाळू चोरी रोखण्यासाठी अवैध वाळू उत्खनन पथकाला सक्रीय करणे गरजेचे असुन वाळू चोरी मुळे तालूक्यात गुंडगीरी वाढत असल्याने कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

## येरमाळ्याच्या सरपंचपदी प्रिया बारकुल यांची बिनविरोध निवड



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२१ जानेवारी -**
येरमाळा येथील ग्रामपंचायत सरपंचपदी प्रिया विशाल बारकुल यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. येरमाळा ग्रामपंचायतवर भाजपाचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे निकटवर्तीय म्हणून ओळख असलेले माजी सरपंच तथा पंचायत समिती माजी सभापती विकास बारकुल यांचे गेल्या वीस वर्षांपासून एक हाती वर्चस्व आहे.

गेल्या पंचवार्षिक ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदासाठी खुल्या महिला प्रवर्गाला आरक्षण होते. निवडणुकीत भाजपाचे विकास बारकुल यांच्या गटाने १३/० अशी एकहाती निवडणूक जिंकली होती. निवडून आलेल्या खुल्या प्रवर्गातील चार महिलांना सव्वा सव्वा वर्षे सरपंच पद देण्याचे विकास बारकुल यांनी जाहीर केले होते.

पहिल्यांदा तबस्सुम रफिक सय्यद यांना दुसऱ्यांदा सुजाता श्रीकांत देशमुख यांना तर गेल्या वर्षी मंदाकिनी आबासाहेब बारकुल यांना तर या वर्षी सत्तेच्या कार्यकालाच्या शेवटच्या टप्प्यात प्रिया विशाल बारकुल यांना ठरल्या प्रमाणे सरपंच पदाची संधी देण्यात आली. आज झालेल्या सरपंच निवडीसाठी निवडणूक अधिकारी म्हणुन मंडळ अधिकारी एन.डी. नागटिळक यांनी तर सहकारी म्हणुन तलाठी एस.व्ही. गायकवाड, एम.व्ही. नागरे यांनी काम पाहिले.

यावेळी गावातील पक्षाचे जेष्ठ प्रा.आबासाहेब बारकुल, भाऊसाहेब बारकुल, माजी सरपंच मुरहरी कांबळे, प्रा.संतोष तौर, महावीर अचलारे, चेअरमन रामकिसन बारकुल येरमाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन बारकुल, ग्रामपंचायत सदस्य शिवहार मनगिरे, विलास बारकुल, उपसरपंच गणेश बारकुल, शंकर कांबळे, कुंदन कांबळे, शब्बीर सय्यद उपस्थित होते.

प्रिया बारकुल यांचा सरपंच निवडीनंतर माजी सरपंच तबस्सुम सय्यद, मंदाकिनी बारकुल सदस्या नंदुबाई कसबे, वनमाला कळसाईत, राजश्री शेटे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पहार घालुन सत्कार केला.

## दिव्यांग व्यक्तींनी कृत्रिम अवयवाचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**कृत्रिम अवयव मोजमाप व वितरणाचा शुभारंभ...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**
दिव्यांग व्यक्तींचे जीवन थोड्या प्रमाणात का होईना सुसह्य व्हावे यासाठी त्यांना कृत्रिम अवयव दिले जातात. त्यांना आता आधुनिक पद्धतीने तयार केलेले कृत्रिम हात व पाय वितरण करण्यात येत आहेत. त्यामुळे या सुविधेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग बंधू भगिनींनी लाभ घेऊन आपले जीवन सुकर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले.

आज २१ जानेवारी रोजी धाराशिव पंचायत समिती सभागृहात दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात पाय बसविणे व केली पर्स स्लिप्त यांचे मोजमाप तात्काळ ऑन द स्पॉट वितरण करणे या कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे यांच्या हस्ते करण्यात



आला. त्यावेळी ते बोलत होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाचे सच्चिदानंद बांगर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.एस.एस. फुलारी, जनकल्याण समितीचे महाराष्ट्र राज्य समन्वयक व्यंकट लांमजणे, सोमनाथ चपने, एस.आर. ट्रस्ट गोवाचे संचालक डॉ. रुपेश जाधव, अलिम्को कंपनीच्या डॉ रुक्मिणी सोनेवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे पुढे म्हणाले की, दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम पद्धतीचे हात किंवा पाय चांगले व दर्जेदार तसेच त्यांना त्याचा अगदी सहजासहजी वापर करता यावा यासाठी आर्टिफिशियल लिम्ज या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे दिव्यांग व्यक्तींनी ग्रामपंचायत येथे संपर्क करून आपली सर्व माहिती द्यावी.

सर्व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून त्याची माहिती एकत्र करून तालुकास्तरावर पंचायत समिती येथे कृत्रिम हात व पाय याचे मोजमाप व वितरण ऑन द स्पॉट करण्यात येणार आहे.त्यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

विशेष म्हणजे कृत्रिम हात व पाय वेगवेगळ्या प्रकारामध्ये उपलब्ध असल्यामुळे ते दिव्यांग व्यक्तींना हाताळणे सोयीस्कर होणार आहे.

त्यांना पूर्वीसारखेच अवयव भेटल्याचा अनुभव घेता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महादेव कांबळे (जवळा खुर्द), अमित शेख (बेंबळी), विष्णू पवार (भाटशिरपुरा), तुकाराम घुटे (काजळा), उद्धव शेरखाने (रुईभर), रामू घोडके, मनोरमा कुलकर्णी, येसाजी कोळी, हरिश्चंद्र शिंदे, महादेव ठोकळे, शमशद शेख, भास्कर आडसुळ, विकास पाटील, अविनाश पवार, समाधान लोखंडे, संजय शिंदे, दत्ता मंजुळे, सुर्यकांत काटे व श्रीदेवी गायकवाड यांना कृत्रिम हात व पायांचे वितरण करण्यात आले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कसबे तडवळे येथे महा रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कसबे तडवळे, दि.२१ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथे अनंत विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंदाचार्य महाराज यांच्या वतीने कसबे तडवळे येथील सेवा केंद्रात महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




यामध्ये तब्बल २२४ रक्त दात्याने रक्त दान करून रेकॉर्ड ब्रेक विश्व विक्रम तडवळे सेवा केंद्राने दाखवून दिला आहे. यामध्ये धाराशिव शासकीय रक्त पथपेढी व भगवंत रक्तपेढी यांच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य करून शिबिर उत्साहात पार पाडले.

यामध्ये तडवळे सेवा केंद्रातील जयसिंग भोईटे, राम लिंग सुरवसे, प्रभाकर गुळवे, भगवान कोळी, बाळू कोरडे, अनिकेत पवार, प्रदीप शिंदे, राज सुरवसे, अशोक देशमुख, दिपक कदम, सिदु पवार, गणेश गायकवाड, स्वप्नील भांड, अण्णा पानढवळे, विकी भोईटे, सोनू लांडगे व सेवा समितीने यशस्वी रित्या पार पाडले.

## आयुष्यमान कार्ड काढण्याची मोहीम प्रभावीपणे राबवा : जिल्हाधिकारी डॉ. ओंबासे

### प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत कार्डचा घेतला आढावा...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ जानेवारी -**

गरीब व असुरक्षित कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या आरोग्य सेवांचा लाभ मिळावा,यासाठी प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत विविध आजारावरील उपचार व शस्त्रक्रियेसाठी महत्त्वाचे असणारे आयुष्यमान भारत कार्ड काढण्याच्या मोहिमेची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दिले.

२० जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत कार्ड योजनेचा आढावा घेताना डॉ. ओंबासे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी देवदत्त गिरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी लाकाळ, उपशिक्षणाधिकारी आर.सी. मैंदर्गी, डॉ. एस.एस. फुलारी, महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. आहेर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. ओंबासे पुढे म्हणाले, आयुष्यमान कार्ड काढण्याची मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी २७ जानेवारीपासून दोन आठवड्याचे जिल्हाभर शिबिराचे आयोजन करावे.

ज्या आशा वर्कर यांनी आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी लाभार्थ्यांना मदत केली, अशा आशा वर्कर्स यांना कामाचे देयक अदा करावे. ज्या सीएससी केंद्रातून हे कार्ड काढले तसेच खाजगी व्यक्तींनी हे कार्ड काढून देण्यास मदत केली आहे, त्यांची रक्कम देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

शहरी भागात असलेल्या आपला दवाखान्याच्या माध्यमातून आयुष्यमान भारत कार्ड काढण्याची कार्यवाही करावी,यासाठी नगरपालिकांचे मुख्याधिकारी व आपला दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचे सहकार्य घ्यावे तसेच विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी यांनी देखील आयुष्यमान भारत कार्ड काढावे, असे डॉ. ओंबासे यावेळी म्हणाले.

डॉ. घोष म्हणाले, आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी आयोजित करण्यात येणारे शिबिरे यशस्वी करण्यात यावे. आयुष्यमान कार्ड काढण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरात ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्स यांनी लाभार्थ्यांना आयुष्यमान कार्ड काढण्यासाठी घेऊन यावे.

आपले सरकार सेवा केंद्र,सामान्य सुविधा केंद्रामध्ये तसेच आयोजित शिबिरात जास्तीत जास्त लाभार्थींनी आयुष्यमान भारत कार्ड काढण्याचे नियोजन करण्यासाठी तालुका स्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांनी कार्यक्रम आखून जास्तीत जास्त कार्ड काढावेत, असेही डॉ. घोष म्हणाले.

आयुष्यमान कार्ड काढण्याची मोहीम जिल्ह्यात २७ जानेवारी २०२५ पासून १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत राबविण्यात येणार आहे. कर्मचारी हे गाव, वार्ड, वाडी, वस्ती, शाळा व महाविद्यालयामध्ये जावून आयुष्यमान कार्डचे ई-केवायसी करणार आहेत.

तसेच लाभार्थ्यांना स्वत:चे ई-केवायसी स्वतः काढता यावे यासाठी आधुनिक मोबाईलमध्ये आयुष्यमान अँप डाउनलोड करून बेनिफिशरी बटनवर क्लिक करून ते स्वत:चे आयुष्यमान कार्ड काढू शकतात. जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांचे १०० टक्के आयुष्यमान कार्डचे ई-केवायसी मार्च २०२५ अखेर पूर्ण करण्यात येणार आहे.

## साने गुरुजी कथामाला जिल्हास्तरीय अधिवेशन व पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ जानेवारी -**

अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे धाराशिव जिल्हा अधिवेशन व डॉ. अशोकराव मोहेकर यांना जीवन गौरव तसेच डी.के. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ अनंतराव सूर्यवंशी यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार व जिल्ह्यातील १६ शिक्षक व मुख्याध्यापक यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण तज्ञ विचारवंत एम.डी देशमुख हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून धाराशिव कळंब विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास घाडगे पाटील, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील, ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव डॉ.अशोकराव मोहेकर, जिल्हा उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील पवार, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ. गिरीष कुलकर्णी, अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचे महाराष्ट्र प्रदेश कोषाध्यक्ष के. व्ही. गाजरे, विकास देशमुख, शेरे, माने, देवताळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात पूज्य साने गुरुजी, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर, डि.के. कुलकर्णी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी जीवन गौरव पुरस्काराने ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, कथामालेचे जिल्हाध्यक्ष कै.डि.के. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ आदर्श मुख्याध्यापक म्हणून अनंतराव सूर्यवंशी यांना गौरविण्यात आले.

यानंतर एक मुख्याध्यापक व एक माध्यमिक शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सपत्नीक सन्मान करण्यात आला.

## होर्टी येथे रविवारपासून श्री. लक्ष्मण शक्ती सोहळ्यास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२१ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथे रविवार दि.२६ जानेवारी २०२५ रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन गाव परिसरातील रामभक्त भाविकांनी राम कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन होर्टी येथील रामभक्त ग्रामस्थांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.



प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी होर्टी येथे श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे तिसरे वर्ष आहे. रविवार दि.२६ जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात होत असून सकाळी ५:३० वाजता श्री लक्ष्मण शक्तीतून सावधान झाल्यानंतर ग्रंथ वाचन निरूपण सांगता होणार आहे. तब्बल बारा तास हा सोहळा होणार असुन श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण होणार आहे.

तरी या श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यासाठी गाव परिसरातील व तुळजापुर तालुक्यातील सर्व रामभक्तानी उपस्थित राहून राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन होर्टी येथील रामभक्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## सायकलिंग स्पर्धे प्रणय व प्रणव चिनगुंडे भावांचा विक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ जानेवारी -**

सायकलिंग स्पर्धेमध्ये एकाच वर्षात तीन राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत खेळण्याचा विक्रम नंदगाव (ता. तुळजापुर) येथील प्रणय भागन्ना चिनगुंडे व प्रणव भागन्ना चिनगुंडे यां दोन जुळ्या भावांनी केला आहे. अथक परीश्रम व मेहनतीच्या जोरावर प्रणय व प्रणवने हा विक्रम केला आहे.



भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडुंचे योगदान वाढविण्याकरीता महाराष्ट्रामध्ये शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी पुणे येथे आंतरराष्ट्रीय खेळाडु घडविले जात आहेत. या क्रीडा संकुलात नंदगाव ता. तुळजापुर येथील प्रणय भागन्ना चिनगुंडे हा वयाच्या १४ व्या वर्षी दाखल झाला. त्यानंतर पहिल्याच वर्षी त्याची खेलो इंडिया या स्पर्धेसाठी निवड झाली. त्यानंतर अवघ्या दुसऱ्याच वर्षी राष्ट्रीय स्पर्धेत प्रणय याने सिल्वर मेडल मिळविले आहे. प्रणय ताशी ५० किलोमीटर वेगाने सायकल चालवितो. प्रणय आणि त्याचा जुळाभाऊ प्रणव हे दोघेजन दररोज ६ तास सायकल चालवितात. एकाच घरातील दोन जुळे भाऊ आपल्या अथक मेहनतीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत आहेत.

आंतरराष्ट्रीय कोच दीपाली पाटील व महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रणय व त्याचा भाऊ प्रणव सायकलिंग या क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण घेत आहेत.

## नूतन निवडीनिमित्त पत्रकार पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**

आपसिंगा रोड येथील वंदे मातरम् नगर तुळजा माता इंग्लिश स्कूल परिसर तसेच शिक्षक कॉलनी येथील नागरिकांच्या वतीने दि.१९ जानेवारी रोजी तुळजापूर तालुका पत्रकार संघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पत्रकार सचिन ताकमोघे, यांचा तर तालुकाध्यक्षपदी प्रदीप अमृतराव व सचिव पदी शुभम कदम यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

तसेच यावेळी सर्व पत्रकारांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जयकुमार पांढरे, चेतन पांडागळे, विशाल शिंदे, रोहन पांढरे, अनिल पवार, अमित मोरे, अनुप लोखंडे, आशिष क्षीरसागर, पांडुरंग वाळके, मंगेश क्षीरसागर यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मकरसंक्रांतीनिमीत्त रक्तदान व नेत्र तपासणी शिबीर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२० जानेवारी -**

तालुक्यातील डिग्गी येथे मकरसंक्रांती व श्री. वीरभद्रेश्वर यात्रेनिमित्त कै. शरणप्पा हेबळे यांच्या स्मरणार्थ राहुल हेबळे यांच्यावतीने उदगीर येथील उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालय यांच्या मार्फत मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व रक्तदान शिबिर घेण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील, उमरगा पंचायत समिती माजी सभापती सचिन पाटील, विठ्ठलसाई सहकरी साखर कारखान्याचे संचालक राजीव हेबळे, प्रा. शौकत पटेल, योगेश राठोड, उपसरपंच संतोष कवठे, श्रीकांत हत्तरगे, माजी नगरसेवक महेश मशाळकर उपस्थित होते.

या शिबीरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर ६७ जणांच्या डोळ्याची तपासणी करण्यात आली.

२१ रूग्णांच्या डोळ्याची लॉयन्स क्लब उदगीरच्या वतीने मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

यासाठी राहुल हेबळे, सतीश बलकुंदे, नितीन गायकवाड, संकेत कवठे, गुरुनाथ मंठाळे, यल्लालिंग घोडके, अमोल पाटील, आनंद घोडके आदींनी पुढाकार घेतला.

## सामुदायिक विवाह सोहळ्यात ९ जोडपी विवाहबद्ध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ जानेवारी -**

येथील नळदुर्ग एज्युकेशन वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने दि.१९ जानेवारी आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्यात ९ जोडपी विवाहबद्ध झाली. हजारो लोकांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी नळदुर्ग एज्युकेशन वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी व नळदुर्ग शहर मुस्लिम समाजाने परिश्रम घेतले.

### पचास साल बाद, वर्गमित्रांची जमली मैफिल...
## १९७५ ची दहावी बॅचनी केला आनंदी स्नेहमेळावा साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ जानेवारी -**


शहरातील सर्वात पाहिलं ज्ञानमंदिर असलेली एकमेव जिल्हा परिषद प्रशालेच्या १९७५ च्या बॅचचे वयोवृद्ध वर्गमित्र एकत्रित येत आनंदी स्नेहमेळावा आयोजित करून आयुष्यातील सुख दुःखाचे क्षण एकमेकांशी हितगूज करत उर्वरित आयुष्यात मानसिक आधार देण्याची शपथ घेऊन साजरा केला.



पुजारी नगर सोसायटी परिसरातील श्रीनाथ मंगल कार्यालय येथे विश्वनाथ पुजारी यांच्या संकल्पनेतून तब्बल पन्नास वर्षांनी जेष्ठ वर्गमित्र एकत्रितपणे एका ठिकाणी येत सामूहिक संवादासह शालेय गप्पांची मैफिल रंगली होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ पुजारी, सुदर्शन पांढरे, शहाजी रोचकरी, आनंत कोंडो, विनोद खपले, गोपाळ कावरे, नवनाथ पुजारी, नरेश पेंदे, संपत जळके, आयुब शेख, दत्ता शित्रे, आंबादास औटी, प्रदीप पाटील, राजाभाऊ साळुंखे, नागनाथ वाघ, लाईक सिद्धिगी, अरविंद नडमने, शिवाजी कापसे, अनिल भांजी, प्रमोद देशमुख, डॉ. महादेव पाटील, दिलीप कदम, धनंजय हुंडेकरी आदींनी परिश्रम घेतले. यावेळी उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला.

## नळदुर्गचा किल्ला इच्छुक कंपनीला करारावर देणे गरजेचे; सुविधा उपलब्ध नसल्याने पर्यटकांची किल्ल्याकडे पाठ



**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२१ जानेवारी -**

नळदुर्गचा प्राचिन व ऐतिहासिक किल्ला पुन्हा भग्नावस्थेत जाऊ नये यासाठी महाराष्ट्र सरकारने तात्काळ हा किल्ला महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेअंतर्गत किल्ला घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कंपनीला करारावर देणे गरजेचे आहे. गेल्या सहा महिन्यांपासुन या किल्ल्यातील पर्यटकांसाठी किल्ल्यात असणाऱ्या सोई, सुविधा तसेच बोटिंग, गोल्फ कार तसेच घोडेस्वारी बंद झाल्याने पर्यटकांनीही किल्ल्याकडे पाट फिरविल्याचे दिसुन येत आहे.

नळदुर्गचा ऐतिहासिक व प्राचिन किल्ला हा महाराष्ट्रात असणाऱ्या भुईकोट किल्ल्यापैकी सर्वात मोठा किल्ला आहे. हा किल्ला प्राचिन स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या किल्ल्याचे क्षेत्रफळ मोठे असुन तब्बल तीन किलोमीटर लांब किल्ल्याची तटबंदी पसरली आहे. या तटबंदीमध्ये एकुन ११४ बुरुज आहेत. हा किल्ला पुरातत्त्व विभागाच्या ताब्यात आहे. किल्ला पाहण्यासाठी किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांना याठिकाणी कुठल्याच सुविधा मिळत नव्हत्या किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांना किल्ल्यात ना पिण्याच्या पाण्याची सोय होती ना स्वच्छतागृहाची सोय होती. राज्याचे माजी मंत्री व तुळजापुर तालुक्याचे आमदार मधुकरराव चव्हाण यांनी २०१४ साली महाराष्ट्र सरकारकडे नळदुर्ग किल्ल्या संदर्भात पाठपुरावा करून तसेच किल्ल्यात जास्तीतजास्त पर्यटक यावेत. या किल्ल्याच्या माध्यमातुन नळदुर्ग शहराचा विकास व्हावा तसेच प्राचिन किल्ल्याचे जतन व्हावे यासाठी महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेअंतर्गत हा किल्ला किल्ल्यात काम करू इच्छिणाऱ्या कंपनीला १० वर्षाच्या करारावर देण्याचा प्रस्ताव ठेवला. महाराष्ट्र सरकारने मधुकरराव चव्हाण यांचा हा प्रस्ताव स्विकारला आणि पहिल्यांदा राज्यातील गड, किल्ल्यापैकी नळदुर्गचा किल्ला हा सोलापुर येथील युनिटी मल्टीकॉन प्रा. लिमिटेड या कंपनीकडे महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेअंतर्गत किल्ल्यात बाग, बगीचा विकसित करणे, तटभिंती वास्तु यांची डागडुजी करणे, पर्यटकांना पिण्याच्या पाण्याची सोय करणे, स्वछता गृह बांधणे आदी कामांसाठी दहा वर्षाच्या कालावधीसाठी सोपविला होता.

युनिटी मल्टीकॉन कंपनीने किल्ल्याचे प्राचिन वैभव जपत गेल्या दहा वर्षात किल्ल्याचे व्यवस्थित जतन करण्याचे काम केले आहे. भग्नावस्थेत असलेल्या किल्ल्याला गतवैभव प्राप्त करुन देण्याचे काम युनिटी मल्टीकॉन कंपनीने केले आहे. कंपनीने किल्ल्यात विविध ठिकाणी बाग बगीचा, कारंजे तयार केले. पर्यटकांना शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची सोय केली, किल्ल्यातील विविध भागात पर्यटकांसाठी स्वच्छता गृह बांधले, किल्ल्यात हजारो वृक्षांची लागवड करुन त्याचे जतन केले आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा कर्मचारी नेमण्याबरोबरच किल्ल्यात सिसिटीव्ही कॅमेरे बसविले. त्याचबरोबर किल्ल्यात फेरफटका मारण्यासाठी पर्यटकांसाठी गोल्फ कार तसेच घोडेस्वारी उपलब्ध करुन दिली होती. तसेच किल्ल्यालगत असलेल्या बोरी नदीच्या पत्रात पर्यटकांसाठी बोटिंगची व्यवस्था केली होती. त्यामुळे गेल्या दहा वर्षात किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत मोठी वाढ झाली होती.

मात्र दहा वर्षाचा करार संपल्यानंतर दि.१ ऑगस्ट २०२४ पासुन हा किल्ला पुन्हा एकदा पुरातत्व विभागाच्या ताब्यात गेला आहे. इतका मोठा किल्ला सांभाळणे पुरारतत्व विभागाला शक्य नाही कारण पुरातत्व विभागाकडे तेवढे मनुष्यबळ नाही. आज अतिशय तोकडया कर्मचाऱ्यांवर पुरात्त्व विभागाने या किल्ल्याची जबाबदारी दिली आहे. युनिटी मल्टीकॉन कंपनीने किल्ल्यात १०० मजुर कामासाठी ठेवले होते.

आज किल्ल्यात पुन्हा पर्यटकांचे हाल होत आहेत. किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. आज किल्ल्यात अनेक ठिकाणी कचरा साठत चालला आहे. किल्ल्याच्या तटबंदीवर पुन्हा एकदा झाडा झुडपांची गर्दी दिसुन येत आहे. अशीच परिस्थिती राहिली तर येणाऱ्या काळात पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त केलेला किल्ला भग्नावस्थेत जाणार की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे किल्ल्याचे व्यवस्थित जतन व्हावे, किल्ल्यात येणाऱ्या पर्यटकांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच किल्ला अतिक्रमण मुक्त राहण्यासाठी तसेच किल्ल्यातील उपली बुरुज, परंडा दुरुज, नवबुरुज, बारादरी, पाणीमहाल, गणपती महाल यासह किल्ल्यात असणाऱ्या सर्व धार्मियांच्या स्थळांचे जतन व्हावे यासाठी महाराष्ट्र सरकारने तात्काळ नळदुर्गचा ऐतिहासिक व प्राचिन किल्ला महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक या योजनेअंतर्गत १० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी किल्ल्यात काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या कंपनीला करारावर देणे गरजेचे आहे. आज किल्ल्यात पर्यटकांसाठी मनोरंजनाच्या किंवा कुठल्याच सुविधा उपलब्ध नसल्याने आज पर्यटकांनी किल्ल्याकडे पाट फिरविले असल्याचे दिसुन येत आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कृषी विभाग व ड्रोन कंपनीच्या वतीने प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतीची उत्पादकता अनेक पटींनी वाढली आहे. जिथे कामगार-बचत उपकरणांचा पूर्ण वापर होत आहे. आज शेतकरी अनेक कामे मशीनच्या साहाय्याने करू शकतो. यामुळे वेळेची बचत तर होतेच पण खर्चही कमी होतो आणि उत्पादनही वाढते.

मराठवाड्यासह लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ही गरज ओळखून लातूर येथे प्रथमच ड्रोनद्वारे पीक फवारणी यंत्र विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. या केंद्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते होणार आहे.

कृषी विभाग लातूर व कंपनीच्या संयुक्त विद्यमाने यावेळी हरभरा पिकावर ड्रोनद्वारे फवारणी प्रात्यक्षिक आणि ड्रोनद्वारे पीक फवारणी यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

बुधवार, दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी श्री अभिनव नानासाहेब जाधव यांचे फार्म हाऊस, लातूर-कापूर रोड, लातूर येथे सकाळी ९.०० वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून ड्रोन कंपनीचे प्रमुख महेश हाउळ हे उपस्थित राहणार आहेत.

लातूर येथील कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता बाबासाहेब ठोंबरे आणि जिल्हा कृषी अधिव्याख्याता प्राध्यापक अरुण गुप्ते हे प्रमुख वक्ते याबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कृषी अधिकारी रमेश जाधव, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव, दीपक सुपेकर, कृषी उपसंचालक महेश क्षीरसागर, मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख सचिन दिग्रसे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक कल्पना सिरसागर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती असणार आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## लातूर कॉलेज ऑफ फार्मसी चा विद्यार्थी विभागीय स्पर्धेत प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत येणाऱ्या पदविका महाविद्यालयचे आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना झोन स्पर्धेमध्ये लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर महाविद्यालयातील पदविका द्वितीय वर्षातील विद्यार्थी अल्ताफ जावळकर यांनी भालाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक व थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक फटकावला आहे.

या विजयाचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे ,सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे,प्राचार्य डॉ श्रीनिवास बुमरेला, क्रीडा शिक्षक पवार सर,एन एस एस प्रमुख मुंजाजी मुळे आदी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदिंनी केले.

## बौध्द धम्माचे पालन म्हणजे सत्याचे पालन होय:भिक्खू पय्यानंद थेरो

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
बौद्ध धम्मात शील, सदाचार व नीतीमत्ता या तत्वाची मूळ शिकवण सांगितली आहे. बौध्द धम्माची शिकवण ही सांगण्यासाठी अथवा दाखवण्यासाठी नाही तर प्रत्यक्ष सत्य धर्माचे आचरणासाठी आहे. त्यामुळे बुध्दाच्या धम्माचे पालन हे सत्याचे आचरण होय असे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे.

दर रविवार, चलो बुध्द विहार अभियाना अंतर्गत सामूहिक बुध्द वंदना आणि धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन जेतवन बुध्द विहार अजनी ता. शिरूर अनंतपाळ येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचा प्रारंभ तथागत बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुष्पाने, दीपाने आणि पूजेने भिक्खू संघाच्या हस्ते करून त्रीशरण, पंचशिल व सामूहिक बुध्द वंदनेने करण्यात आली. या प्रसंगी पु. भिक्खू बुद्धशील, पु. भिक्खू बोधिराज यांचीही धम्म प्रवचने झाली. तद्नंतर प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. देवदत्त सावंत, डॉ. विजय अजनीकर, काशिनाथ आजनिकर, राहुल बानाटे, मंगल कांबळे ई. आपापले मनोगत व्यक्त केले. यावेळी सामूहिकपणे बावीस प्रतिज्ञांचे तथा संविधान प्रास्ताविकीचे वाचन करण्यात आले.

## इकरा उर्दू प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
शहरातील सोहेलनगर येथील इकरा उर्दू प्राथमिक शाळेत सोमवारी बाल आनंद मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थाध्यक्ष अ. वहीद हबीब शेख यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पक्वानासह चटपटी पदार्थ विक्रीसाठी आणले होते. पालकांनीही यात सहभाग नोंदविला. विद्यार्थी मोठ्या उत्साहात व्यावहारिक ज्ञानासह खाद्य पदार्थांचा आनंद घेत होते संस्थाध्यक्ष शेख म्हणाले, मुलांमध्ये व्यावहारिक ज्ञान वृद्धिंगत व्हावे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, या कार्यक्रमांचा उद्देश आहे. मुख्याध्यापक फय्याज मुजावर म्हणाले, बाल आनंद मेळाव्यात पाणीपुरी, भजे, पोहे, खिचडी आदी प्रकारचे पदार्थ विद्यार्थ्यांनी विक्री केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी शिक्षक निलोफर सय्यद, तज्मुल सय्यद, सादिया पठाण, यास्मीन सय्यद, सुहाना सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## भारतीय किसान युनियनची मराठवाडास्तरीय बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
लातूर शहरात भारतीय किसान युनियनची मराठवाडास्तरीय बैठक पार पडली. यावेळी राज्याचे अध्यक्ष चंद्रशेखर नलावडे पाटील, सचिव रूपाली पाटील, सदस्य दिग्विजय कदम, मराठवाडा अध्यक्ष नेहरू देशमुख यांची उपस्थिती होती.
बैठकीत लातूर जिल्हाध्यक्षपदी आर. डी. काळे, धाराशिव अध्यक्षपदी दत्ता आवाड यांची नियुक्ती केली.

## लातुरात अवैध दारूविक्रीवर छापेमारी

### ४ लाखांचा मुद्देमाल जप्त; लाखो लिटर रसायन केले नष्ट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
हातभट्टी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर आणि देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्यांवर लातूर पोलिसांनी छापेमारी करीत ४९ जणांवर गुन्हे दाखल करून ४ लाख १७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी विशेष मोहीम राबवून कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पहाटे जिल्ह्यात लपून-छपून हातभट्टी दारू तयार करणाऱ्या ठिकाणांवर छापेमारी करत हातभट्टी दारू तयार करणारे, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या ४९ जणांवर गुन्हे दाखल करून ४ लाख १७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच हजारो लिटर हातभट्टी दारू व हातभट्टी दारू तयार करण्याचे रसायन नष्ट करण्यात आले. या विशेष मोहिमेत लातूर पोलिसांनी छापेमारी करीत ४९ जणांवर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या विशेष पथकांमध्ये जिल्ह्यातील २३ पोलीस अधिकारी आणि १०९ पोलीस अंमलदारांचा समावेश होता. पोलीस अधीक्षक मुंडे आणि अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात लातूर पोलिसांकडून अवैध धंद्यांविरुध्द कठोर कारवाई करण्यात येत असून ही कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

## सफाई कामगारांचे मनपासमोर उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
बाह्य यंत्रणेद्वारे झडवईचे (झाडू मारणे) काम करणाऱ्या कामगारांचे खंडित काळातील वेतन तसेच त्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने सफाई कामगार सोमवारपासून महानगरपालिकेसमोर बेमुदत उपोषणाला बसले आहेत.

१ ऑगस्ट २०२४ पासून कामावरून कमी केल्याने उपासमारीची वेळ आली असल्याची उपोषणकर्त्यांनी व्यथा मांडली. लातूर शहरामध्ये झाडलोट करून शहराची स्वच्छता करण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून या कामगारांकडून केले जात होते. खासगी एजन्सीमार्फत कामगारांचे वेतन केले जात होते. त्यांची नियुक्तीसंबंधित एजन्सीनेच केलेली होती, असे महापालिकेचे म्हणणे आहे.

आता महापालिकेने शहर स्वच्छतेच्या कामाची जबाबदारी दुसऱ्या एजन्सीला दिलेली आहे. त्यामुळे कामगारांचे काम बंद झाले आहे, परिणामी त्यांच्यावर उपासमारीची वेळ आहे. पंधरा ते वीस वर्षांपासून अल्प वेतनावर काम करणाऱ्या या कामगारांना कामगार कायद्यांतर्गत मिळणाऱ्या इतर सोयीसुविधांपासून जाणीवपूर्वक महानगरपालिकेने वंचित ठेवले, असा आरोप करण्यात येत आहे.

## लातुरात संविधान गौरव सभेचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभर संविधान गौरव अभियान राबविण्यात येणार असून त्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातही हे अभियान राबवले जात असून लातूर शहरात संविधान गौरव सभेचे आयोजनही करण्यात येणार असल्याची माहिती भाजपच्या महाराष्ट्र प्रदेश प्रवक्त्या तथा संविधान गौरव अभियान समितीच्या सदस्या प्रेरणाताई होनराव यांनी मंगळवारी सकाळी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

संविधान गौरव अभियानाच्या निमित्ताने राज्यात सर्वच जिल्हास्थानी संविधान गौरव सभाही होणार आहेत. त्यासाठी राष्ट्रीय तसेच प्रदेश पातळीवरील मान्यवर नेत्यांची उपस्थिती राहणार असल्याचे सांगून प्रेरणाताई होनराव यांनी ठाण्यात होणाऱ्या संविधान गौरव सभेस केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून पुण्यात ज्योतिरादित्य शिंदे, नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संविधान गौरव सभा होईल. राज्यात ठिकठिकाणी मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत या सभा पार पडणार आहेत. भारतीय राज्यघटना अर्थात संविधान लिहिणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आणि संविधानाचा अवमान करण्याचे काम काँग्रेसने, काँग्रेसच्या नेत्यांनी सातत्याने केले आहे, हे सर्वज्ञात आहे.

संविधानाची निर्मिती करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्याचे काम अटलबिहारी वाजपेयी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात झाले आहे, ही बाब भाजपवर टीका करणाऱ्यांनी कदापि विसरता कामा नये, असेही प्रेरणा होनराव म्हणाल्या.

अतिशय विद्वान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना काँग्रेसने विदेश नीति, आर्थिक मुद्यांच्या बाबतीत का सहभागी करून घेतले नाही ? असा सवाल करून त्यांनी केला. यावेळी अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### भाजपाच्या प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव यांची माहिती

## लातूर स्त्रीरोग संघटनेतर्फे हिस्टेरोस्कोपी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
येथील स्त्रीरोग तज्ज्ञ संघटना व डॉ. बरमदे यांच्या हॉस्पिटलच्यावतीने आयोजित हिस्टेरोस्कोपी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ज्येष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. एस. कृष्णकुमार यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिस्टेरोस्कोपी म्हणजे गर्भ पिशवीची अंतर्गत तपासणी करणे व गर्भ पिशवी आजाराचे अचूक निदान करून आजाराचे समूळ उच्चाटन करणे. ही नवीन प्रणाली ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांनी या कार्यशाळेसाठी पुढाकार घेतला. हिस्टेरोस्कोपी या बिनटाक्याच्या शस्त्रक्रियेमुळे महिलांचे गर्भाशयसंबंधी आजार दुरुस्त करणे सोपे झाले आहे. या शस्त्रक्रियेनंतर पोटावर कोणताही डाग, व्रण पडत नाही. वारंवार गर्भपात होणे, गर्भ पिशवीतील गाठी, पडदा, कॅन्सरचे अचूक निदान करणे सहज झाले आहे. यावेळी डॉ. एस. कृष्णकुमार यांनी सहभागी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टरांना प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करून प्रात्यक्षिक दाखवले. तसेच या शस्त्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

शस्त्रक्रियेदरम्यान डॉ. एस. कृष्णकुमार यांना डॉ. कल्याण बरमदे, डॉ. कृष्णा मंदाडे, डॉ. भाऊराव यादव यांनी तर भूलतज्ज्ञ डॉ. अनिल वलसे यांनी सहकार्य केले. कार्यशाळेला लातूर शहरासह उदगीर, बीड, धाराशिव, सोलापूर, नांदेड, गुलबर्गा (कर्नाटक) येथील स्त्रीरोग तज्ज्ञांनी सहभाग नोंदविला.

## जिल्हा बँकेतुन वेतनास शिक्षक सेनेचा विरोध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयीकृत बँकेद्वारे करण्यात येते. मात्र, शासनाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत वेतन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या निर्णयास शिक्षक सेनेने विरोध दर्शविला आहे. राष्ट्रीयीकृत बँकेतच वेतन सुरु ठेवावे, अशी मागणी जिल्हाध्यक्ष शरद हुडगे यांनी केली आहे.

मध्यवर्ती सहकारी बँका नॅशनल बँकाप्रमाणे सोयी देणार नाहीत. त्यामुळे कर्मचारी हिताला बाधक निर्णय आहे, निर्धारित वेळेत वेतन होणार नाही, स्टेट बँक इंडियात सॅलरी अकाउंट असण्याचे फायदे अपघाती मृत्यू झाल्यास १ कोटी ६० लाखांचा विमा, मुलींच्या लग्नासाठी कर्ज, उच्च शिक्षणासाठी कर्जही देण्यात येते. जिल्हा बँकेतून या सुविधा मिळत नसल्याचे शिक्षक सेनेने सांगितले. पूर्वी जिल्हा बँकेतच पगार होता. राष्ट्रीयीकृत बँकेत पगार व्हावी म्हणून शिक्षक सेनेसह विविध संघटनांनी मागील काळात संघर्ष केला. सॅलरी अकाउंटवर जी सुविधा एसबीआय देऊ शकते ती सुविधा जिल्हा बैंक देऊ शकेल का, होम लोन, पर्सनल लोन हे एसबीआय खूप लवकर मंजूर करते असे सेनेने म्हटले आहे.

## पंजाबमधील शेतकरी आंदोलनाकडे सरकार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
पंजाबमधील शेतकरी आंदोलनाला केंद्र सरकार देत असलेल्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी व सरदार डल्लेवाल यांनी उपोषण सोडावे यासाठी महाराष्ट्रातील वीस जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष रुपेश शंके यांनी प्रसिद्धीस दिली.



पंजाब आणि हरियाणा राज्यांच्या सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुमारे एक वर्षा पासून सुरू आहे. कृषी मंत्र्यांनी त्यांच्याशी चर्चा करून प्रश्न सोडवावा अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. अकरा महिने झाले तरी केंद्र सरकार या आंदोलनाची दखल घेण्यास तयार नाही असे पाहून भारतीय किसन युनियन (अराजनैतिक) या संघटनेचे अध्यक्ष सरदार जगजितसिंग डल्लेवाल यांनी उपोषणाला सुरु केले. आज पंचावन्न दिवस उलटून गेले तरी सरकार बोलणी करण्यास तयार नाही. त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

एका शेतकरी आंदोलनाला ज्या पद्धतीने सरकार वागणूक देत आहे निषेधार्ह आहे. शांततेच्या मार्गाने अतिशय अहिंसक पद्धतीने हे आंदोलन सुरू आहे. देशाचे पंतप्रधान किंवा कृषी मंत्र्यांनी त्यांच्या शिष्टमंडळा बरोबर चर्चा करावी. जे शक्य असेल ते मंजूर करावे, नसेल ते का करता येत नाही ते समजून सांगावे असे मत शंके यांनी अहील्यानगर येथे झालेल्या आंदोलनात केले. पूर्ण भारतातील शेतकऱ्यांनी एकजूट होऊन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा विरोध करायला हवा. आपापसातील मतभेद बाजूला ठेऊन एक किमान समान कार्यक्रम घेऊन सरकारकडे शेतकरी हिताचे धोरण तयार करण्यास भाग पाडले पाहिजे असे ही ते म्हणाले. लातूरसह महाराष्ट्रातील वीसपेक्षा अधीक जिल्ह्यात लाक्षणिक उपोषणाचे आंदोलन करण्यात आले. लातूरचे जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या वतीने निवेदन स्वीकारले. जिल्हाधिकारी कार्यालय समोर झालेल्या आंदोलनात स्वतंत्र भारत पक्षाचे कल्याणाप्पा हुरदळे, बाबाराव पाटील, अशोक पाटील, रुपेश शंके, माधव मल्लेशे,माधव कंदे, लक्ष्मण वंगे आदिंचा समावेश होता.

## ज्येष्ठांचे पहिले मराठी साहित्य संमेलन लातूरला होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
ज्येष्ठ नागरिक संघाचे (फेस्कॉम ) राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे याच महिन्यात यशस्वी पद्धतीने पार पडल्यानंतर आता ज्येष्ठांचे पहिले मराठी साहित्य संमेलन लातूर येथेच येत्या ५ फेब्रुवारी (बुधवार) रोजी आयोजिण्यात आले असून , संमेलनाचे उद्घाटन अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा मराठीतील नामवंत समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ, लातूर यांच्या संयुक्त वतीने हे एक दिवसीय साहित्य संमेलन वरील दिवशी सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली येथील डॉ.भालचंद्र ब्लड बॅन्क सभागृहात संपन्न होईल व सकाळी ८.३० वा. निघणाऱ्या ग्रंथदिंडीने संमेलनास प्रारंभ होईल, असे संमेलनाचे कार्यवाह प्रकाश घादगिने यांनी सांगितले.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील हे असून, प्रमुख अतिथी म्हणून साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे, समतावादी सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष डॉ. माधव गादेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमीचे अध्यक्ष ॲड. एस.एन. बोडके, साहित्यिक विलास सिंदगीकर, ज्येष्ठ नागरिक संघाच्या लातूर शाखेचे अध्यक्ष अभि. आर.बी. जोशी आणि प्रकाश घादगिने हे उपस्थित राहणार आहेत.

संमेलनात समाजाच्या जडणघडणीत ज्येष्ठांचे योगदान या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या परिसंवादात वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रदीप नणंदकर, साहित्यिक प्रा. डॉ. राजशेखर सोलापुरे, ज्येष्ठ युरॉलॉजिस्ट डॉ. हंसराज बाहेती, सामाजिक कार्यकर्ते रामानुज रांदड हे सहभागी होणार आहेत. परिसंवादाचे प्रवाही सूत्रसंचालन डॉ. बी.आर. पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

तिस-या सत्रात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक एकनाथ आवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कथाकथन कार्यक्रमात साने गुरुजी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त लेखिका श्रीमती वृषाली पाटील, कथाकार चंद्रशेखर कलसे, ज्येष्ठ कथाकार जी.जी. कांबळे सहभागी होतील. सूत्रसंचालन डॉ. भास्कर बोरगावकर यांच्याकडे राहील. असे संयोजकांनी कळवीले आहे.



## महिला उद्योजकांचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
महिला उद्योजकांच्या गृह उद्योगातील वस्तुंचे प्रदर्शन आणि विक्रीचे स्टॉल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर आयोजित करण्यात आले असून या प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिकेतील सफाई महिला कामगाराच्या हस्ते करण्यात आले.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या महिला शहराध्यक्षा रागिणी यादव व बचत गट प्रमुख श्यामल खराटे यांच्या माध्यमातून महिला उद्योजकांच्या गृह उद्योगातील वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने असे तीन दिवसांसाठी सदर प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन महिला सफाई कर्मचारी श्यामा धायगुडे, शबाना पठाण, दिलुबाई कांबळे, शीला सरवदे, पूजा मगर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

उद्योजक महिलांच्या हस्ते माँ जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या प्रदर्शनात शहरासह शहराबाहेरील बचत गटांचेही स्टॉल लावण्यात आले होते.

याला मोठा प्रतिसाद मिळाला ५० हून अधिक महिला उद्योजकांनी यात सहभाग नोंदविला होता. यासाठी शोभा कोंडेकर, जयश्री भुतेकर, श्यामल खराडे, दिशा देशमुख, काशीबाई हांडे, शीतल गायकवाड, रश्मी बेळंबे, अनिता कुसनुरे यांनी सहकार्य केले.

या प्रदर्शनास शहरातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली अशी माहिती रागिणी यादव यांनी दिली आहे.

## विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीचे क्षेत्र निवडावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ जानेवारी -**
दयानंद शिक्षण संस्था व ईस्कॉन संस्था यांच्या वतीने दयानंद शिक्षण संस्थेअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या संकल्पनेतून व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पाच दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

आज या सेमिनारचे दुसरे पुष्प गुंफताना योगीराज बाहेती यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी प्रत्येकाच्या जीवनामध्ये प्रत्येक क्षणाला पसंती येतच असतात; पण महत्त्वाचा निर्णय घेता येत नाही. त्यामुळे आपल्या जीवनात अनेक संभ्रम निर्माण होतात. अशावेळी विद्यार्थ्यांना योग्य व महत्त्वाचा निर्णय घेता येत नाही म्हणून प्रत्येकाने आपल्या सद्सदविवेक बुद्धीचा वापर करून योग्य तो निर्णय घेतला पाहिजे आणि आपले पसंतीचे क्षेत्र निवडावे मगच जीवनाची वाटचाल करावी असे आवाहन केले.

विद्यार्थ्याच्या शालेय, माध्यमिक व महाविद्यालयीन अशा तिन्ही टप्प्यावर त्यांच्या जीवनामध्ये किशोरावस्था, कुमारावस्था या मनचंचल करणाऱ्या अवस्था असतात. या टप्प्यामध्ये काही गोष्टी विद्यार्थ्यांना पुन्हा पुन्हा हव्या असतात. अशा दुर्गुणयुक्त अपघातातून विद्यार्थ्यांना बाहेर काढण्याचे काम शाळा व महाविद्यालये करतात. विद्यार्थ्यांनी यामधून योग्य तो मार्ग काढून जीवनात यशस्विता आणावी. त्याचबरोबर मनामध्ये चांगली इच्छाशक्ती आणली तर माणूस आदर्श बनतो असे ते शेवटी म्हणाले.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## राष्ट्रीय अबकस स्पर्धेत आराध्या पाठकचे यश

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि. २१ जानेवारी -**

औसा दि.२१जानेवारी - सोलापुर जिल्ह्यातील मोहोळ येथे मेट्रो ब्रेन तर्फे झालेल्या सातव्या राष्ट्रीय स्तरावरील अबकस स्पर्धेत औसा येथील गंगापुरे मेट्रो ब्रेन अकडमीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. यात मुलीतून आराध्या गोपाळ पाठकने झेड आर श्री अवार्ड मिळवले आहे. तर मुलामध्ये पुष्कर माधव गंगापूरे याने मिळवले आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत औसा येथील गंगापुरे मेट्रो ब्रेन अकडमीने आपले आव्हान टिकवले असून समृद्धी शिराळ, अंकिता स्वामी, प्रिती नरहरे, विभावरी वाघमारे, संकेत आडे, भार्गव वाघमारे या विद्यार्थ्यांनी अचिव्हमेंट



अवॉर्ड मिळवले आहे. या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष संतोष लोहारे यांच्या हस्ते शिक्षिका विद्या भोजने यांना बेस्ट टीचर अर्वाडने सन्मानित करण्यात आले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### दारूची अवैध विक्री; एकावर गुन्हा दाखल

**वलांडी, दि.२१ जानेवारी -**

तालुक्यातील सय्यदपूर येथे एका विरूद्ध विना परवाना अवैध देशी दारू विक्री व्यवसायात १९ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तालुक्यातील सय्यदपूर येथे विना परवाना छूप्या पध्दतीने घरात देशी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने विना परवाना पत्र्याच्या शेडमधे दारू बाळगला पोलीसांची चाहूल लागताच पळून गेला. शेडमध्ये मिळालेला माल देशी दारू संत्रा कागदी लेबलच्या १८० एम एलच्या १६ बाटल्या प्रति बॉटल किमत ७० रु. प्रमाणे एकूण ११२० रूपयांचा मूद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गौंड यांच्या फिर्यादीवरून आरोपी गोविंद वसंत हणमंत यांच्या विरोधात गून्हा नोंद करण्यात आला आहे.




### शासकीय कार्यालयात साजरी करावी

**औसा, दि.२१ जानेवारी -**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची २३ जानेवारी होणारी जयंती सर्व कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या दि.२७ डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकानुसार साजरी करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे देशाचे राष्ट्रपुरुष असून भारत सरकारने राष्ट्रपुरुष म्हणून घोषित केलेले आहे. अशा राष्ट्रपुरुषाचा सन्मान महाराष्ट्रातील शासकीय कार्यालयात होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रामध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दैवत मानले जात असून २३ जानेवारी रोजी त्यांची जयंती आहे.



### कृत्रिम अवयव जिल्हास्तरीय शिबीर

**उदगीर, दि.२१ जानेवारी -**

दिव्यांग व्यक्तींकरिता कृत्रिम हात, पाय, स्प्लींट, कॅलीपर मिळण्याकरिता उदगीर येथील शिबीराचे उदॅघाटन जिल्हा समाजकल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडे, राजू गायकवाड, बाळासाहेब वाकडे, डॉ. रुपेश जाधव, रुक्मिनी सोनेवाड, शंकर लासुने डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ. कालिदास बिराजदार, डॉ. संजय कुलकर्णी, संतोष कुलकर्णी, डॉ. संजय तेलंग, रविकिरण बालकुंदे, श्रीपाद श्रीमंत कर, मुख्याध्यापक राजा मलिक पटेल, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे व्यंकट लामजणे, बसवराज पैके, नवाज शेख, संतोष कोळगावे व मुख्याध्यापक, वि.शिक्षक कर्मचारी व दिव्यांग व दिव्यांगाचे पालक उपस्थित होते. या शिबिरात १२० दिव्यांगाची तपासणी करून लाभ देण्यात आला.

# शासकीय केंद्रांवर शेतकरी रांगेत; संथ गतीने खरेदी बारदाण्याची प्रतीक्षा

### तेराशे शेतकरी सोयाबीन विक्रीच्या प्रतीक्षेत.. सतराशे शेतकऱ्यांना मेसेज..





**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.२१ जानेवारी -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथे नाफेड च्या वतीने एका केंद्रावर सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे. या केंद्रांची १२ जानेवारी रोजी संपणारी मुदत आता ३१ जानेवारीपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीला गती देण्यात येत असून, या केंद्रांवर वाहनांच्या रांगा पहायला मिळत आहेत.

शासनाने यंदा सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये हमीभाव जाहीर केला. तर बाजार समित्यांच्या मोंढ्यात सरासरी चार हजार रुपयांवरही सोयाबीन जात नाही. त्यामुळे या परिसरातील शेतकरी शासकीय सोयाबीन खरेदी केंद्रांकडे वळला आहे. मागील दोन ते तीन वर्षाच्या तुलनेत यंदा नाफेडच्या या केंद्रांवर सोयाबीनची खरेदी विक्रमी झाल्याचे पहावयास मिळत आहे. आत्तापर्यंत जवळपास या एका केंद्रावर ११००० क्विंटलहूनअधिक सोयाबीन खरेदी करण्यात आल्याची माहिती अंशिका ऍग्रो फार्मर प्रोड्यूसर कंपनीचे संचालक गजानन लांडगे यांनी दिली. परंतु, सध्या बारदाण्याचा प्रश्न केंद्रचालकांसह शेतकऱ्यांनाही सतावत आहे. यासंदर्भात पणन विभागाकडे पाठपुरावा करूनही बारदाणा वेळेत उपलब्ध होत नसल्याचा आरोप होऊ लागला आहे.

वलांडी येथील केंद्र २० ११ २०२४ पासून सुरू असून सुरुवातीला नाफेड कडून केवळ सहा हजार बोरी बारदान उपलब्ध करून देण्यात आला त्यानंतर आतापर्यंत बारदान उपलब्ध करून देण्यात आला नाही. डीएमओ अंतर्गत जे खरेदी केंद्र आहेत त्यांनाच बारदाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे. आणि जे एस एल ए एजन्सी अंतर्गत खरेदी केंद्रांना सोयाबीन खरेदीची परवानगी देण्यात आली असली तरी त्यांना मात्र नंतर बारदण्याचा पुरवठा करण्यात आला नसल्याने केंद्र चालकांनी शेतकऱ्यात सतत बारदान्यावरून वाद होत आहेत.

शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन येथील केंद्र संचालकांनी स्वतः बारदाना खरेदी करून सोयाबीन खरेदी करीत आहेत त्यामुळे बारदाणा जसा उपलब्ध होईल तशी खरेदी करण्यात येत असल्याने या केंद्रावरील खरेदी संथ गतीने सुरू आहे. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन नाफेड अंतर्गत त्वरित या एजन्सी धारक केंद्रांनाही बारदाण्याचा पुरवठा नाफेड अंतर्गत करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

शासकीय यंत्रणेकडून केंद्रांवर बारदाणा उपलब्ध होत नसल्याने काही शेतकरीही नवा कोरा बारदाना विकत घेऊन खरेदी केंद्रावर सोयाबीनची विक्री करीत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना बारदाना शोधात फिरावे लागत आहे.

## नागपूर कारागृह पोलीस वैभवी भिक्काचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१ जानेवारी -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाभाऊ डोंगरे यांच्यावतीने नागपूर येथील कारागृह पोलीस म्हणून भरती झालेल्या वैभवी बसवराज भिक्का हिचा जगत ज्योती महात्मा बसवेश्वर चौक साकोळ या ठिकाणी सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यच्या वतीने गेल्या वर्षी घेण्यात आलेल्या नागपूर कारागृह पोलीस या भरतीमध्ये साकोळ येथील वैभवी बसवराज भिका या मुलीने घवघवीत यश संपादन केले.

असेच यश येणाऱ्या काळात महिलांनी साध्य करून भविष्यामध्ये महिलांपुढे एक आदर्श ठेवावा जेणेकरून महिलांमध्ये एक उत्साह निर्माण होऊन त्या अनेक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करतील असे साकोळ येथील जगत ज्योती महात्मा बसवेश्वर चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या वैभवी बसवराज भिक्का हिच्या सत्कार समारंभाच्या वेळी सामाजिक कार्यकर्ते शिवा भाऊ डोंगरे यांनी व्यक्त केले.

तसेच वैभवीचे आई-वडील आजी-आजोबा यांचेही कौतुक करण्यात आले.

सत्कार समारंभ प्रसंगी साकोळ येथील संजय कांबळे, शिवाजी सोलगे, सुर्यकांत उमाटे, शरद भिक्का, विलास रामशेट्टे, अप्पाराव पत्की, चंद्रकांत मुनाळे, संतोष तिवारी, विजयकुमार कांबळे, संतोष भिका, सिद्धाप्पा हंडरगुळे, मुन्ना भालके, विवेक रावळे, संजीव शिंदे, विश्वनाथ सोलगे, संजीव मिळकुंदे, एजाज धोबी,सिद्धू डोंगरे, अब्दुल मुल्ला, बालाजी पाटील, बालाजी टाकळे यांच्यासह साकोळवासीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोनाळीतील महिलांनी सेंद्रिय शेतीस दिली भेट

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२१ जानेवारी -**

स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था लातूर यांच्या माध्यमातून सेंद्रिय शेती प्रशिक्षणा अंतर्गत सोमवार दि.२० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता कोनाळी ता. देवणी येथील २७ शेतकरी महिलांनी महादेववाडी ता. देवणी येथील कृषी भूषण शेतकरी ओमकार माणिकराव मसकल्ले यांच्या शेतीस भेट देत सेंद्रिय शेतीची माहिती जाणून घेतली.

६ दिवसांच्या सेंद्रिय शेतीच्या प्रशिक्षणानंतर कोनाळीतील महिला शेतकऱ्यांना स्वयंम शिक्षण संस्थेकडून सोमवारी सेंद्रिय शेतीतील विविध निविष्ठांच्या निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी महादेववाडी येथील सेंद्रिय शेतीतील कृषी भूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी ओमकार मसकल्ले यांच्या शेतीस भेटीसाठी आणण्यात आले होते. यावेळी शेतकरी महिलांनी बायोगॅस सलरी, गांडूळ खत निर्मिती, जीवामृत, दशपर्णी अर्क, वर्मी वाश, नाफेड खत निर्मिती, गोकृपा अमृत आदी निविष्ठांची माहिती तसेच शेती पूरक व्यवसाय म्हणून शेततळ्यातील मत्स्य संवर्धनाची माहितीही शेतकरी ओमकार मसकल्ले यांच्याकडून शेतकरी महिलांनी जाणून घेतली. यावेळी अजमत पठाण, माणिक मसकल्ले, रंजना पोलकर, महानंदा बिरादार यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रियंका मुंढेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१ जानेवारी -**

सेंट जॉन्स एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित टाईम्स पब्लिक स्कूल उदगीर येथे स्वामी विवेकानंद यांची जयंती (युवक दिन)आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धेसाठी जिल्हाभरातून अनेक शाळेतील स्पर्धा सहभागी झाले होते.

त्यामध्ये डोंगर शेळकी गावची सुकन्या प्रियंका ज्ञानोबा मुंढे यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक (ढाल, ट्रॉफी, प्रमाणपत्र २००० रुपये रोख) पारितोषिक पटकावले आहे. प्रियंकाच्या या यशाबद्दल हणमंतराव हंडरगुळे, बाळासाहेब मरलापल्ले, डोंगरशेळकी गावचे मारुती मुंडे, ज्ञानोबा मुंडे, चेअरमन हनमंत मुंडे, भालचंद्र शेळके पाटील, ज्ञानोबा गुरमे, प्राध्यापक सी.पी. मुंडे, मुरहारी मुंडे, ज्ञानोबा पुंड, बी.टी. गुरमे, व्यंकट गुरमे, मधुकर मरलापल्ले, बी.एन. मुंडे, एस.पी. मुंडे, डॉ. विष्णुकांत मुंडे, डॉ. श्रीकांत मुंडे, हणमंतराव शेळके, शेषराव कांबळे, गंगाधर सुर्यवंशी, गणेश मुंडे, मनोजकुमार मुंडे, बाबूराव मुंडे, तुकाराम मुंडे, तातेराव मुंडे, नरशिंग मुंडे, मारोती केंद्रे यांनी अभिनंदन केले.

## किलबिल स्नेसंमेलनात अभिनेते भारत गणेशपुरे यांची उपस्थिती




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२१ जानेवारी -**

येथील किलबिल नॅशनल स्कुल शाळेचा वार्षिक स्नेह संमेलन दि.१८ व १९ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी उद्घाटक म्हणून माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणून अंधश्रध्दा निर्मुलन समिती राज्य निमंत्रक हरिदास तम्मेवार, केंद्रप्रमुख संभाजी कासले, सरपंच गिरिजा मुळे, सरस्वती कांबळे, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात पहिल्या दिवशी एकूण ५७ गीतांमध्ये हिंदी, मराठी युगुल गीतासह लावणी, गोंधळ, शेतकरी गीत, कोळीगीत यावर बालकलाकारांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सिनेअभिनेते भारत गणेशपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले तर व्यासपीठावर दिग्दर्शक चंद्रशेखर सांडोळे,सुधीर सोमवंशी, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती मंचकराव पाटील, संचालक रामदास कदम, निर्माते दत्ताभाऊ जवळगे, मेस्टा चे जिल्हा अध्यक्ष पुष्पराज खुब्बा, महेश देवणे, व्यंगचित्रकार चंद्रशेखर भालेराव, बालासाहेब कदम, पत्रकार बालाजी काळे, बालाजी कदम, सरोजा भोसले, प्राचार्य संतोष पाटील उपस्थित होते. शालेय राष्ट्रीय तलवारबाजी, बॉल बॅडमिंटन, कराटे, स्पर्धा परीक्षा, भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन यामधील गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या दोन्ही दिवशी विद्यार्थ्यानी खरी कमाईचे स्टॉल लावन्यात आले

सूत्रसंचालन सचिन जगताप, सुनीता सरवदे, श्रीकांत वलांडे यांनी केले तर प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे यांनी केले. शेवटी आभार सरोजा भोसले यांनी मानले.

## मलकापुर उपसरपंचपदी सुप्रिया पवार

### ग्रा.प.च्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच महिलेला उपसरपंचपदाचा मान

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१ जानेवारी -**

मलकापुर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुप्रिया गंगाधर पवार यांची बिनविरोध निवड झाली असुन ग्रा.प.च्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच महिलेला उपसरपंचपदाचा मान मिळाला आहे.

मलकापुर ग्रा.प.चे उपसरपंच शेख महेबून यांनी पदाचा राजिनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी सोमवार दि.२० जानेवारी रोजी ग्रापसदस्याची विशेष बैठक अध्याशिन अधिकारी दंडे व्यंकटेश पंचायत समिती उदगीर यांच्या उपस्थित पार पडली. उपसरपंचपदासाठी सदस्य सतिश पाटील यांनी सुचक तर अनुमोदक शेखा महेबूब यांनी सुप्रिया पवार यांचा अर्ज दाखल केला. उपसरपंचपदासाठी एकमेव अर्ज दाखल झाल्याने सुप्रिया पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सरपंच गुरुनाथ बिरादार, सतीश पाटील, पवार दत्तात्रय, सचिन पवार, बोडके जितेंद्र, तोडकर महेश, शेख मेहबूब, महेकरे चंद्रकला, महिंद्रकर दीपा, शेख आशाबी सय्यद, परविन शेख, भालेराव महानंदा, पाटील सोनाबाई, तलाठी अभिमन्यु मेहत्रे, विस्तार अधिकारी परमेश्वर खटके, ग्रामविकास अधिकारी संतोष पाटील व कर्मचिरी उपस्थित होते.

## जगत जागृती विद्यालयाच्या १९८२ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

### ४३ वर्षांनी माजी शिक्षक-विद्यार्थी एकवटले...

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२१ जानेवारी -**

चाकूर येथील जगत जागृती विद्यामंदिर येथे दि.१९ जानेवारी रविवारी तब्बल ४३ वर्षानंतर १९८२ च्या वर्षातील सेवानिवृत्त शिक्षक व माजी विद्यार्थी यांचा स्हेन मिलाप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

त्यानंतर उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनींचा परिचय देण्यात आला व उपस्थितीचा सन्मान करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

त्यानंतर जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय भोसले तर प्रमुख पाहुणे म्हणून जगत जागृती विद्यामंदिरचे सचिव नरेश पाटील, उस्तुरगे नागनाथ, भोसले डि.एच., इंद्राळे एन.एन., शेटे एन.एन, बिराजदार एस.एम, व्यंकट सालेवार, पंढरीनाथ मुंढे, श्रीहरी मुंढे, स्वामी एस.बी, ढोबळे बी.जी, खंडागळे एम.आर, शेरखाने आर.ए, मिरकले एच.एन.आदी उपस्थित होते.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुश जनवाडे, अतुल मुंढे, उषा मोतीपवळे, व्यंकट अक्कानवरू, उद्धव गोडभरले, बालाजी इरवाने, बंडू झांबरे, विठ्ठल सोमवंशी, मिना मिटकरी, गणेश घुगे आदीने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# वाशिष्ट चतुरात्र महासोमयागाला आजपासुन सेलूत सुरुवात

### १२५ वर्षाची परंपरा ; लातूर जिल्ह्यात पहिलाच योग...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२१ जानेवारी -**

औसा तालुक्यातील सेलू येथे २२ ते ३० जानेवारी या दरम्यान वाशिष्ठ चतुरात्र महासोमयाग आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून १२५ वर्षाची परंपरा आणि तीन पिढ्यापासून कार्यरत असलेले अग्निहोत्री बहुसोमयागजी दिक्षित श्री यज्ञेश्वर रंगनाथ महाराज सेलुकर यांच्या अधिपत्याखाली २९ वा महायज्ञ पार पडणार असून बुधवार दि.२२ रोजी सुरुवात होणार आहे. या यज्ञ सोहळ्याला लातूर जिल्ह्यातील भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महासोमयाग समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आले आहे.



निसर्गासह मानव जातीला एक ऊर्जा देणारे साधन यज्ञ आहुती आहे. या यज्ञाहुती परंपरेच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही महत्त्व अधोरेखित झाले आहे. यामुळे अध्यात्मामध्ये यज्ञाहुतीला मोठे महत्व आहे. निसर्ग आणि मानवाच्या कल्याणासाठी श्रीकृष्ण महाराज सेलुकर, यांच्या अधिपत्याखाली १२५ वर्षांपूर्वी एक सोमयाग यज्ञ पार पडला होता. या सोमयागाची परंपरा त्यांचे पुत्र रंगनाथ महाराज यांनी पुढे चालवली आहे. त्यांच्या कार्यकालात तब्बल १५ विविध सोमयाग यज्ञ झाले.

त्यानंतर या यज्ञाची परंपरा यज्ञेश्वर महाराज यांनी पुढे चालू ठेवली. त्यांनी आतापर्यंत २८ यज्ञ पार पाडले आहेत. औसा तालुक्यातील सेलू महाराजांची जन्मभूमी असल्यामुळे आपल्या जन्मभूमी मध्ये एक यज्ञ करण्याचा त्यांचा मानस आणि संकल्प आहे. या संकल्पाची पूर्तता करण्यासाठी सेलु येथे २२ जानेवारी ते २९ जानेवारी या कालावधीमध्ये नऊ दिवसाचा यज्ञ सोहळा पार पडत आहे, अशी माहिती संयोजक समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या यज्ञामध्ये २२ जानेवारी रोजी यज्ञ समारंभाचा ध्वजारोहण सोहळा परम पूज्य सच्चिदानंद अभिनव विद्यानरसिंह भारती स्वामीजी शंकराचार्य संकेश्वरपीठ कोल्हापूर, स्वामी श्री रामानंद भारती छत्रपती संभाजीनगर, स्वामी श्री हरीहरानंद भारती धारूर, यांच्या हस्ते होत आहे. तर परमपूज्य माधवानंद सरस्वती स्वामी परमहंस परिब्राजकाचार्य श्री सरस्वती पीठ रंगामपेठ कर्नाटक तर पंडित श्री गणेश्वर शास्त्री द्रविड श्री क्षेत्र वाराणसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यज्ञ कार्यकाळामध्ये सामुहिक श्री सूक्त हवन, किर्तन सेवा यासह आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहे. यात २३ जानेवारी रोजी परमपूज्य गहिनीनाथ महाराज औसेकर, २४ जानेवारी रोजी परमपूज्य पद्मनाभ व्यास महाराज तेर, २५ जानेवारी रोजी परम पूज्य महादेव महाराज चाकरवाडीकर, २६ जानेवारी रोजी परमपूज्य डॉ. नारायण शास्त्री नागझरकर, २७ जानेवारी रोजी हभप. प्रसाद महाराज बडवे पंढरपूर, २८ जानेवारी रोजी हभप. अच्युत महाराज दस्तापुरकर, २९ जानेवारी रोजी परमपूज्य गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन होणार आहे.



या यज्ञ सोहळ्याला औसा तालुक्यासह लातूर जिल्ह्यातील, महाराष्ट्रातील भाविकांनी या यज्ञ सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन वाशिष्ठ चतुरात्र सोमयाग सेवा समिती व सेलू ग्रामस्थ मंडळीच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आले आहे.

ॲड. अरविंद कुलकर्णी, जनार्दन माने, संजय कुलकर्णी, प्रकाश पंडगे, मधुकर पंडगे, अरविंद विठ्ठल चामे, ज्ञानोबा पवार, रमेश पंडगे, गणेश प्रल्हाद जाधव, सुभाष माने, बालाजी कुलकर्णी यावेळी उपस्थित होते.